मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

» पालघर कार्यालय
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर,
विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर,
धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

मुंबई | RNI No.: MAHAMAR/2016/79101 | » बुधवार, २ जुलै २०२५ | » वर्ष: १० » अंक: ६२ | » पाने-८ | » किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## मराठा आरक्षणाचा मुद्दा संसदेतही गाजणार

**धुळे, दि. १ प्रतिनिधी**

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षणासह विविध मागण्यांसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलनाची हाक दिली आहे. या पार्श्वभूमीवर धुळे लोकसभेच्या खासदार डॉ. शोभाताई बच्छाव यांनी त्यांची भेट घेतली असून या मागणी संदर्भात संसदेत आवाज उठवणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. समाजाला दिलेले आरक्षण सर्वोच्च न्यायालयात टिकले नाही. त्यामुळे मराठा समाजास ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, अशी मागणी मनोज जरांगे हे सातत्याने करीत आहेत. दोन दिवसापूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी आरक्षणासाठी मुंबईत आंदोलन करण्याचे संकेत दिले. यापुढे कमी सांगायचे आणि कमी बोलायचे, पण आता करून दाखवायचे असे मनोज जरांगे यांनी म्हटले होते. याच पार्श्वभूमीवर जालन्यातील अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी राज्यव्यापी बैठक बोलावली होती.

# शक्तिपीठ महामार्गास कडाडून विरोध

**कोल्हापूर/धाराशिव/लातूर दि.१ प्रतिनिधी**

शेतकऱ्यांचा प्रचंड विरोध असलेल्या शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्यासाठी शक्तिपीठ महामार्ग विरोधी कृती समितीच्या वतीने आज कृषिदिनी सकाळी ११ वाजता शिरोली येथील पंचगंगा पुलावर आंदोलन करण्यात आले. यावेळी पुणे- बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग दोन्ही बाजूंनी वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता तेव्हा शेतकऱ्यांनी महामार्गावर ठिय्या मांडला.

शक्तीपीठ महामार्गाला विरोध करण्यासाठी काही आक्रमक शेतकऱ्यांनी पंचगंगा नदीमध्ये उडी मारण्याचा प्रयत्न केला. एकीकडे महामार्ग रोको आंदोलन सुरू असले तरी दुसरीकडे काही आक्रमक शेतकऱ्यांनी आपण आत्महत्या करणार असे म्हणत नदीत उडी मारण्याचा प्रयत्न केला. जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांची शेती कमी आहे. त्यामुळे काही शेतकरी भूमीहीन होणार आहेत. मग आम्हाला जगून काय अर्थ आहे? असे म्हणत या सगळ्यांनी उडी मारण्याचा प्रयत्न केला आणि या सर्वांनाच पोलिसांनी

**कोल्हापुरात अडीच तास महामार्ग रोखला**

**धुळे- सोलापूर मार्गावरही १० किमीपर्यंत वाहनांचा रांगा**



ताब्यात घेतले. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते व माजी खासदार राजू शेट्टी म्हणाले की, आंदोलनस्थळी येण्यासाठी शेतकऱ्यांना पोलिसांकडून अडविले जात आहे. परंतु, ज्या ठिकाणी अडविले जाईल, त्याच ठिकाणी रास्ता रोको आंदोलन करू, असा इशारा शेट्टी यांनी यावेळी दिला. स्वाभिमानीचे शेतकरी नेते राजू शेट्टी, माजी आमदार ऋतुराज पाटील, विजय देवणे यांच्यासह अनेक नेते आणि शेतकरी महामार्गावरती बसून आंदोलन करत आहेत. शक्तीपीठ महामार्ग आम्ही कुठल्याही परिस्थितीत होऊ देणार नाही. जर हा महामार्ग करण्याचा प्रयत्न केला. तर रक्ताचे पाट वाहिले तरी चालतील. मात्र, हा महामार्ग होऊ देणार नाही, असा इशारा राजू शेट्टी, विजय देवणे यांनी दिला.

महामार्गाविरोधात मंगळवारी कोल्हापूरसह सांगली, सोलापूर, धाराशिवमधील शेतकऱ्यांना रास्ता रोको आंदोलन केले. यामुळे वाहतूक ठप्प झाली. कोल्हापूरमध्ये शेतकऱ्यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांच्या नेतृत्वात आंदोलन केले. त्यांनी पुणे- बंगळूर महामार्ग तब्बल अडीच तास रोखून धरला. शेतकऱ्यांनी रस्त्यावर ठिय्या मांडल्याने महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली.

**कोल्हापूर : पुणे- बंगळूर महामार्ग तब्बल अडीच तास रोखून धरला**

कोल्हापूरमध्ये शक्तिपीठ महामार्गाविरोधात कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी शक्तिपीठ विरोधी सर्वपक्षीय संघर्ष समितीच्या माध्यमातून जोरदार आंदोलन केले. 'एकच जिद्द...शक्तीपीठ रद्द' या नाऱ्यातून सरकारला कोणत्याही परिस्थितीत शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा असा इशारा दिला.

**धुळे- सोलापूर महामार्गावर १० किमीपर्यंत वाहनांचा रांगा**

शक्तिपीठ महामार्गाविरोधात धाराशिवमधील शेतकऱ्यांनी धुळे- सोलापूर महामार्गावर चक्काजाम आंदोलन केले. शेतकऱ्यांनी रस्त्यावर ठिय्या मांडल्याने वाहतूक ठप्प झाली आहे. यामुळे सुमारे १० किमीपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या असल्याचे दिसून आले. शक्तिपीठ महामार्गासाठी धाराशिव तालुक्यातील १७ गावे आणि तुळजापूर तालुक्यातील २ गावे असे मिळून १९ गावांतील जमिनीचे भूसंपादन केले जात आहे

**सांगली–कोल्हापूर मार्गावर रास्ता रोको**

शक्तिपीठ महामार्गबाधित शेती बचाव कृती समिती, सांगली यांच्या वतीने सांगली–कोल्हापूर मार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात अपक्ष खासदार विशाल पाटील सहभागी झाले. त्यांनी यावेळी सरकारच्या भूमी अधिग्रहणाच्या निर्णयाचा तीव्र निषेध नोंदवला. हे आंदोलन फक्त रास्त मागण्यांसाठी नाही, तर शेतीच्या अस्तित्वासाठीचा लढा आहे. महामार्गाचे नियोजन करताना शेतकऱ्यांच्या जमिनी जबरदस्तीने घेतल्या जात आहेत. त्यांचे उपजीविकेचे साधन हिरावले जात आहे.

**लातूरमध्ये शेतमोजणी तूर्तास थांबवली**

दरम्यान, शक्तिपीठ महामार्गाच्या मोजणीला लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा कडाडून विरोध केला आहे. यामुळे प्रशासनाने आजची मोजणी तूर्तास थांबवण्यात आली आहे.

## शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्यासाठी विधिमंडळाच्या पायऱ्यांवर महाविकास आघाडीचे आंदोलन

**गजानन तुपे**
**मुंबई, दि. १**

पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधानभवन परिसर प्रक्षुब्ध झाला. शक्तिपीठ महामार्गामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होणार असल्याचा आरोप करत आज महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधिमंडळाच्या पायऱ्यांवर ठिय्या देत जोरदार घोषणाबाजी केली.

"एकाच जिद्द – शक्तिपीठ रद्द, शेतकऱ्यांना देशोधडीला लावणाऱ्या सरकारचा धिक्कार असो!" अशा घोषणांनी विधानभवन परिसर दणाणून गेला. आंदोलनादरम्यान आमदारांच्या चेहऱ्यावर शासनाविरुद्ध संताप स्पष्ट दिसत होता. यावेळी महाराष्ट्राच्या हरित क्रांतीचे शिल्पकार, माजी मुख्यमंत्री




स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास महाविकास आघाडीच्या आमदारांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. राज्याला अन्नधान्यात स्वयंपूर्ण बनवणाऱ्या या थोर नेत्याच्या स्मृतींना उजाळा देताना, त्यांची शेतकरीहिताची भूमिका सरकारने लक्षात घ्यावी, अशीही मागणी आंदोलक आमदारांनी केली. शक्तिपीठ महामार्गामुळे "शेतकऱ्यांना उध्वस्त करून राजकीय लाभ घेण्याचा डाव" असल्याचा आरोपही महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केला. आंदोलनात काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांचे सर्व प्रमुख आमदार सहभागी झाले होते.

## शक्तिपीठ महामार्ग कोणत्या कंत्राटदारासाठी?

## सतेज पाटील यांचा सवाल

**मुंबई, दि. १ प्रतिनिधी**

शक्तिपीठ महामार्गा - विरोधात काँग्रेसचे विधान परिषद गटनेते आमदार सतेज पाटील यांनी मंगळवारी (दि.१ जुलै) विधान परिषदेत भूमिका मांडली. राज्यात गरज नसलेला हा महामार्ग असून सरकारने तो रद्द करावा, अशी मागणी त्यांनी केली. हा महामार्ग शेतकऱ्यांच्या माथी मारु नका. याबाबत सरकारने ठोस भूमिका जाहीर करावी, असेही ते म्हणाले.

महामार्गाविरोधात १२ जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांचे रास्ता रोको आंदोलन सुरु आहे. वर्धा, परभणी पासून ते कोल्हापूर पर्यंत हा महामार्ग कसा चुकीचा आहे? यासाठी शेतकरी



रस्त्यावर उतरले आहेत. रत्नागिरी- नागपूर महामार्गावर २५ टक्के वाहतूक आहे. असे असताना सरकारचा नव्या महामार्गासाठी आग्रह का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. हा नवा महामार्ग कोणत्या कंत्राटदारासाठी? असा प्रश्न महाराष्ट्रातील जनतेला पडला असल्याचेही ते म्हणाले.

वित्त खात्याचाही या प्रकल्पावर आक्षेप आहे. या महामार्गाला ज्यावेळी सुरुवात झाली; त्यावेळी सर्वपक्षीय आमदारांनी हा महामार्ग नको, अशी भूमिका घेतली. नंतर भूमिका बदलत गेल्या, असाही टोला त्यांनी लगावला.

महामार्गाविरोधात १२ जिल्ह्यांतील शेतकरी रस्त्यावर उतरलेत. आज कृषी दिन असून या दिवशी शेतकऱ्यांना शेती वाचवण्यासाठी रस्त्यावर उतरावे लागते हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. शक्तिपीठ महामार्गाला शेतकऱ्यांचा प्रखर विरोध आहे. हे सरकारने लक्षात घ्यायला पाहिजे, असेही सतेज पाटील यांनी म्हटले आहे.

# अग्रलेख – खरीखरी

## कुठे हरवली माझी मराठी

मराठ्यांनी आणि मराठी भाषेने एकेकाळी केलेली देदीप्यमान कामगिरी देशाच्या इतिहासात सुवर्ण अक्षरात नोंदली गेलेली आहे. आम्ही गेले दोन दिवस मराठीची महानता, महत्ता, मराठी बाणा आणि मराठी अस्मिता यावर सहृदयतेने लिहिलेले आहे. आता आज माझी मराठी कुठे हरवली आहे. त्याचा शोध घेणे महत्त्वाचे आहे. ज्या ज्या उत्तुंग प्रतिभेच्या महनीय व्यक्तींनी महाराष्ट्राची पताका उंचच उंच नेलेली आहे. त्या सर्वांनी आपले शिक्षण माय मराठीतच केले होते. हे मुद्दाम नमूद करावेसे वाटते. मग त्यामध्ये चिंतामणराव देशमुख असोत, जयंत नारळीकर असोत किंवा ताज ग्रुपला वेगळा दर्जा मिळवून देणारे केरकर असोत. ही सर्व मंडळी महाराष्ट्रासाठी ललामभूत आहेत. आम्ही मुद्दाम मराठी साहित्यातील दिग्गजांचे नाव घेतलेले नाही. अशा आपल्या मराठीला आणखी कुठे कुठे शोधावे लागेल. हा आमच्या पुढील यक्षप्रश्न आहे. मराठी भाषेत विज्ञानाचे शिक्षण व्हावे, कायद्याचे शिक्षण व्हावे. इंजिनिअरिंगचे शिक्षण व्हावे, वैद्यकीय शिक्षण व्हावे. असा मनोदय पाच-पन्नास वर्षांपूर्वी अनेक दिग्गजांनी व्यक्त केला होता. आजची परिस्थिती पाहिली तर काय नजरेला पडते. आज मराठी भाषेला जणू काय ती परकीय भाषाच आहे. अशा रीतीने अनेक मराठी घरात पाहिले जाते. आपला मुलगा किंवा मुलगी पहिलीपासून इंग्रजी माध्यमातून शिकावेत. हे केवळ मुंबई, पुण्यातील उच्चवर्गीयांचे स्वप्न राहिलेले नाही. तर आता लहानशा खेड्या-पाड्यामधूनही इंग्रजी माध्यमाच्या शाळा भराभर प्रकट होत आहेत. किंबहुना त्या भूछत्राप्रमाणे उगवत आहेत आणि त्याच शाळांचे संचालक या उद्योगाला नफ्याचा उद्योग म्हणत आहेत. मुलांनी मराठीत शिकावे. म्हणून कर्मवीर भाऊराव पाटील, डॉक्टर पंजाबराव देशमुख, डॉक्टर बापूजी साळुंखे यांच्यासारख्या महानुभवांनी मराठी भाषेच्या शाळा सुरू केल्या. आता बदलत्या ऋतुमानानुसार या शाळांमध्येही परकीय भाषेप्रमाणे मराठीला बऱ्याच ठिकाणी स्थान नाही. तिथेही इंग्रजीचे आक्रमण झालेले आहे. आम्ही वारंवार हे म्हटले आहे की, आम्ही कुठल्याही भाषेच्या विरोधात नाही. मग ती इंग्रजी असो काय किंवा हिंदी असो काय. आम्ही कोणाच्याही विरोधात नाही आणि त्यांचा द्वेष करण्याचे कारणच नाही. पण तुम्हाला आता माझ्या महाराष्ट्रातील शाळांमध्ये मराठीत शिकणारी मुले शोधावी लागत असतील. तर यासारखी दुसरी लाजिरवाणी गोष्ट कोणतीही नाही. मराठीचे प्राचीन साहित्य, मध्ययुगीन साहित्य आणि अर्वाचीन साहित्य याची तुलना केली. तर आपले आजचे मराठी साहित्य आम्हाला आपले म्हणजेच आपल्या मराठीचे साहित्य का वाटत नाही. हा आमच्या समोरील मूळ प्रश्न आहे. इंग्रज आले. त्यांनी राज्य केले आणि इंग्रजांची सत्ता गेली. त्यांनी जेवढा इंग्रजीचा प्रचार-प्रसार केला नाही. तेवढा प्रचार आणि प्रसार आमचे इंग्रजाळलेले मराठीजन करीत आहेत. ही अत्यंत खेदाची गोष्ट नाही काय. महाराष्ट्रातील दुकानांवर मराठी फलक लिहिले पाहिजेत. असा कायदा आहे. त्यामुळे हत्तीसारखी इंग्रजी अक्षरे आणि उंदरासारखी मराठी अक्षरे लिहून आपले दुकानदार कायदा पाळतात. आपल्या हाती जो मोबाईल आला आहे. तो सुरुवातीला महागडा होता. तेव्हा घरात एखादा किंवा दुसरा मोबाईल असायचा. आता मोबाईलवर दरमहा 200 ते 300 रुपये खर्च की केले की, तुम्हाला वाटेल तेवढे बघता किंवा बोलता येते. मोबाईल प्रेमी जनांमध्ये मराठी भाषाही मोबाईली झाली आहे. आम्हाला आता मराठीचे व्याकरण शिकण्याची गरज वाटत नाही किंवा भासतही नाही. एक शब्द मराठी, दुसरा शब्द इंग्रजी आणि तिसरा हिंदीचा अशी आमची ही नवमराठी निर्माण झालेली आहे. गंमत अशी आहे की, सरकारने सरकारी कामासाठी जो मराठी शंब्दकोश निर्माण केलेला आहे. तो वाचल्यावर ती मराठी बहुतेक पुढील शंभर दोनशे वर्षानंतर बोललेली जाईल, असे वाटणे स्वाभाविक आहे. मराठी भाषेचे आकर्षण का निर्माण होत नाही हाही एक चिंतनाचा विषय आहे. मराठी भाषेतील पुस्तके मोठमोठे प्रकाशक काही वर्षांपूर्वी आवृत्ती काढताना हजार प्रती छापीत असत. आता तो आकडा अडीचशे - तीनशेवर आलेला आहे. महाराष्ट्रात आणि मुंबईतही मराठी वाचन साहित्य विकणाऱ्या पुस्तकाची दुकाने बंद झालेली आहेत. आता तुम्हाला मराठी भाषेच्या शोधासाठी सक्रिय होऊन बाहेर पडावे लागेल. तेव्हा शिल्लक असलेली मराठी टिकावी, ती वाढावी. असे वाटत असेल तर, समस्त मराठी जनांनो मराठीला शोधा आणि शोधल्यावर आपल्या मनांत आणि आपल्या आत्मजनांत रुजवा, एवढीच नम्र विनंती आहे.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

## राहुल गांधींचे निकटवर्तीय कुणाल पाटलांचा भाजपमध्ये प्रवेश

**मुंबई, दि. १ प्रतिनिधी**

धुळे जिल्ह्यात काँग्रेसला मोठा धक्का बसलाय. माजी आमदार कुणाल पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केलाय. कुणाल पाटील हे काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांचे निकटवर्तीय मानले जातात. मात्र आता कुणाल पाटील यांनी काँग्रेसचा हात सोडत कमळ हाती घेतले आहे. मुंबईत चंद्रशेखर बावनकुळे, रवींद्र चव्हाण, जयकुमार गोरे, जयकुमार रावल या नेत्यांच्या उपस्थितीत त्यांचा पक्ष प्रवेश झाला.

कुणाल पाटील यांनी म्हटले होते की, काँग्रेसमध्ये असताना मी माझं काम चोखपणे पार पाडलं आहे. पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसमोर विचारात घेऊन मी भाजपमध्ये प्रवेश करत आहे. आपण काँग्रेस पक्षाशी ७० वर्षांपासून एकनिष्ठ आहोत, आता त्या पक्षातून दुसऱ्या पक्षात जाणं अवघड असतं. मात्र आपल्या भागात विकास होण्यासाठी हा निर्णय घ्यावा लागत आहे. लहानपणापासून पाहिलं की काँग्रेस हा आपला पक्ष आहे आणि काँग्रेसशीच आपण एकनिष्ठ राहायचे. आपल्या रक्तामध्ये काँग्रेस आहे. अशा प्रकारची भावना घेऊनच आम्ही लहानचे



मोठे झालो. माझे आजोबा पंडीत नेहरू यांच्या पेक्षा जास्त मतांनी निवडून आलेले खासदार होते. आमच्या वडिलांनी ती ख्याती पुढे चालू ठेवली. तेही ७ वेळा आमदार झाले होते. मी पण २०१४ मध्ये पहिल्यांदा विधानसभा निवडणूक लढलो. फार मोठ्या मतांनी लोकांनी मला निवडून दिलं. २०१९ मध्येही लोकांनी मला साथ दिल्याचे त्यांनी म्हटले होते.

माजी आमदार कुणाल पाटील हे गेल्या काही दिवसांपासून भाजपच्या संपर्कात होते. काही दिवसांपूर्वी त्यांनी भाजप प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची रायगड निवासस्थानी भेट घेतली होती. यानंतर कुणाल पाटील भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चांना उधाण आले होते. आज मंगळवारी अखेर कुणाल पाटील यांनी काँग्रेसला रामराम ठोकत भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे धुळे जिल्ह्यात काँग्रेसला मोठा धक्का बसल्याचे दिसून येत आहे.

## शेतकऱ्यांच्या अपमानाचा मुद्दा : नाना पटोलेंवर निलंबनाची कारवाई

**मुंबई, दि. १ प्रतिनिधी**

पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधानसभेत शेतकऱ्यांच्या मुद्द्यावरून प्रचंड गदारोळ पाहायला मिळाला. कृषिमंत्री आणि भाजपचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या शेतकरी विरोधी विधानांनी विरोधक आक्रमक झाले. महाविकास आघाडीच्या आमदारांनी शेतकऱ्यांचा सातत्याने अपमान करणाऱ्या सत्ताधाऱ्यांवर संताप व्यक्त करत, "मुख्यमंत्र्यांनी जनतेची आणि शेतकऱ्यांची माफी मागावी," अशी जोरदार मागणी केली.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभाध्यक्षांच्या आसनाजवळ जाऊन या विषयावर आक्रमक भूमिका घेतली. त्यामुळे सभागृहाचे कामकाज पाच मिनिटांसाठी तहकूब करावे लागले. कामकाज पुन्हा सुरू होताच, विरोधकांनी 'माफी मागा'च्या जोरदार घोषणा दिल्या. यावेळी अध्यक्षांनी शिस्तभंगाच्या कारवाईत नाना पटोलेंना एक दिवसासाठी निलंबित केले.

**"शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बोलले म्हणून निलंबन? हा अन्याय आहे" – वडेट्टीवार**

विधानसभेत विरोधकांना शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बोलू न देणे, नंतर त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करणे, हे सत्ताधाऱ्यांचे खरे स्वरूप दाखवते, असा घणाघात वडेट्टीवार यांनी केला.




"शेतकऱ्यांसाठी आम्ही आंदोलन करू, गरज पडल्यास तुरुंगातही जाऊ, पण बळीराजाच्या हक्कासाठी आवाज उठवतच राहू," असे त्यांनी ठामपणे सांगितले.

राज्यातील बारा जिल्ह्यांतील शेतकरी शक्तिपीठ महामार्गाला विरोध करत आहेत. मात्र, कृषिमंत्री आणि आमदार लोणीकर शेतकऱ्यांविषयी उपकाराची भाषा करतात, "शेतकरी आमच्या पैशावर जगतात," असे विधान करून त्यांचा अपमान करतात. "अशा वक्तव्यांवर सरकारने कारवाई करणार की समर्थन करणार?" असा रोखठोक सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

**पूर्ण दिवसाचे कामकाज विरोधकांकडून बहिष्कृत**

शेतकऱ्यांचा मुद्दा दडपण्यासाठी सत्ताधारी जनमत दडपण्याचा प्रयत्न करत आहेत, या आरोपासह महाविकास आघाडीच्या आमदारांनी आजच्या पूर्ण दिवसाचे कामकाज बहिष्कृत करून सभात्याग केला. त्यामुळे पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्याच दिवशी सरकारला कडव्या विरोधाला सामोरे जावे लागले.

## आर्थिक फसवणुकीच्या संदर्भात लोकांनी जागरूक राहिले पाहिजे -मुख्यमंत्री



**मुंबई, दि. १ प्रतिनिधी**

राज्यात उघडकीस आलेल्या टोरेस घोटाळयासंदर्भात विधानसभेत प्रश्न विचारण्यात आला. अशा प्रकारच्या आर्थिक फसवणुकीच्या घटनांबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली. याबद्दल बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रातील जनतेला आवाहन केले. पोलिसांकडून केल्या जात असलेल्या उपाययोजनांबद्दलही मुख्यमंत्री फडणवीस यांनी माहिती दिली.

विधानसभेत बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, "अशा प्रकारची आमिषे दाखवणाऱ्या कंपन्या, आकर्षक परतावा देण्याच्या योजना चालवणाऱ्या कंपन्या याच्यामध्ये गुंतवणूक करू नका अशी मोहीम पोलिसांनी हाती घेतली आहे. जाहिराती पण दिल्या आहेत. त्यासंदर्भात जनजागृतीची मोहिमही हाती घेण्यात आली आहे. अर्थात अशी कंपनी सुरू झाल्याबरोबर पोलिसांना कारवाई करण्याचा मार्ग नाहीये. कारण अशी कंपनी सुरू करण्यासाठी कंपनी अधिनियमाच्या अंतर्गत नोंदणी करावी लागते. पोलिसांची परवानगी घ्यावी लागत नाही."

"आपण आर्थिक गुप्तचर शाखाही सुरू केली आहे. कंपन्यांनी अधिकचा नफा देणाऱ्या जाहिराती दिल्या. तर त्या आधारावर कारवाई आपण करतो आहे. पण, यामध्ये व्यापक जनजागृती हाच एक महत्त्वाचा विषय आहे. कारण अनेकवेळा अशा घटना घडलेल्या आहेत की, या कंपन्या नोंदणीकृतही नसतात. कुणाची परवानगी नसते. थेट बोर्ड लावतात. लोकांकडून पैसे घेतात. पहिले दोन-तीन महिने व्याज सांगितलेलं असतं, तसं परत करतात. नंतर सगळा गाशा गुंडाळून गायब होतात", असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

"मी या सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेला विनंती करतो की, कुणीही तुम्हाला अधिकचं व्याजदर देण्याची हमी देत असेल किंवा तशी योजना आणत असेल, तर विश्वास ठेवू नका. त्यांच्याकडे सगळ्या परवानग्या आहे की, नाही बघा. ते कशाच्या आधारावर देणार आहेत? कुणीही स्वतःच्या खिशातून पैसे देत नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या फसवणुकीच्या संदर्भात लोकांनी जागरूक राहिले पाहिजे. पोलिसही जास्तीत जास्त जाणीव जागृतीचा कार्यक्रम हाती घेतील", अशी माहिती फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

## रवींद्र चव्हाण भाजपचे नवे प्रदेशाध्यक्ष

**मुंबई, दि. १ प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपला नवीन प्रदेशाध्यक्ष मिळाला असून रवींद्र चव्हाण यांच्या नावाची अधिकृत घोषणा झाली. वरळीमध्ये झालेल्या जय्यत कार्यक्रमामध्ये रवींद्र चव्हाणांचे नाव जाहीर करण्यात आलं. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांच्यासह प्रमुख भाजप नेते उपस्थित होते.



रवींद्र चव्हाण यांची भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. रवींद्र चव्हाण हे भाजपचे नावाने बारावे अध्यक्ष असतील. मात्र ते विरोधकांचे राजकीय तेरावे घालतील, विरोधकांचे बारा वाजवल्याशिवाय राहणार नाही असं मुंबईचे अध्यक्ष आशिष शेलार म्हणाले. रवींद्र चव्हाण हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत विश्वासू नेते म्हणून ओळखले जातात. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारसरणीचे नेते अशीही त्यांची ओळख आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून काम केलं. तसेच देवेंद्र फडणवीस यांचे सरकार सत्तेत आल्यानंतर त्यांनी भाजपचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून काम पाहिलं. चंद्रशेखर बावनकुळे यांच्यानंतर ते भाजपचे १२ वे अध्यक्ष म्हणून काम पाहतील.

## दोन वर्षांत 3.5 कोटी नोकऱ्या देणाऱ्या योजनेला केंद्राची मंजुरी

**नवी दिल्ली, दि. १ वृत्तसंस्था**

मोदी सरकारने एम्प्लॉयमेंट लिंक्ड इनसेंटिव्ह (ELI) योजनेला मंजुरी दिली आहे. यानुसार येत्या दोन वर्षांत ३.५ कोटींहून अधिक रोजगार उपलब्ध केले जाणार आहेत. सर्वच क्षेत्रांमध्ये रोजगार निर्मिती करणे, नोकऱ्यांची क्षमता वाढविणे यासह सामाजिक सुरक्षा वाढविण्याची तयारी केली जात आहे.

देशातील बेरोजगारी कमी करणे हे या ईएलआय योजनेचे मुख्य उद्दीष्ट आहे. नवीन नोकरी करणाऱ्यांना म्हणजेच पहिल्यांदा नोकरी करणाऱ्यांना महिन्याचा पगार दोन टप्प्यांत दिला जाणार आहे. यासाठी १५,००० रुपयांपर्यंतचा मासिक पगार गृहीत धरण्यात आला आहे.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याची माहिती दिली आहे. दोन वर्षांत ३.५ कोटींहून अधिक रोजगार निर्मितीला प्रोत्साहन मिळणार असल्याचे ते म्हणाले. यासाठी त्यासाठी १ लाख कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. सर्वांशी चर्चा करून ही योजना तयार करण्यात आली आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पात घोषणा केली होती, असे त्यांनी सांगितले.

या योजनेसाठी एकूण दोन लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ४.१ कोटी तरुणांना रोजगार, कौशल्य आणि आर्थिक संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पंतप्रधानांच्या पाच योजनांच्या पॅकेजचा भाग म्हणून २०२४-२५ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात ELI योजनेची घोषणा करण्यात आली होती.

# अलिबाग-वडखळ रस्त्यावर जीवघेणे खड्डे

**अलिबाग |** अलिबाग-वडखळ मार्गावर मोठ मोठे जीवघेणे खड्डे पडले असून, ते बुजवायचे कोणी? असा प्रश्न सध्या निर्माण झाला आहे. या मार्गावर दररोज कुठे ना कुठे अपघात होत असताना, संबंधित विभागाला मात्र याचे काहीच सोयरसुतक नसल्याचे समजते. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता रस्ता आमच्या अखत्यारित नाही, एनएच-1 यांच्याकडे आहे. त्यामुळे रस्ता दुरुस्तीचे काम आमचे नाही, असे सांगून त्यांनी जबाबदारी झटकण्याचे काम केलेय. त्याचप्रमाणे अलिबाग ते रेवदंडा हा रस्ताही एमएसआरडीसीकडे वर्ग केला असून, त्याच्या दुरुस्तीची जबाबदारी त्या



विभागाची असल्याचे सांगितले. मग, सार्वजनिक बांधकाम विभागाकडे काम तरी काय? असा सवाल आता स्थानिक नागरिक विचारु लागले आहेत.

अलिबाग-वडखळ मार्गावर सुरुची हॉटेलजवळ, पिंपळभाट, गोंधळपाडा, गोकुळेश्वर, वाडगावफाटा, खंडाळा, कार्लेखिंड, तिनवीरा, पेझारी, पोयनाड, वडखळ आदि ठिकाणी मोठ मोठे खड्डे पडले आहेत. या मार्गावरुन रात्री-अपरात्री जाताना मोठे अपघात होत आहे. अनेकदा दुचाकी खड्ड्यात अडकून अपघात होत आहेत. चारचाकी वाहने खड्ड्यात जोरात आदळून अपघात होत असून, वाहने नादुरुस्त होण्याच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता डोंगरे यांना संपर्क साधला असता, हा रस्ता एनएच-1 या विभागाकडे वर्ग असल्यामुळे रस्त्याच्या दुरुस्तीचे काम त्या विभागाचे असल्याचे सांगत त्यांनी सांगितले. रस्ते अपघातात आज निष्पाप लोकांचे जीव जात असताना, वाहने नादुरुस्त होत असताना अधिकाऱ्यांना मात्र रस्त्याची मालकी आठवतेय, याबाबत सर्वसामान्य जनतेतून चीड आणि संताप व्यक्त होत आहे.

**चौलनाका दुचाकीसाठी धोकादायक**

अलिबाग-रेवदंडा मार्गावरील महत्त्वाचे ठिकाण असणारा चौलनाका दुचाकींसाठी धोकादायक ठरत आहे. याआधी येथे मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याने सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढे येत दगडखडीचा भराव केला आहे. परंतु, आज याठिकाणी दुचाकी स्लीप होणे, दुचाकीची चाके जागेवरच फिरणे असे प्रकार घडत असून, अनेक दुचाकीस्वार पडून त्यांना दुखापती झाल्या आहेत. परंतु, संबंधित विभागाचे अधिकारी चारचाकीतून फिरत असल्याने त्यांना याचे गांभीर्य नाही. अधिकाऱ्यांनी येथून दुचाकीने प्रवास करावा, मग त्यांना समजेल, प्रवास कसा करतोय आम्ही, असा संताप स्थानिकांनी व्यक्त केला आहे.

अलिबाग ते वडखळ रस्ता एनएच-1 विभागाच्या अखत्यारित असून, त्याची डागडुजी, दुरुस्ती करण्याचे काम त्यांचेच आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे रस्त्याची जबाबदारी नाही. त्याचप्रमाणे अलिबाग ते रेवदंडा, पाल्हे बायपाससहीत हा रस्ता एमएसआरडीसीकडे वर्ग करण्यात आला असून, या रस्त्याच्या दुरुस्ती या विभागाने करणे अपेक्षित आहे.
डोंगरे,
उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

# रोहा तालुका शेकाप पुरोगामी युवक संघटने चीं सभा मोठ्या उत्साहात संपन्न

रोहा | रोहा तालुका शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने पुरोगामी युवक संघटनेच्या प्रमुख पदाधिकारी सभा रोहा येथे मोठ्या उत्साहात पार पडली यावेळी तालुक्यातील पक्षाचे पुरोगामी युवक संघटनेचे युवा पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.

शेतकरी कामगार पक्षाच्या रोहा तालुका पुरोगामी युवक संघटनेच्या वतीने पदाधिकारी यांची बैठक पक्ष्याचे ज्येष्ठ नेते शंकरराव म्हसकर यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या निवासस्थानी मोठ्या उत्साही वातावरणात पार पडली.यावेळी नवनिर्वाचित तालुका चिटणीस शिवराम महाबळे , जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य मारुती खांडेकर सर, विठ्ठल



मोरे, पुरोगामी युवक संघटनेचे अध्यक्ष संतोष दिवकर, उपाध्यक्ष रवींद्र झावरे, अमोल शिंगरे, सदस्य पोश्या कांबळे, महादेव शाब्बासकर, मंगेश खरीवले, शिरीष महाबळे,अरुण चौगले, महेन्द्र पार्टे सह आदी बहुसंख्येने प्रमुख पदाधिकारी व युवा कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

प्रसंगी यावेळी उपस्थित पदाधिकारी यांना मार्गदर्शन करतांना ज्येष्ठ नेते शंकरराव म्हसकर यांनी सांगितले की युवकांसाठी पक्षाची बांधिलकी, त्याच बरोबर गावागावात पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते यांच्या विचारसरणीशी जुळून पक्ष वाढीवर भर दिले पाहिजे तसेच तळागातील नागरिकांच्या समस्या त्यांच्या सर्वांगिक विकासाला चालना दिली पाहिजे शेतकरी, श्रमजीवी, कष्टकरी, कामगार, यांच्या न्याय हक्कांसाठी सदैव लढा देणारा पक्ष आहे

# रायगड जिल्हा शिंपी समाज महिला मंडळाचा मेळावा उत्साहात संपन्न

**तळा |** महाराष्ट्र राज्य नामदेव महिला परिषदेच्या पदाधिकारी व नवनित महिला मंडळ तळे यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हा नामदेव शिंपी समाज महिला वर्गाचा मेळावा उत्साहात संपन्न झाला. शहरातील श्री देव राधाकृष्ण मंदिर सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मृदुला रोडे हिने स्वागत गीत गाऊन तसेच उपस्थित मान्यवरांचे शाल,श्रीफळ, पुष्पगुच्छ व प्रतिमा देऊन स्वागत करण्यात आले. सदर मेळाव्यास पुण्याहून आलेल्या उषा पोरे, शर्मिला खांडके, संगिता नाझरे, उज्वला गाटे, भारती वनारसे, निलिमा पिसे या महिला पदाधिकाऱ्यांनी उत्तम असे मार्गदर्शन केले व नागपूर



येथे होणाऱ्या संत नामदेव महाराज राष्ट्रीय एकात्मता विश्व महा संमेलन २०२६ ला संपूर्ण देशातून महिलांनी उपस्थित रहाणेकरता आवाहन केले.तसेच यावेळी रायगड जिल्हा नामदेव शिंपी समाज महिला पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.ज्यामध्ये अध्यक्ष पदी मनिषा संदीप शिंत्रे पनवेल,उपाध्यक्ष पदी प्रतिभा प्रदीप बागडे मुरुड,उपाध्यक्ष पदी राजेश्री राजेंद्र बागडे महाड,सचिव पदी रोशनी रघुनंदन रोडे तळा यांची निवड करण्यात आली.हा मेळावा यशस्वीरित्या पार पाडण्याकरता नवनित महिला मंडळाच्या अध्यक्षा प्रमोदिनी मेकडे, सचिव स्मिता मुद्राळे, मनिषा शिंत्रे, रोशनी रोडे, संगिता कजबजे यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्मिता मुद्राळे, सूत्रसंचालन स्वरा सचिन मुद्राळे तर आभार प्रमोदिनी मेकडे यांनी मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# माणगाव मध्ये अजय चव्हाण यांच्या कडून शाळांना वह्या वाटप



**माणगाव |** सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या अजय चव्हाण( रुबी स्टार DS ) ए डब्ल्यू पी एल कंपनीचे आरोग्य सल्लागार आणि टीम यांच्या मार्फत माणगाव मधील केंद्र उतेखोल येथील नानोरे , कळमजे , बामणोली येथील रायगड जिल्हा परिषद शाळा ना मंगळवार दिनांक १ जुलै रोजी सर्व विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आल्या . यावेळी उतेखोल केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे ,नानोरे शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वाटवे,सहशिक्षिका वनिता डोळस, कळमजे शाळेचे मुख्याध्यापक सुदर्शन भागवतराव वाघोरकर, सहशिक्षिका सीमा भांड, बामणोली शाळेच्या मुख्याध्यापिका सुधा मोरे,सहशिक्षिका वैशाली पवार तसेच सुप्रिया कडवेकर , जान्हवी कुशवाह, गणेश दबडे ,शिवानी सावंत , महेंद्र शिगवण, वर्षा साखरे , आशा पवार, अमिता बारटक्के , मंदा उभारे ,मानसी चव्हाण, सुदर्शन ढोंबरे, अक्षय काणसे , ओम मोरे व सर्व शाळेतील शालेय व्यवस्थापन समिती सदस्य ग्रामस्थ,पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुधागड पाली बसस्थानकाच्या दुरवस्थेवर सुधागडवासियांचे परिवहन मंत्र्यांना निवेदन

**सुधागड |** रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील पाली बसस्थानकाची पाच वर्षांपासून झालेली दुरवस्था दूर व्हावी,यासाठी सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ, ठाणे यांच्यावतीने महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक यांना निवेदन देण्यात आले. यावेळी ठाणे ते पाली-कोशिंबळे दरम्यान नियमित बस सेवा सुरू ठेवावी आणि सायंकाळी ४.३० वाजता नवीन बस सेवा सुरू करावी, अशीही मागणी करण्यात आली.

ना. सरनाईक यांनी नागरिकांच्या मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेत पालीसाठी तत्काळ दोन बस फेऱ्या वाढविण्याचे आदेश संबंधित परिवहन अधिकाऱ्यांना दिले. त्यांनी पेण एसटी डेपोच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून पाली बसस्थानकाच्या नुतनीकरणाची कार्यवाही लवकरच सुरू करण्याचे आश्वासन दिले.

या वेळी सेवा संघाचे अध्यक्ष विठ्ठल घाडगे, उपाध्यक्ष वसंत लहाने, संपर्कप्रमुख सुनील तिडके, शाखाप्रमुख अनिल भोईर, सल्लागार विठ्ठल खेरटकर, गणपत डिगे, रमेश सागळे, कार्याध्यक्ष प्रकाश शिलकर, क्रीडासमिती प्रमुख राकेश थोरवे, प्रसिद्धी प्रमुख अजय जाधव, सांस्कृतिक समिती प्रमुख जनार्दन घोंगे, उपखजिनदार विजय जाधव, हिशेब तपासनीस दत्ता सागळे, प्रवीण बामणे तसेच श्री भैरवनाथ क्रीडा मंडळ नागशेत, कोशिंबळे ग्रामस्थ मंडळ आणि सुधागडवासी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाली हे अष्टविनायकातील एक प्रसिद्ध धार्मिक स्थळ आणि सुधागड तालुक्याचे मुख्य ठिकाण असूनही बसस्थानकाचे नुतनीकरण मागील पाच वर्षांपासून पूर्णपणे थांबले आहे. स्थानक



परिसरात खड्डे, पाणी साचणे, चिखल, दुर्गंधी यांसारख्या समस्या निर्माण होतात. जुन्या धोकादायक इमारतीची तोडफोड झाल्यानंतर तात्पुरत्या शेडचे काम झाले मात्र त्यानंतर कोणतेही प्रकल्प सुरू झालेला नाही. जुन्या इमारतीचा राडारोडा अजूनही परिसरात पडून आहे. तुटलेल्या नाल्याच्या स्लॅबमुळे बस वाहतुकीस अडथळा निर्माण होतो.

पावसाळ्यात एसटी स्थानक पूर्णपणे जलमय झाल्याने प्रवाशांना गाव-पाड्यांत जाण्यासाठी मोठी गैरसोय होते. ठाणे शहरासाठी बसफेऱ्यांमध्ये वाढ ही अत्यावश्यक आहे.

# काशीद येथे पर्यटकांचा पाण्यात बुडून मृत्यू

**मुरुड जंजिरा |** मुरुड तालुक्यातील काशीद समुद्र किनारी पुणे येथील पर्यटकांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. तनिष्क मल्होत्रा वय 20 राहणार बावधन तालुका हवेली जिल्हा पुणे. याच्याबरोबर येथील चार युवक काशीद समुद्र किनारी फिरावयास आले होते.सध्या काशीद येथील सर्व सेवा व पर्यटक यांना सेवा देणाऱ्या सर्व टपऱ्या बंद आहेत. समुद्र किनारी सर्व सेवा बंद असताना पदवीधर च्या शेवटच्या वर्षात शिकत असणारी ही चार मुले समुद्रात पोहण्याची इच्छा निर्माण झाल्याने दुपारच्या दरम्यान पाण्यात पोहण्यास गेली असता. खवळेला समुद्र व खोल पाण्याचा अंदाज न आल्याने यातील तनिष्क मल्होत्रा वय 20 या तरुण युवकाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे.या बाबत मुरुड पोलिस ठाण्यात याची रीतसर नोंद करण्यात आली आहे.या बाबत काशीद सरपंच संतोष राणे यांनी सांगितले की,सध्या काशीद समुद्र किनार बंद ठेवण्यात आला आहे.पावसाळी हंगाम असल्याने हा किनारा बंद ठेवण्यात आला आहे.परंतु काही उत्साही पर्यटक कोणालाही न जुमानता थेट समुद्रात उतरत आहेत.त्यामुळे अशा दुर्दैवी घटना घडत आहेत.पावसाळी हंगाम असल्याने समुद्रात पोहण्यास जाऊ नये असे आवहन करण्यात आले आहे.

# ब्रह्माकुमारीज उरण केंद्रात 10वी व 12वी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रेरणादायी सन्मान सोहळा

**उरण |** २९ जून २०२५ रोजी ब्रह्माकुमारीज राजयोग ध्यान केंद्र, उरण येथे एक विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात १०वी व १२वीच्या बोर्ड परीक्षेत ७५% पेक्षा अधिक गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.उरण येथील विविध शाळांमधून ३० हून अधिक विद्यार्थी आणि काही पालक या कार्यक्रमात सहभागी झाले. या उपक्रमाचे उद्दिष्ट होते विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे, आत्मिक बळ प्रदान करणे, आणि जीवनात सकारात्मकता व एकाग्रता निर्माण करणे. कार्यक्रमाचे संचालन बीके प्रियांका बहन यांनी उत्साही व संयमित पद्धतीने केले.बीके तारा दीदी, जे उरण केंद्राच्या इंचार्ज आहेत, यांनी राजयोग ध्यान



अभ्यासक्रमाचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी स्पष्ट केले की ध्यानाच्या नियमित सरावाने मनाची एकाग्रता, आत्मविश्वास आणि शांतता यामध्ये वाढ होते. सीए बीके कुमुदिनी बहन यांनी डिजिटल डिटॉक्स विषयावर मार्गदर्शन केले. मोबाईल आणि सोशल मीडियाचा योग्य व मर्यादित वापर विद्यार्थ्यांसाठी किती आवश्यक आहे, हे त्यांनी सोप्या भाषेत स्पष्ट केले.बीके प्रमोदभाई यांनी सांगितले की, जीवनातील मोठमोठ्या अडचणी व आव्हानांनाही राजयोग ध्यानाच्या सरावाने सहजतेने पार करता येते. आत्मिक बळ आणि सकारात्मक दृष्टीकोन यामुळे मानसिक स्थैर्य प्राप्त होते.विशेष अतिथी जेष्ठ पत्रकार दिनेश पवार यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत, पालकांशी संवाद ठेवण्याचे, त्यांचा आदर करण्याचे आणि त्यांच्या सोबत दररोज काही वेळ घालवण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

# न्यू इंग्लिश स्कूल रावढळ विद्यालयात छत्रपती शाहू महाराज जयंती संपन्न

**महाड |** दिनांक 26 जून. न्यू इंग्लिश स्कूल रावढळ या विद्यालयात राजश्री छत्रपती शाहू महाराज यांची 151 वी जयंती संपन्न झाली त्यानिमित्ताने छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. प्राध्यापक देशपांडे सर यांनी राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनाविषयी त्यांच्या कार्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. या जयंतीनिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मोफत एसटी पास योजनेअंतर्गत विद्यार्थिनींना पास चे वाटप करण्यात आले. हे वाटप एसटीच्या अधीक्षक सौ. मिंढे मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. त्याबद्दल त्यांचे विद्यालयाकडून हार्दिक अभिनंदन व स्वागत करण्यात आले त्याचबरोबर आभार मानण्यात आले. गेली अनेक वर्ष विद्यालयातील विद्यार्थिनींना या योजनेचा लाभ मिळवून देणारे प्राध्यापक देशपांडे सर यांचेही अभिनंदन यावेळी करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री संतोष दवंडे सर यांनी केले.

न्यू इंग्लिश स्कूल रावढळ या विद्यालयात आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ विरोधी दिन संपन्न.

रावढळ : दिनांक 26 जून. न्यू इंग्लिश स्कूल रावढळ या विद्यालयात आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ विरोधी दिन संपन्न झाला. यानिमित्त महाड



तालुका पोलीस स्टेशनचे पीएसआय सन्माननीय श्री खेडेकर साहेब, महिला पोलीस हवालदार सौ शेलार मॅडम,तसेच श्री पाटील सर हे उपस्थित होते. यावेळी पीएसआय श्री खेडेकर साहेब यांनी अमली पदार्थाच्या सेवनाने शरीरा वरती कशा प्रकारचे परिणाम होतात, तसेच सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक परिणाम होतात याविषयी माहिती सांगितली. नशेमुळे सामाजिक गुंडगिरी कशाप्रकारे बळावते याविषयी मार्गदर्शन केले.

# माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्ताने महापालिका मुख्यालयात अभिवादन



**पनवेल |** हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्ताने आज महापालिका मुख्यालयात आयुक्त तथा प्रशासक श्री.मंगेश चितळे यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते

# भर बाजारात मध्यरात्री दोन दुकानांना आग

**पनवेल |** पनवेलमधील भर बाजारात मध्यरात्री दोन दुकानांना आग लागल्याची घटना घडली आहे. एका जागरूक नागरिकाच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली आग आटोक्यात आणण्यासाठी दोन अग्निशमन बंब लागले

# तळा तालुक्यातील वाढत्या स्थलांतरामुळे शाळेय विद्यार्थ्यांची पटसंख्या घटली

## दर्जेदार शिक्षणासाठी पालकांचा ओढा शहरी शाळांकडे

**तळा |** तळा तालुक्यात कंपन्या, कारखाने,उद्योगधंदे नसल्याने रोजगाराच्या शोधात तालुक्यातील नागरिकांचे स्थलांतर मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. परिणामी याचा फटका तालुक्यातील शाळांना बसून शाळेतील विद्यार्थ्यांच्या पटसंख्येत मोठी घट झाली असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. दुर्गम, डोंगराळ भागात वसलेल्या तळा तालुक्यात रोजगाराचे कोणतेही साधन नाही.परिणामी येथील नागरिकांना रोजगाराच्या शोधात शहराकडे स्थलांतरित व्हावे लागते.हळूहळू संपूर्ण कुटुंबच स्थलांतरित होऊ लागल्याने येथील विद्यार्थ्यांच्या संख्येत घट होऊन परिणामी शाळेतील विद्यार्थी पटसंख्येवर याचा मोठा परिणाम झाला आहे.तालुक्यातील अग्रगण्य शाळा असलेल्या गोपीनाथ महादेव वेदक विद्यामंदिरात काही वर्षांपूर्वी पाचवी ते दहावी



पर्यंत चारशे ते पाचशे विद्यार्थी पटसंख्या होती.मात्र वाढत्या स्थलांतरामुळे सध्या स्थितीत साडे तीनशे विद्यार्थी पटसंख्या आहे.ही पटसंख्या घटण्यामागे दर्जेदार शिक्षण हे आणखी एक कारण समोर येत आहे.आपल्या पाल्याला दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी बहुतांश पालक वर्गाने विविध शाळांमध्ये आपल्या पाल्याचा प्रवेश घेतला आहे.रायगड जिल्हा परिषदेची तळे मराठी शाळा व पिटसई येथील दर्जेदार शिक्षणासाठी प्रसिद्ध असलेल्या तसेच ग्रामीण भागात असूनही तीनशे च्या आसपास विद्यार्थी संख्या असलेल्या अशोक लोखंडे विद्यामंदिरात आपल्या पाल्याचा प्रवेश घेण्यासाठी पालकांची ओढ असल्याचे दिसून येते.तर काही पालक मुलांच्या शिक्षणासाठी शहराकडे वळली असून रोहा येथे असलेल्या राठी हायस्कूल मध्ये तालुक्यातील जवळपास अठ्ठावीस विद्यार्थी दररोज ये जा करून शिक्षण घेत आहेत. यामुळे आपसूकच या सर्वांचा परिणाम गोपीनाथ महादेव वेदक विद्यामंदिर शाळेवर झाला असून तालुक्यातील अग्रगण्य शाळा असूनही शाळेतील विद्यार्थी पटसंख्येत वाढ होत नसल्याचे चित्र पहायला मिळत आहे.

# पनवेल शहर पोलिसांनी दोन ठिकाणी छापा

**पनवेल |** पनवेल शहरातील कोळीवाडा येथील दोन वेगवेगळ्या पानटपऱ्यांवर पनवेल शहर पोलिसांनी टाकलेल्या धाडीत मोठ्या प्रमाणात हजारो रुपये किंमतीचा सुगंधी पानसाला व गुटख्याचा साठा पोलिसांनी हस्तगत केला आहे. महाराष्ट्रात गुटखा विक्रीस बंदी असताना सुद्धा अनेक जण याची छुप्या मार्गाने विक्री करीत असल्याची माहिती वपोनि नितीन ठाकरे यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि प्रवीण फडतरे, पोउपनि अस्पतराव , पो.हवा.अमोल पाटील, पो. हवा. तुषार बोरसे, पो. हवा. संदेश म्हात्रे, पो. हवा. माधव शेवाळे, पो. हवा महेश पाटील, पो. ना. मिथुन भोसले, पो. शि. विशाल दुधे आदींच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून या दोन वेगवेगळ्या पानटपऱ्यांवरून हजारो रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या प्रकारणी दोघा जणांना ताब्यात घेण्यात आले आहे

# वाशी शाळेतील विद्यार्थी थेट शेतात कृषी दिनी गिरवले शेतीचे प्रत्यक्ष धडे

## मुख्याध्यापक शर्मिला कोठेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अनोखा उपक्रम

**रोहा |** दि. १ जुलै: कृषी दिनाच्या निमित्ताने वाशी शाळेतील विद्यार्थ्यांनी शेतात जाऊन भात लागवडीचे प्रत्यक्ष अनुभव घेतले. मुख्याध्यापक श्रीमती शर्मिला कोठेकर यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

'पुस्तकी शिक्षणासोबत प्रत्यक्ष अनुभव महत्त्वाचा' या उद्देशाने राबवण्यात आलेल्या या उपक्रमाने विद्यार्थ्यांना शेतीच्या मुळाशी नेले.

विद्यार्थ्यांनी शेतात चिखलात



उतरून स्वतःच्या हाताने भात लागवडीची प्रात्यक्षिकं पाहिली व केली. मातीची मशागत, रोपे लावणे, पाण्याचे व्यवस्थापन, नैसर्गिक खतांचा वापर यासंदर्भातील माहिती शेतकरी बांधव व कृषी सहाय्यकांच्या मदतीने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात आली.

मुख्याध्यापक श्रीमती शर्मिला कोठेकर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा देत सांगितले, " आपल्या देशाचा कणा असलेली शेती प्रत्यक्ष समजून घेतली तर विद्यार्थ्यांमध्ये कृतज्ञता, मेहनत आणि वास्तवाशी जोड राहते. शिक्षण केवळ वर्गात न राहता शेतापर्यंत पोहोचलं पाहिजे." या वेळी शाळेतील सह शिक्षक गायत्री सोनवने , पुजा जंगम , विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते .



## वारकऱ्यांवरील हल्ल्याचे विधान परिषदेत पडसाद

**मुंबई, दि. १ : प्रतिनिधी**

पंढरपूर वारीला निघालेल्या वारकऱ्यांवर कोयता गँगने हल्ला केला. या गंभीर घटनेचे विधान परिषदेत मंगळवारी तीव्र पडसाद उमटले. शिवसेना (ठाकरे) आमदार अनिल परब यांनी स्थगन प्रस्ताव मांडून कायदा व सुव्यवस्थेच्या मुद्द्यावर सरकारला धारेवर धरले. सभापती राम शिंदे यांनी प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर स्थनग प्रस्ताव पुकारले. परब यांनी यावेळी पंढरपूर वारीवर झालेल्या हल्ल्याचा मुद्दा मांडला. ते म्हणाले की, राज्यात कायदा सुवस्थेचे धिंडवडे निघाले आहेत. अतिशय वाईट परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे. आता वारीची परंपरा असलेल्या महाराष्ट्रातील वारकऱ्यांवर कोयता गँगकडून हल्ला झाला आहे. या घटनेमुळे वारीला गालबोट लागले आहे. श्रीमंत, बिल्डरांना धमकावणारी गँग सर्वसामान्य वारकऱ्यापर्यंत पोहोचले आहेत. परंतु, अद्याप कोणतेही कारवाई झालेली नाही. महाराष्ट्रातील परंपरेला काळीमा फासला गेला असून परंपरेवर घाला घालण्याचे काम झाले आहे. गुंडाना कायद्याचा धाक राहिलेला नाही. सर्व मोकाट सुटले आहेत. दिवसागणिक गुन्हेगारी वाढत आहेत. वारकरी देखील गुंडांनी सोडलेले नाहीत. परिषदेचे सर्व कामकाज बाजूला ठेवून वारकऱ्यांप्रती कायदा सुव्यवस्थेवर चर्चा घ्यावी, अशी जोरदार मागणी परब यांनी केली. दरम्यान, सभापती राम शिंदे यांनी संबंधित स्थगन प्रस्तावावर निवदेन करण्याच्या सूचना दिल्या.

दहावीचा निकाल लागून महिना उलटला. अकरावीची प्रवेश प्रक्रिया अतिशय धिम्या गतीने सुरू आहेत. अशातच दोन दिवसांपूर्वी जाहीर केलेल्या यादीत मोठा घोळ आहे. प्रवेश प्रक्रियेत विभागणीय व जिल्हानिहाय समुपदेशन व मदत समित्या स्थापन करण्याचे निर्देश असताना, अजून समित्या जाहीर झालेले नाहीत. संचालनालयाच्या अख्यारित प्रक्रिया आलेल्याने हा प्रकार घडला का, असा संशय पालकांच्या मनात निर्माण झाला असून भीतीचे वातावरण आहे. खासगी कंपनीला काम दिल्याने सरुळीत प्रक्रिया होण्यासाठी पावले उचलावी, अशी

## वाळू चोरीत महसूल राज्य मंत्र्यांचा थेट हस्तक्षेप ?

### अनिल परबांचा गंभीर आरोप, सरकारला आव्हान – 'छोटे नाही, मोठा गडी पकडा'

**मुंबई, दि. १ : गजानन तुपे**

राज्यातील वाळू चोरी प्रकरणावरून विधिमंडळात आज मोठा राजकीय भूकंप झाला. शिवसेना (ठाकरे) पक्षाचे आमदार अनिल परब यांनी थेट महसूल राज्य मंत्र्यांवर वाळू चोरीत हस्तक्षेप केल्याचा गंभीर आरोप केला. परब यांच्या रोख्यातून गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्याकडे बोट दाखवले जात असल्याची चर्चा रंगली आहे.

विधान परिषदेत वर्धा नदीच्या काठावर अवैध वाळू साठ्याबाबत भाजप आमदार दादाराव केचे यांनी प्रश्न उपस्थित केला. त्यावेळी परब म्हणाले, "राज्यात वाळू धोरण असतानाही महसूल राज्यमंत्र्यांनी पकडलेली



वाळू गरिबांना देण्याऐवजी हस्तक्षेप केला. या प्रकरणाचे पुरावे, नोंदी, अहवाल माझ्याकडे आहेत. तीन दिवसांत ही पाच प्रकरणे सभागृहात पुराव्यासह मांडणार."

त्यांनी सरकारला रोखठोक सवाल केला, "तलाठी, तहसीलदार, पोलिसांवर कारवाई करता, मग मंत्री दोषी ठरले तर कारवाई करता का? हिंमत असेल तर दाखवा."

परब यांनी सरकारला आव्हान देताना स्पष्ट शब्दांत सांगितले, "छोट्या चिलटांवर कारवाई नका करू, मोठा गडी पकडल्यास तुमची ताकद मान्य करू. हीच वेळ आहे कणखरपणा दाखवण्याची."

या आरोपांमुळे सभागृहात एकच खळबळ उडाली. सत्ताधाऱ्यांनी मंत्र्याचे नाव जाहीर करण्याची मागणी केली. यावर सभापती राम शिंदे यांनी "कोणत्याही मंत्र्याचे नाव घेतले नाही" असा खुलासा दिला.

दरम्यान, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले, "संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल. अधिवेशन संपण्यापूर्वी या संदर्भात सरकारकडून निवेदन सादर केले जाईल."

अनिल परब यांच्या आरोपामुळे राज्य सरकारची गोची झाली असून वाळू माफियांवर कारवाईचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## गोंदणकलेला मिळणार शैक्षणिक दर्जा

### कला अभ्यासक्रमात समावेशासाठी सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांचे निर्देश

**मुंबई, दि. १ : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील पारंपारिक गोंदणकलेला शैक्षणिक दर्जा मिळणार असून, कला अभ्यासक्रमात तिचा समावेश करण्यासाठी तातडीने पावले उचलण्याचे आदेश सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिले आहेत. तसेच गोंदणकलेच्या सर्वंकष संशोधनासाठी अभ्यासगट स्थापन करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. आज मंत्रालयात पारंपारिक गोंदणकलाकारांच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या बैठकीत हा महत्त्वाचा निर्णय जाहीर करण्यात आला. यावेळी सांस्कृतिक कार्य उप सचिव महेश वाव्हळ, संचालक बिभीषण चवरे, सहसंचालक श्रीराम पांडे, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सहसचिव संतोष खारेगडे, कला संचालक किशोर इंगळे तसेच महाराष्ट्र गोंदणकला संस्कृती महामंडळाचे मच्छिंद्रजी भोसले, विश्वास दोर्वेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

गोंदणकला ही महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा अविभाज्य भाग असून, विवाह, सण, उत्सव, धार्मिक विधी यावेळी विविध समाजांमध्ये शरीरावर धार्मिक व सांस्कृतिक चिन्हे गोंदवण्याची प्राचीन परंपरा आहे. मात्र, आधुनिक तंत्रज्ञान व टॅटू आर्टच्या वाढत्या प्रचलनामुळे पारंपारिक गोंदणकला विस्मृतीत जाण्याच्या वाटेवर आहे, असे मंत्री शेलार यांनी सांगितले. "गोंदणकलेच्या माध्यमातून हजारो नवयुवकांना रोजगार मिळू शकतो. या कलेचे संशोधन होणे अत्यावश्यक आहे. कला अभ्यासक्रमात गोंदणकलेचा समावेश केल्यास, पारंपारिक कलेला आधुनिक शिक्षणाची जोड मिळून युवकांना उपजीविकेचा नवा मार्ग खुला होईल," असे मंत्री शेलार यांनी स्पष्ट केले.

यासाठी तातडीने अभ्यासगट स्थापन करून गोंदणकलेचे दस्तऐवजीकरण, प्रशिक्षण, संशोधन आणि शैक्षणिक अभ्यासक्रम तयार करण्याच्या प्रक्रियेला गती देण्याचे आदेशही देण्यात आले.

या निर्णयामुळे महाराष्ट्रातील पारंपारिक गोंदणकलेला जागतिक व्यासपीठ मिळणार असून, पारंपारिक कला टिकवण्यासाठी सरकारने उचललेले हे पाऊल ऐतिहासिक ठरणार आहे.

## मुंब्र्यातील अल्पवयीन मुलीवरील बलात्कार व हत्या प्रकरणावर सरकारचा कठोर पवित्रा; फास्ट ट्रॅक कोर्टात खटला

**मुंबई, दि. १ : प्रतिनिधी**



मुंब्रा येथे अल्पवयीन मुलीवर झालेला निर्घृण बलात्कार आणि हत्या प्रकरणाने राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. या हृदयद्रावक घटनेतील दोषींवर कठोरात कठोर कारवाई केली जाईल, असा ठाम इशारा गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानसभेत दिला.

आज प्रश्नोत्तराच्या तासात सदस्य देवयानी फरांदे यांनी या घटनेबाबत प्रश्न उपस्थित केला. त्याला उत्तर देताना गृहराज्यमंत्री कदम म्हणाले,

"पीडितेला तातडीने न्याय मिळावा म्हणून या प्रकरणाचा तपास जलदगतीने पूर्ण करून खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्यात येईल. आरोपीस अटक करण्यात आली असून त्याच्याविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहे."

तसेच, फॉरेन्सिक तपास अहवाल निश्चित वेळेत प्राप्त व्हावा यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. या गंभीर प्रकरणामुळे राज्यभरातून "दोषींना कठोरात कठोर शिक्षा द्या" अशी मागणी होत असून, सरकारने घेतलेला जलदगती निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

## आजपासून स्कूल बस बंद; वाहतूकदारांचाही चक्काजाम

**मुंबई, दि. १ : प्रतिनिधी**

मंगळवारी मध्यरात्रीपासून महाराष्ट्र राज्य ट्रक टेम्पो टँकर्स बस वाहतूक संघाच्या नेतृत्वाखाली सर्व वाहतूकदारांनी मध्यरात्रीपासून चक्काजाम आंदोलन छेडले असतानाच राज्यभरातील स्कूल बस मालकांनी बुधवारी २ जुलैपासून अनिश्चित काळासाठी संपावर जाण्याची घोषणा केली आहे.

स्कूल बस संपाने, शाळेत जाणाऱ्या मुलांचे हाल होण्याची शक्यता आहे. वाहतूक पोलिसांकडून बसचालकांवर होणारी अकारण कारवाई, सीसीटीव्ही, वेबरेडर व जीपीएस यांसारख्या सुविधांसाठी ई-चालानद्वारे होणारी दंडात्मक कारवाई, तसेच परवानग्यांसाठी होणारी अडवणूक या विरोधात शाळा बस ओनर्स असोसिएशनने या संपाची हाक दिली आहे.




स्कूल बसप्रमाणेच माल वाहतूकदारांचाही मंगळवारी मध्यरात्रीपासून सुरू होणारा संप हा खासकरून परिवहन विभाग आणि पोलिसांकडून होणारी पिळवणूक, अडवणूक विरोधात आहे. वाहतूकदारांकडून वसूल करण्यात येणारा ऑनलाईन दंड , दंडाची रक्कम कमी करणे, थकीत दंड माफ करणे, क्लिनरची सक्ती रद्द करणे, व्यावसायिक वाहनांची प्रवेश वेळेचा पुनर्विचार करणे, वाहनतळाची व्यवस्था करणे या सहा प्रमुख मागण्यांसह प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य ट्रक टेम्पो टँकर्स बस वाहतूक संघाच्या नेतृत्वाखाली १ जुलैच्या मध्यरात्रीपासून चक्का जाम आंदोलन पुकारले आहे. वारंवार सरकारकडे तक्रारही केल्या आहेत. मात्र चालकांचा त्रास काही कमी झाला नाही. याविरोधात आझाद मैदानात बेमुदत उपोषणही करण्यात आले. मात्र याचीही दखल सरकारने घेतली नाही. त्यामुळे १ जुलैच्या मध्यरात्रीपासून राज्यभरात चक्का जाम आंदोलन पुकारले आहे. हा निर्णय सर्व वाहतूक संघटनांनी घेतला असून राज्यभरातील सर्व वाहतूकदार सहभागी होणार असल्याचे महासंघाचे अध्यक्ष प्रकाश गवळी यांनी सांगितले. सर्व शैक्षणिक संस्थांनी तात्पुरते ऑनलाईन वर्ग घेण्याचा विचार करावा किंवा वेळापत्रकात बदल करावा. संप मिटेपर्यंत पालकांनी मुलांसाठी पर्यायी वाहतूक व्यवस्था करावी, असे स्कूल बस मालक संघटनेचे अध्यक्ष अनिल गर्ग यांनी म्हटले आहे.

## मुख्यमंत्र्यांनी नेहमीच माझ्याकडे लक्ष्य द्यावे : भास्कर जाधवांचा टोला

**मुंबई, दि. १ : प्रतिनिधी**

माझ्याकडे लक्ष दिल्याबद्दल मी मुख्यमंत्र्यांचे धन्यवाद मानतो. आम्हाला निधी देण्याबाबतही मुख्यमंत्र्यांनी नेहमीच अशी माझी काळजी घ्यावी, असा टोला शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि विधानसभेतील गटनेते भास्कर जाधव यांनी आज (दि. १) माध्यमांशी बोलताना लगावला.

"भास्कर जाधव यांच्या मनात काय आहे हे ते स्वत: सांगू शकतात. सध्या कविता, शेरोशायरी यातून ते आपल्या मनातील भावना व्यक्त करत आहेत. आता त्यांचे नवीन स्टेटस येईल, त्यावरून तुम्ही अंदाज बांधा, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सोमवारी माध्यमांशी बोलताना म्हणाले होते. यावर बोलताना भास्कर जाधव म्हणाले की, माझ्याकडे लक्ष दिल्याबद्दल मी मुख्यमंत्र्यांचे धन्यवाद मानतो. त्यांनी नेहमीच



अशी माझी काळजी घ्यावी. आम्हाला निधीही देत राहावा. आम्हाला निधी देण्याबाबतही मुख्यमंत्र्यांनी नेहमीच अशी माझी काळजी घ्यावी".

विरोधी पक्षनेतेपदावर बोलताना ते म्हणाले, "महाविकास आघाडीच्या सहमतीने माझे नाव विरोधी पक्षनेतेपदासाठी पुढे आले आहे. विरोधी पक्षनेतेपदाच्या निवडीसाठी सभागृहातील सदस्यसंख्येची १० टक्क्यांची अट असणे हे चुकीचे आहे. याबाबत मी सचिवांकडून माहिती घेतली असून, घटनेतही तशी तरतूद नाही. सभागृहातील सर्वात मोठ्या विरोधी पक्षाला हे पद देण्याची जबाबदारी विधानसभा अध्यक्ष आणि सचिवांची आहे. सरकारने यासाठी पुढाकार घ्यावा," अशी मागणीही त्यांनी केली.

नारायण राणे यांना आता मनसेचा पुळका येत असेलही;पण मनसे नेते प्रकाश महाजन यांनी त्यांच्यावर केलेली टीका पाहा.आता राणे यांनी इतरांची काळजी करण्यापेक्षा आपण स्वतः एवढे पक्ष का सोडले याचे उत्तर द्यावे, असा सवाल करत नारायण राणे आणि त्यांच्या मुलांची चोच नेहमी नरकातच असते. राणेंच्या मुलाने माझ्या टीकेला कोणत्या भाषेत उत्तर दिले हे सर्वांनी पाहिले आहे. उद्धव ठाकरे यांच्यावर गेली दहा वर्षे सातत्याने टीका करणाऱ्या राणे यांना आता दोन ठाकरे बंधू एकत्र येत असल्याने भीती वाटत. राणे कुटुंबीयांबद्दल मला यापुढे कोणतेही प्रश्न विचारू नका," असेही भास्कर जाधव यांनी केला.

## उत्पादन शुल्क वाढीविरोधात हॉटेल-बार व्यावसायिक आक्रमक; राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

**मुंबई, दि. १ : प्रतिनिधी**

राज्य उत्पादन शुल्क विभागाने मद्यावरील शुल्कात अचानक केलेल्या वाढीमुळे राज्यातील हॉटेल आणि बार व्यावसायिक आक्रमक झाले आहेत. ही नवी वाढ अन्यायकारक आहे. ती तात्काळ मागे घ्यावी, अन्यथा हॉटेल्स आणि बार बंद ठेवून राज्यव्यापी आंदोलन करण्याचा इशारा इंडियन हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशनने (एएचएआर) दिला आहे.




**काय आहे मागणी ?**

राज्य उत्पादन शुल्क विभागाने नुकताच मद्यावरील उत्पादन शुल्कात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. हॉटेल व्यावसायिकांच्या मते, गेल्या काही काळात परवाना शुल्क आणि इतर करांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. अशा परिस्थितीत कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक उत्पादन शुल्कात मोठी वाढ केल्याने व्यवसायाचे आर्थिक गणित कोलमडणार आहे. याचा उत्पादन शुल्कात अचानक मोठी वाढ केल्यामुळे याचा फटका ग्राहकांबरोबचर हॉटेल व बार व्यावसायिकांना बसणार असल्याचे इंडियन हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशनने म्हटलं आहे.

**पर्यटन क्षेत्रालाही फटका बसण्याची भीती**

सरकारने अचानक आणि मोठी शुल्कवाढ लादली आहे. यामुळे केवळ हॉटेल आणि बारच्या व्यवसायावरच नाही, तर ग्राहकांवरही मोठा बोजा पडणार आहे. महाराष्ट्रात येणाऱ्या पर्यटकांनाही याचा फटका बसेल आणि राज्याच्या पर्यटन क्षेत्रावर नकारात्मक परिणाम होईल. सरकारने असे निर्णय घेण्यापूर्वी व्यावसायिकांचे मत जाणून घेणे आवश्यक होते, अशी अपेक्षाही असोसिएशनने व्यक्त केली आहे.

**विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आंदोलनाचा इशारा**

राज्य सरकारने ही शुल्कवाढ तात्काळ मागे घ्यावी, अशी मागणी हॉटेल आणि बार व्यावसायिकांनी केली आहे. जर सरकारने या मागणीकडे दुर्लक्ष केले, तर आगामी विधानसभा अधिवेशनाच्या काळात राज्यभरातील हॉटेल्स आणि बार बंद ठेवून तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशाराही इंडियन हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशनने दिला आहे.

## वाहन चालकांची सुरक्षा वाऱ्यावर

### चर्चगेटमधील आयकर कार्यालियाजवळ भलामोठा खड्डा

**मुंबई, दि. १ : प्रतिनिधी**

चर्चगेट येथील आयकर कार्यालयानजिक महर्षी कर्वे मार्गावर गेल्या महिनाभरापासून वाहनचालकांना खड्ड्यातून प्रवास करावा लागत आहे. यामुळे प्रवासी, वाहनचालक संतप्त झाले असून प्रशासनाच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे. तसेच, प्रवाशांची सुरक्षाही ऐरणीवर आली आहे.



मुंबई खड्डेमुक्त करण्यासाठी महानगरपालिकेने हाती घेतलेली रस्ते काँक्रीटीकरणाची कामे पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर थांबविण्यात आली आहेत. मुंबईत दरवर्षी पावसाळ्यात रस्त्यांवर पडणाऱ्या खड्ड्यांमुळे मुंबई महापालिकेवर टीका होते. त्यामुळे दरवर्षी पावसाळापूर्व कामांचा भाग म्हणून खड्डे बुजविण्यासाठी निविदा मागवून कंत्राट दिले जाते. मात्र, यंदा एप्रिलऐवजी मे महिन्यात या कामासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. त्यामुळे रस्त्यावरील खड्डे बुजविण्याच्या कामांना पालिकेकडून उशिरा सुरुवात झाली.

दरम्यान, मुंबईतील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यावर पालिकेने भर दिला असला तरीही अनेक रस्त्यांवर खड्डे पडल्याने निदर्शनास येत आहे. चर्चगेट येथील आयकर कार्यालयाजवळील महर्षी कर्वे मार्गावर एक मोठा खड्डा पडला आहे. गेल्या महिनाभरापासून हा खड्डा जैसे थे असून अद्यापही पालिकेचे त्याकडे लक्ष गेलेले नाही.

परिणामी, वाहनचालकांना खड्ड्यातून प्रवास करावा लागत आहे. संबंधित रस्ता मुंबई महापालिकेच्या केंद्रीय रस्ते विभागाच्या अखत्यारित येतो. पालिकेचे विभाग ए, बी, सी आणि डी या भागांमध्ये रस्ते कामांसाठी सुमारे ५ कोटी रुपयांचे कंत्राट देण्यात आले होते. मात्र, कामांची अंमलबजावणी समाधानकारक नसल्याची खंत सामाजिक कार्यकर्ते संतोष दवंडकर यांनी व्यक्त केली.

संबंधित खड्डा फार मोठा असून गेल्या महिन्याभरापासून जैसे थे आहे. नागरिकांकडून वारंवार तक्रारी करण्यात येत असूनही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. या खड्ड्यामुळे शासकीय गाड्या, शाळेच्या बस, खासगी वाहनांच्या वाहतुकीत अडथळा निर्माण झाला आहे. तसेच, यापूर्वी अनेक वेळा दुचाकींचे अपघात झाले आहेत. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. चर्चगेट – चर्नी रोडदरम्यान महर्षी कर्वे मार्गावर अनेक ठिकाणी रस्ता उखडला आहे. रस्त्यांची योग्यरीत्या दुरुस्ती करण्यात आली नसल्याचेही दवंडकर यांनी सांगितले.

संबंधित रस्त्याची अद्याप दुरुस्ती झालेली नाही. त्यामुळे रस्त्यावर खड्डा पडल्याचे पालिकेतील अधिकाऱ्यांनी सांगितले. तसेच संबंधित खड्ड्यांची वेळीच दुरुस्ती का करण्यात आली नाही, याची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असे महानगरपालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

## मुंबई उपनगरांतील नद्या, तलाव होणार सांडपाणीमुक्त

**मुंबई, दि. १ : प्रतिनिधी**

मुंबईतील नदी व नैसर्गिक तलावांमध्ये सोडण्यात येत असलेले सांडपाणी रोखण्यासाठी विशेष आराखडा तयार करण्यात आला असून त्यानुसार कामे सुरू करण्यात आली आहेत. नदी, तलावांना पूर्वीचे वैभव मिळणार आहे.



पवई येथून उगम पावणाऱ्या मिठी नदीला पूर्वीचे वैभव प्राप्त करून देण्यासाठी स्वतंत्रपणे विकास सुरू आहे. परंतु मुंबईतील दहिसर, पोईसर, ओशिवरा या नद्या व अन्य नैसर्गिक तलाव प्रदूषण मुक्त करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. त्यानुसार आराखडा तयार करण्यात आला होता. यानुसार ही कामे सुरू करण्यात आली आहेत.

यासाठी स्वतंत्र मलनिःसारण वाहिनी टाकण्यात येत आहे. या वाहिनीमध्ये तलाव व नदीच्या आजूबाजूला राहणाऱ्या वसाहतीतील सांडपाणी सोडले जाणार आहे. हे सांडपाणी रोखल्यानंतर नदी व तलाव स्वच्छतेचा कार्यक्रम हाती घेऊन, किनाऱ्यावरील अनधिकृत बांधकाम हटवली जाणार आहेत. संरक्षण भिंतीसह टेहळणी करण्यासाठी सर्विस रोडही बांधण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे या पाण्यावर प्रक्रिया करून, ते समुद्र व नाल्यामध्ये सोडण्यात येणार आहे. ही कामे येत्या पाच वर्षात पूर्ण होणार आहेत.

**सांडपाण्यावर 100 टक्के प्रक्रिया करणे बंधनकारक**

राष्ट्रीय हरित लवादाने पर्यावरण सुरक्षा समिती आणि अन्य विरुद्ध 28 ऑगस्ट 2019 मध्ये दिलेल्या आदेशांनुसार, सर्व स्थानिक स्वराज्य संस्था आणि राज्य सरकारच्या अन्य संबंधित खात्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर 100 टक्के प्रक्रिया करून ते समुद्र अथवा नाल्यात सोडले जाते का, याची खात्री करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**वैभव प्राप्त होणार**

मिठी नदीनंतर आता पश्चिम उपनगरातील दहिसर, पोयसर व ओशिवरा या नद्यांच्या किनाऱ्याचे सुशोभीकरण करण्याचा निर्णय मुंबई महापालिकेने घेतला आहे. यात नद्यांचे रुंदीकरण व पाण्याची गुणवत्ता सुधारण्यात येणार आहे. त्यामुळे या नद्यांना पूर्वीचे वैभव प्राप्त होईल, असा विश्वास पालिकेकडून व्यक्त करण्यात आला.


**PUBLICATION NOTICE**
**DUE ON 04/08/2025 OR THEREAFTER.**
In The High Court of Judicature at Bombay
Interim Application No. 6675 of 2024 in
Family Court Appeal Stamp No. 6292 of 2024
Petition No. 3031/2016
Judge, 7th Family Court, Mumbai

Jitendra Shihori Rajbhar .....Appellent
**through Advocate : Rammani G. Upadhyay.**
Versus
Manisha Jitendra Rajbhar & ANR .......Respondents
To
**R. No.1 : Manisha Jitendra Rajbhar**
**R/AT : 525/2016, G.B.B.S.D. Nadar Welfare Society, Opposite Mushkurahat Building, Babrekar Nagar, Kandivali (West), Mumbai - 400067.**
**&**
**Also having Address At A Room At Ganesh Nagar, Petrol Pump, Khan Gali, Kandivali (West), Mumbai - 400066.**

Applicant has made an application to this court as mentioned in the copy of the interim Application.

Delay caused in preferring Family Court Appeal may be condoned etc.

The said application came up for hearing in the court on the 15/03/2024 and as ordered therein, you are given notice that this application shall be placed on board for first hearing/final disposal (order) in this court on the 04/08/2025 or thereafter at that time, you, either in person or through your advocate of this court, appear in this court and show cause as to why the order as per the application of the applicant should not be passed. If you fail to appear and show cause as aforesaid, order as per application of the applicant or as may be deemed fit and proper will be passed.

Witness SHRI. DEVENDRA KUMAR UPADHYAYA & SHRI. ALOK ARADHE, Chief Justice at Bombay aforesaid this 15th day of March, 2024 & 12th day of April, 2024 & 14th day of November, 2024 & 07th day of February, 2025.

**Clerk** **By order of the Court**
**Section Officer** **for Deputy Registrar**



ANAND RATHI आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एक्सप्रेस झोन, ए विंग, ८ वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, ओबेरॉय मॉलच्या समोर, गोरेगाव (ई), मुंबई ४०००६३. भारत
M/s. Muskan Trading Company LAN No. ARGFL/SME-LAP/MUM-1/1481 & APPL00008546

**ताबा सूचना**

तर, आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी, आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (२००२ चा कायदा ५४) अंतर्गत आणि कलमांखाली दिलेल्या अधिकारांचा वापर करून सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ३ सह १३(१२) वाचले, सिक्युरिटायझेशन आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि कलम १३ उप-कलम २ अंतर्गत डिमांड नोटिस जारी केली (तपशील खालील तक्त्यामध्ये, यापुढे डिमांड नोटीसमध्ये नमूद केले आहे) सिक्युरिटी इंटरेस्ट ऍक्ट, २००२ च्या अंमलबजावणीची कर्जदारांना (तपशिल खाली दिलेल्या तक्त्यामध्ये नमूद केले आहे, त्यानंतर कर्जदाराला) डिमांड नोटिसमध्ये नमूद केलेल्या रकमेसह पुढील आणि भविष्यातील व्याज एकत्रितपणे व्याजाच्या दराने परतफेड करण्याचे आवाहन डिमांड नोटिसच्या तारखेपासून (असल्यास) देय असलेले खर्च आणि शुल्क आणि इतर पैसे (जर असेल तर) डिमांड नोटिस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत एआरजीएफएल द्वारे देय आणि/किंवा वसूलीपर्यंत (यापुढे देय रक्कम).

कर्जदार (ते) आणि सह-कर्जदार (ते) देय रक्कम परत करण्यात अयशस्वी झाले आहेत, ही सूचना खाली नमूद केलेल्या कर्जदाराला विशेषतः आणि सर्वसाधारणपणे सार्वजनिकपणे दिली जाते की खाली स्वाक्षरीदाराने मालमत्ता/सुरक्षित मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे. (डिमांड नोटिस अंतर्गत परिभाषित केल्यानुसार) सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ च्या पोटकलम (४) अंतर्गत त्याला/तिला प्रदान केलेल्या अधिकारांच्या वापरात खाली वर्णन केले आहे. तारखेला सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ मध्ये खाली नमूद केले आहे.

कर्जदार आणि सह-कर्जदार (ने) विशेषतः आणि सामान्यतः लोकांना याद्वारे सावध केले जाते की मालमत्ता/सुरक्षित मालमत्तेशी व्यवहार करू नका आणि मालमत्ता/सुरक्षित मालमत्तांशी कोणतेही व्यवहार आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेडच्या शुल्काच्या अधीन असतील (विशेषतः खाली नमूद केले आहे) थकबाकीच्या रकमेसाठी पुढील आणि भविष्यातील व्याजासह त्यावरील व्याजाच्या दराने खर्च आणि शुल्क आणि एआरजीएफएल द्वारे पेमेंट आणि/किंवा वसूलीच्या तारखेपर्यंत (असल्यास) देय असलेले इतर पैसे आणि / किवा सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधण्यात आले आहे.

कर्जदाराचे नाव पत्ता: मेसर्स मुस्कान ट्रेडिंग कंपनी दुकान, रूम नंबर २, बीके नंबर ८५, देवजी पॅलेस, एसईएस स्कूल जवळ, शहाड स्टेशन रोड, उल्हासनगर-१, ठाणे: ४२१००१.

सह-कर्जदारांचे नाव पत्ता: १. श्रीमती रिंकू सुरेंद्र छाबरा, २. श्री. सुरेंद्र सिंग डी छाबरा, फ्लॅट क्रमांक १०१, पहिला मजला, विंग ई ०२, रोझवुड योगीधाम फेज ३, गौरी पाडा, कल्याण पश्चिम, ठाणे: ४२१३०१. ३. मेसर्स शुभम टेक्सटाईल्स दुकान, खोली क्रमांक २, बीके क्रमांक ८५, देवजी पॅलेस, एसईएस शाळेजवळ, शहाड स्टेशन रोड, उल्हासनगर-१, ठाणे: ४२१००१.

| मागणी सूचनेनुसार देय रक्कम लागू असलेल्या पुढील व्याजासह: रु. ४२,८८,५८८/- (रुपये बेचाळीस लाख अठ्ठ्याऐंशी हजार पाचशे अठ्ठ्याऐंशी फक्त) | | मागणी सूचनेनुसार देय रक्कम लागू असलेल्या पुढील व्याजासह: रु. २१,३१,२४२/- (एकवीस लाख एकतीस हजार दोनशे बेचाळीस फक्त) | |
|---|---|---|---|
| आरओआय | 13.00% | आरओआय | 13.00% |
| प्राचार्य थकबाकीदार | 3,966,658 | प्राचार्य थकबाकीदार | 2,029,117 |
| ईएमआय रक्कम प्रलंबित | 266,680 | ईएमआय रक्कम प्रलंबित | 79,710 |
| खंडित कालावधी व्याज | 12,892 | खंडित कालावधी व्याज | 10,258 |
| थकीत व्याजापेक्षा जास्त | 16,758 | थकीत व्याजापेक्षा जास्त | 4,337 |
| कायदेशीर शुल्क | 16,500 | नोटीस शुल्क | 1,100 |
| नोटीस शुल्क | 1,100 | ईएमआय बाऊन्स चार्जेस | 6,720 |
| ईएमआय बाऊन्स चार्जेस | 8,000 | एकूण थकबाकी | **21,31,242** |
| एकूण थकबाकी | **42,88,588** | | |
| मागणी सूचनेची तारीख: १९ एप्रिल २०२५ | | ताबा मिळाल्याची तारीख: ०१ जुलै २०२५ | |

कर्ज करार क्रमांक: ARGFL/SME-LAP/MUM-1/1481 & APPL00008546

मालमत्तेचा पत्ता: फ्लॅट क्रमांक १०१, पहिला मजला, विंग ई ०२, योगीधाम ई-२, रोझवुड सीएचएस, योगीधाम फेज तिसरा, गौरीपाडा, कल्याण पश्चिम, ठाणे: ४२१३०१

तारीख: ०१ जुलै २०२५
ठिकाण: मुंबई
एसडी/-, आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड अधिकृत कार्यालय

# हे कसले 'बबनराव' हा तर गावचा..?

**राजकारणात प्रदीर्घ काळ वावरणारे व मंत्रीपदाला गवसणी घालण्याचा अनुभव पदरी असलेल्या बबनरावांनी सामान्य माणसाला त्याची किंमत दाखवून दिल्याने ते 'बबनराव' नव्हतेच; तर गावातील पारावर बसून चकाट्या मारणारा 'बबन्या' होता हेच आता सिध्द झाले. लोक त्यांना विचारतात की, मोदींनी काय दिलं? फडणवीसांनी काय दिलं? आणि आमदाराने काय दिलं? पण, हे जगावेगळे बबनराव म्हणतात, गावात जे काही मिळालं, ते गेल्या २५ वर्षांत मीच दिलं. इतर कोणत्याही पक्षाच्या नेत्याने तुम्हाला माचिसची डब्बीही आणून दिली नाही. 'तुमच्या आई'चा पगारही मीच सुरू केला, 'तुमच्या बापा'ची पेन्शन मीच सुरू करून दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी तुमच्या बापाला बियाण्यासाठी सहा हजार रुपये दिले. लाडकी बहीण योजनेंतर्गत तुमच्या आई, बहीण आणि पत्नीच्या नावावर पैसे दिले. तुमच्या अंगावरचे कपडे, पायातील चप्पल-बूट आणि हातातील मोबाइल हे सर्व आमच्या सरकारच्या कृपेने आहे. तरीही आमच्या विरोधात बोलायची हिंमत करतात? आता या बबनरावांना विचारावेसे वाटते की, २०१४ आधी शेतकरी काय नागडे राहत होते काय? त्यांच्या बोलण्याने भाजपाची मानसिकता काय आहे? ते महाराष्ट्रातील सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी, मध्यमवर्गीय, गोरगरीब नागरिकांना दाखवून दिली, असेच आता म्हणावे लागेल. सरकार शेतकऱ्याला लाडक्या बहिणींना पैसे देते म्हणजे उपकार करत नाही किंवा हे पैसे सरकार देत असताना कोणीही सरकारकडे मागणी केली नव्हती, मोर्चे काढले नव्हते. आपली सत्ता जाणार म्हणून केलेला तो उद्योग होता. त्या भीतीपोटीच लाडक्या बहिणींना पंधराशे रुपये महिना सुरू केला, शेतकऱ्यांना वार्षिक सहा हजार सुरू केले. याचा अर्थ तुम्ही तुमच्या खिशातून हे पैसे देत नाही. हे पैसे तर सर्वसामान्य जनतेच्या कराच्या रूपाने जमा झालेल्या पैशातून शेतकऱ्यांच्या लाडक्या बहिणींचा खात्यात येतात. बबनराव तुम्ही आज जे सांगताय की, मोदीच्याच पैशाने तुमच्या पायात चप्पल आहे, अंगावर कपडे आहे, तर मोदी पंतप्रधान होण्याच्या आधी या महाराष्ट्रातील शेतकरी हा काय बिना कपड्याचा नागडा राहत होता काय? बिना चपलेचा आपली शेती कसत होता काय? खरंतर बबनराव तुम्हाला सत्तेचा माज चढला आहे आणि हा माज जनता एक ना एक दिवस नक्कीच उतरवेल. हा माज उतरणारच होता, म्हणूनच तुम्ही शेतकऱ्यांसाठी, बहिणींसाठी विविध योजना अमलात आणल्या. बबनराव देश २०१४ च्या पूवीर्ही शेतकरी, कष्टकरी, कामगार, देशातील नागरिक यांच्या घामावरच चालत होता. त्यापूर्वी सुद्धा शेतकऱ्याच्या आत्महत्या होत होत्या आणि त्यानंतर सुद्धा शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. एवढी सत्तेची गुर्मी असेल तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या का थांबत नाही बबनराव?**



परतूर तालुक्यातील वाटूर गावात हर घर सोलर योजनेच्या उद्घाटन कार्यक्रमात बबनरावांनी जी मुक्ताफळे उधळली त्याला तोडच नाही. पारावर बसणाऱ्यांना विशेषतः तरुण रिकामचोट आहे म्हणत त्यांनी टीका केली. पण त्यांना 'रिकामचोट' का रहावे लागते, याचा कधी त्यांनी गांभीर्याने विचार केला का?

लोकशाहीत ही भाषा योग्य वाटते का बबनराव? खरं म्हणजे तुमचे कपडे, बूट या जनतेमुळे मिळाले. आमदारकी जनतेमुळे प्राप्त झाली. तुमच्या गाडीतील डिझेल जनतेमुळेच आहे. तुमचे विमानाचे तिकीट जनताच काढते. विधानसभेतील सध्याचे स्थान जनतेमुळेच आहे. पण बबनराव हवेत गेले, ते खाली यायलाच तयार नाही. लोणीकरांचा 'तोल' गेला की त्यांचे 'लोणी' नासले, हे पहावे लागेल.

याआधीही लोणीकरांनी एका सभेत बोलताना ग्रामस्थांना इशारा दिला होता. विधानसभा निवडणुकीत लीड न मिळाल्याने लोणीकरांनी बोरगावात बोलताना म्हटले की, पाच वर्षांमध्ये कमळाचं एक बटन दाबायचं तेही केलं नाही. मी गावाला आठ कोटींचा सिमेंट रोड दिला. मला मत द्या किंवा नका देऊ. मी दोन-तीन वेळेस चव पाहणार, नाहीतर गावावर फुली मारणार. आता परिसराने बबनरावांना द्यायचे काय बाकी राहिले?

बबनराव लोणीकर परतूरमधून १९९९, २००४, २०१४, २०१९ आणि २०२४ मध्ये निवडून आले आहे. देवेंद्र फडणवीसांच्या २०१४ ते २०१९ या सरकारमध्ये पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री होते. तरीही त्यांच्यावर अन्याय झाला असे त्यांना वाटते.

शेतकरी हिताच्या चळवळीचे मुद्दे त्यांनी विधानसभेत मांडल्याचे कधी कोणी ऐकले नाही. शेतकऱ्यांविषयीची कळवळ दाखविली असती तर त्यांच्या विषयीचा आदर खूप वाढला असता. भ्रष्ट राजकीय वातावरणात शेतकऱ्याची बाजू प्रामाणिकपणे मांडणारा आज तरी कोणीही दिसत नाही.

एका बाजूला शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरूच असताना दुसऱ्या बाजूला मंत्र्यांची प्रॉपर्टी आकाशाला जाऊन पोहोचत आहे. संजय शिरसाठ नावाचे मंत्री शेकडो कोटी रुपयाचे हॉटेल अल्प किमतीत ताब्यात घेत आहे. ते कमी पडले म्हणून नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथे जमीन घेत आहे.

संदीपान भुमरेंच्या ड्रायव्हरच्या नावानं दीडशे कोटींची जमीन असल्याचं समोर आलंय. हैदराबादमधील सालार जंग कुटुंबीतील वंशजानं ही जमीन भूमरेंच्या ड्रायव्हरला 'भेट' म्हणून दिलीय. याप्रकरणी खासदार संदीपान भुमरे, आमदार विलास भुमरे आणि त्यांचा चालक जावेद रसूल यांची आर्थिक गुन्हे शाखेकडून चौकशी सुरू असली, तरी तो टाईमपास आहे.

संभाजीनगरमधील जालना रोडवरील दाऊदपुरा येथील ही तीन एकर जमीन आहे. ड्रायव्हरला गिफ्ट मिळालेल्या जमिनीची आमचा काही संबंध नाही. असं स्पष्टीकरण शिवसेनेचे आमदार विलास भुमरे यांनी दिलं असलं तरी सामान्य माणसांना असे गिफ्ट का मिळत नाही. सत्तेवर बसलेल्या नेत्यांच्या ड्रायव्हरला दीडशे कोटीची प्रॉपर्टी मिळत? असेल, तर शेतकऱ्यांची पोरंही त्यांच्याच काय बबनरावांच्या गाडीवर ड्रायव्हर म्हणून यायला तयार आहे.




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

### बबनशेठ इकडे पण लक्ष द्या ना!

अतिवृष्टीचा तडाखा, शेतमालाला भाव नाही, सरकारकडूनही पुरेशी मदत नाही या सर्व परिस्थितीत शेतकरी हतबल झालेला दिसून येतोय. त्यात कोरोना काळात त्यांच्या वाट्याला नको ते आलं. अशात मुलांचं शिक्षण, बँका आणि खाजगी कर्ज याच शेतकरी गुरफटून गेला आणि अशात मग अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्येचा मार्ग निवडला. अडीच वर्षांत राज्यातील सहा हजार ५८९ नी आत्महत्या केल्या आहे. हा आकडा खुप धक्कादायक आहे. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी अनेकदा प्रयत्न झाले, पण त्याची प्रभावी अंमलबजावणी झाली नाही. आत्महत्याग्रस्त शेतकरी परिवाराला सरकारच्या सर्व योजनांचा लाभ एकाच ठिकाणी मिळावा, अशी सोय करण्याचा निर्णय झाला. पण, पुढे काही झाले नाही. सर्वाधिक शेतकरी आत्महत्या अमरावती विभागात झाल्या आहेत. अडीच वर्षांत त्याठिकाणी दोन हजार ८०१ तर संभाजीनगर विभागातही दोन हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला सरकारकडून दोन-तीन लाखांची मदत मिळते. पण, मदत देण्याआधी आत्महत्येची कारणे, तो शेतकरी होता का, अशा विविध कारणांची पडताळणी केली जाते. अडीच वर्षांत सहा हजार ५८९ शेतकऱ्यांपैकी एक हजार ७०० कुटुंबांना अद्यापही मदत मिळालेली नाही. हतबल बळिराजाकडून खासगी सावकारांनी व्याजाने दिलेल्या रकमेपोटी जमिनी बळकावल्याच्या तक्रारी वाढत आहेत. अशावेळी बबनराव तुम्ही त्यांच्यासाठी काय केले ते तरी एकदा सांगा!

### मस्तवाल बबनराव आपली शैक्षणिक पात्रता काय?

बबनराव लोणीकर यांची शैक्षणिक पात्रता निवडणूक आयोगाला दिलेल्या प्रतिज्ञापत्रात वेगवेगळी माहिती नमूद केलेली दिसते. २००४ आणि २००९ च्या उमेदवारी अर्जामध्ये त्यांनी नाशिकच्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून बीए प्रथम वर्ष केल्याचे म्हटलं होतं. पण, २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी आपण केवळ पाचवी उत्तीर्ण असल्याचं प्रतिज्ञापत्रात नमूद केलं आहे. याआधीच्या निवडणुकीत पदवीधर असलेले लोणीकर नंतरच्या निवडणुकीत केवळ पाचवी उतीर्ण कसे? देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून ते आजपर्यंत शासनाने शिक्षणामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली व खर्चही केला, परंतु हाती काय लागले तर बेरोजगारी, दारिद्रय, गुन्हेगारी व सरतेशेवटी आत्महत्या. याचे मुख्य कारण म्हणजे शिक्षणाचे झालेले बाजारीकरण होय. याचाच अर्थ आपण या समाजात शिक्षण व्यवस्थित रुजविले नाही, त्यासाठी योग्य अभ्यासक्रम निर्माण करू शकलो नाही. जो अभ्यासक्रम निर्माण केला तोदेखील का, कशासाठी शिकायचा, हेही निश?चित करू शकलो नाही. या शिक्षण व अभ्यासक्रमातून केवळ अंकाची स्पर्धा निर्माण केली. जो परीक्षेत अधिक अंक घेईल तो अधिक गुणवान ठरतो. असे म्हटले जाते की गुणवत्तापूर्ण शिक्षण हाच सुसंस्कृत समाजाचा पाया आहे. पण बबनरावांनी गुणवत्ता पूर्ण शिक्षण घेतलेच नाही, त्यामुळे आता त्यांच्याकडून शेतकऱ्यांनी व त्यांच्या पोरांनी अपेक्षा तरी काय कराव्यात ?

# वर्षा सहलीचा आनंद लुटा पण...

राज्यात सर्वदूर पाऊस पडत आहे. काही ठिकाणी संततधार तर काही ठिकाणी मुसळधार पाऊस कोसळत आहे त्यामुळे वातावरण प्रफुल्लित झाले असून परिसर हिरवाईने नटला आहे. नद्या दुथडी भरून वाहत आहेत. तलाव विहिरीही भरल्या आहेत. धबधबे कोसळत आहेत.

शेतशिवाराने हिरवा शालू नेसल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. डोंगर दऱ्यातून फेसळणारे धबधबे अनेकांना आकर्षित करत आहेत. विशेषतः तरुणांना या निसर्ग सौंदयार्चे आकर्षण जास्त आहे. त्यातही शहरात राहणाऱ्या वर्गाला निसर्गाचे जास्त कौतुक असते कारण त्यांना निसर्गाचा जास्त सहवास लाभत नसतो.

अशी मंडळी निसर्गाची नवलाई अनुभवायला पावसाळ्यात आवर्जून घराबाहेर पडतात. वर्षा सहलीचे आयोजन करतात. वर्षा सहलीचा आणि पावसाळ्यातील निसर्ग सौंदयार्चा अनुभव घेत असताना काही पर्यटकांना उत्साहाचे भान राहत नाही. विशेषतः तरुण वर्ग अतिउत्साहाच्या भरात नको ते धाडस करतात आणि त्यातून एखादी मोठी दुर्घटना घडते.

अशीच एक मोठी दुर्घटना मागील वर्षी लोणावळ्यात घडली होती. या दुर्घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. लोणावळ्यात वर्षा सहलीसाठी आलेल्या अन्सारी कुटुंबातील नऊ सदस्य लोणावळा धरणाच्या पाठीमागे असणाऱ्या बुशी धरणावर वर्षा विहाराचा आनंद घेण्यासाठी गेले होते. मात्र पाण्याचा प्रवाह अचानक वाढल्याने अन्सारी कुटुंबातील पाच जण वाहून गेले. त्यात लहान मुले व महिलांचा देखील समावेश आहे.

या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हळहळत असतानाच ताम्हिणी घाटातील प्लस व्हॅलीतील नदीत एका तरुणाने रील बनवण्यासाठी उडी मारली त्यात तो तरुण वाहून गेला अर्थात अशी दुर्घटना घडल्याची ती पहिली वेळ नव्हती मागीलवर्षीच खालापूरच्या साई बंधाऱ्यात पोहण्यासाठी गेलेल्या चार विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला होता.

दोन वषार्पूर्वीतर अशा अनेक दुर्घटना घडल्या होत्या. २०२३ साली चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील घोडझरी सिंचन तलावात बुडून चार तरुण मरण पावले होते. त्यातला एक तरुण सेल्फी काढण्याच्या नादात तलावात घसरला त्याला वाचवण्याच्या नादात पाण्यात उतरलेल्या इतर तीन तरुणांना देखील जलसमाधी मिळाली.

पावसाळ्यात अशाप्रकारच्या दुर्घटना सातत्याने घडतात. याआधीही अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत आणि यापुढेही घडणार आहेत कारण वर्षा सहलीसाठी आलेले पर्यटक शिस्तीचे पालन न करता नको ते धाडस करतात विशेषतः तरुण वर्ग सेल्फी काढताना, रिल बनवताना स्वतःचा जीव धोक्यात घालतात.

वर्षा सहलीचा आणि पावसाळ्यातील निसर्ग सौंदयार्चा अनुभव घेत असताना काही गोष्टींची खबरदारी घेण्याची गरज आहे. सध्या कुठेही गेल्यावर सेल्फी घेणे, व्हिडीओ बनवले, रील बनवणे, फेसबूक लाईव्ह करणे हा ट्रेंड झाला आहे. या ट्रेंडच्या नावाखाली अनेकदा उंच डोंगरावरुन, घाट माथ्यावरून, धबधब्याच्या टोकावरून, चारचाकी गाडीच्या टफावरून किंवा खिडकीतून तोंड बाहेर काढून, दुचाकी वरून स्टंट करुन व्हिडीओ बनवले जातात. सेल्फी काढले जातात, रिल बनवले जातात. मात्र पावसाळ्याच्या दिवसात हे प्रकार जीवावर बेतू शकतात.

लाईक, शेअर आणि कमेंटच्या नादात तरुणवर्ग हे धाडस करतात मात्र हेच धाडस मोठ्या दुर्घटनेस निमंत्रण देणारे ठरते. पावसाळ्यात रस्ते अधिक घसरट झालेले असतात. खड्ड्यांमध्ये पाणी साचल्यामुळे खड्डा किती मोठा आहे याचा नेमका अंदाज येत नाही. काहीतरी थ्रिलिंग करण्याच्या नादात शरीराला इजा करून घेणे योग्य नाही. नदी, तलाव, धरणे, धबधबे याठिकाणी सहलीस गेल्यावर तर अधिक दक्ष राहावे लागतात. कारण तिथे एखादी छोटी चूकही जीवघेणी ठरु शकते. नदी, तलाव, धरण, समुद्र या ठिकाणी पोहण्यास गेलेले तरुण बुडून मरण पावल्याच्या घटना याआधी अनेकदा घडल्या आहेत.

खरंतर याबाबतीत पर्यटकांनी स्वतःच काळजी घेतली पाहिजे पण उत्साहाच्या भरात अनेकांना त्याचे भान राहत नाही म्हणून पर्यटनस्थळांच्या व्यवस्थापनाने याबाबतीत काळजी घेतली पाहिजे. सावधानतेच्या सूचना ठळकपणे लिहिल्या पाहिजेत. पाण्याची पातळी किती असल्यास कोणत्या मयार्देच्या पुढे जाणे धोक्याचे आहे, याबाबत संबंधितांना इशारा दिला पाहिजे. धबधबे पाहण्यास गेलेल्या पर्यटकांना तर तशा सूचना देण्याची सक्त गरज असते. अशा ठिकाणी मुसळधार पावसात जाणे तर चुकीचेच असते. त्याचप्रमाणे गड, किल्ले, डोंगरमाथ्यावर भटकताना देखील भान ठेवणे तितकेच गरजेचे असते.

अशा ठिकाणी जोराचा पाऊस आला तर कोणती खबरदारी घ्यावी तसेच अशावेळी कोणत्याही प्रकारचा अपघात होऊ नये याची कोणतीही तजवीज केलेली नसते. त्यात काही महाभाग अशा ठिकाणी मद्यपान करून पर्यटनाला जातात. तरुणांनी हे कटाक्षाने टाळले पाहिजे.

पर्यटकांनी स्वतःची व स्वतः बरोबर आलेल्यांचीही काळजी घेतली पाहिजे. वर्षा सहलीचा मनमुराद आनंद लुटा, मजा करा पण ही मजा जीवावर बेतणार नाही याचीही काळजी घ्या.

■ ■ ■



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

# विदर्भ निद्रिस्त नि तेलंगणा तत्पर!

नुकतीच राज्य सरकारच्या मंत्रिमंडळाची कॅबिनेट बैठक मंत्रालयात पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत आठ मोठे निर्णय घेण्यात आले. त्यात शक्तिपीठ महामार्गाला अग्रस्थान देण्यात आले.

समृद्धी महामार्ग आणि इतर महामार्ग अक्षरशः भ्रष्टाचाराने पोखरला गेला. दीडशे कोटीत बांधलेल्या रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी आता दोनशे कोटी लागत आहे. असं असलं तरीही राज्यातील अठरा तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या शक्तिपीठ महामार्गास अनेक जिल्ह्यात शेतकऱ्यांचा विरोध असतानाही मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आल्याने शेतकरी, आंदोलक आक्रमक होतील, हे चित्र स्पष्ट आहे. यातीलच एक निर्णय म्हणजे जलसंपदा विभागातील कोयना धरणाच्या पायथा विद्युतगृहाच्या प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. पण...

इचमपल्ली प्रकल्प हा गोदावरी नदीवर प्रस्तावित असलेला एक बहुउद्देशीय प्रकल्प आहे. या प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट जलविद्युत उत्पादन, सिंचन आणि पूर नियंत्रण आहे. या प्रकल्पाचे लाभक्षेत्र तेलंगणा राज्यात आहे, पण जमीन आणि जंगल महाराष्ट्रातील सिरोंचा तालुक्यात आहे, ज्यामुळे पुनर्वसन एक आवाहन आहे. तसेच या प्रकल्पामुळे सिंचन आणि जलविद्युत निर्मितीमध्ये वाढ होईल, पण त्याचबरोबर पुनर्वसन आणि पर्यावरणावर होणारे परिणाम यांचा विचार करणे आवश्यक आहे.

१९७८ मध्ये गोदावरी खोऱ्यावर नेमलेल्या पाणी वाटप लवादाने विदर्भाच्या वाट्याला दिलेल्या पाण्याचे नियोजन करण्यात महाराष्ट्र शासन अपयशी ठरले. सिरोंचा तालुक्याला लागून १९८०-८५ मध्ये इचमपल्ली प्रकल्प निर्माण करण्याचा प्रयत्न तत्कालीन आंध्रप्रदेश सरकारने केला होता. त्यावेळी ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे यांनी या प्रकल्पाला कठोर विरोध केला. त्यामुळे हा प्रकल्प थंडबस्त्यात टाकण्यात आला होता. मात्र विदर्भाच्याच पाण्यावर इचमपल्ली प्रकल्प पुनर्जीवित करण्याच्सा अर्थात उभारण्याच्या तीव्र हालचाली तेलंगणा शासनाने सुरू केल्या असून हा प्रकल्प त्यांनी क्रमावर घेतला आहे. त्यामुळे विदर्भाच्या हितासाठी विदर्भवाद्यांनी विशेषतः विदभार्तील नेत्यांनी लक्ष देण्याची गरज भासली आहे.

सिरोंचा तालुक्यातील चपराळाजवळ वर्धा आणि वैनगंगा नदीच्या संगमानंतर प्राणहिता नदी उगम पावते. दीडशे किलोमीटरचा प्रवास करून नगरमजवळ गोदावरी नदीत विलीन होते. या पाण्याचा गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने कधीच वापर केला नाही.

दोनशे वषार्पूर्वी निजामाने हे पाणी हैद्राबादपर्यंत नेण्यासाठी इचमपल्ली प्रकल्पाची संकल्पना १८१० मध्ये मांडली होती. दोन पर्वतांच्या आधारे हे प्रकल्प उभारले जाणार होते. निजामाच्या विनंतीनंतर फ्रेंच सरकारने इंजिनिअरची चमू पाठविली.

तद्नंतर भित बांधण्याचे काम सुरू झाले. मात्र १९३० मध्ये आलेल्या प्लेगच्या साथीत या फ्रान्सच्या चमूचा मृत्यू झाला आणि प्रकल्प मागे पडला. त्यानंतर आंध्रप्रदेश सरकारने हे प्रकल्प उभारण्यासाठी पुढाकार घेतला. पण त्याला महाराष्ट्रातून प्रखर विरोध झाल्याने माघार घ्यावे लागले. आता पुन्हा तेलंगणा सरकारने इचमपल्लीसाठी जोरदार हालचाली सुरू केल्या आहेत.

तत्पूर्वी एकीकडे विदर्भात अनेक सिंचन प्रकल्प अर्धवट असताना गोदावरी खोऱ्यातील उपलब्ध पाण्याच्या नियोजनाकडे शासनाचे कुठलेही लक्ष नाही. तर दुसरीकडे तेलंगणा राज्य सिंचन प्रकल्प उभारणीकडे युद्ध पातळीवर प्रयत्न करत आहे.

यवतमाळ जिल्ह्यात निर्माण होत असलेल्या चार आंतरराज्यीय बंधाऱ्यामध्ये चनाखा बंधाऱ्याचे काम शासनाने जोरात हाती घेतले आहे. दुसरीकडे आता तेलंगणामधील करीमनगर जिल्ह्यात येणाऱ्या महादेवपूर तालुक्यातील इचमपल्ली प्रकल्पावर तेलंगणाने लक्ष केंद्रित केले आहे.

विशेष म्हणजे छत्तीसगड राज्याचा भूभागही या प्रकल्पाला लागून असल्याने जलऊर्जा प्रकल्प निर्माण करण्याच्या हालचाली चालल्या आहे. यासाठी तेलंगणाचे सुपुत्र असलेले महाराष्ट्राचे राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या सत्काराचे आयोजन करून तेलंगणा सरकारने इचमपल्लीसाठी मदत करावी, अशी आग्रही भूमिका त्यांच्यापुढे मांडली.

विशेष म्हणजे या प्रकल्पामुळे हैद्राबादची तहान भागणार असल्याने आंध्रपदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडूंसह वाय. एस. राजशेखर रेड्डी आणि आता तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर रावसुद्धा इचमपल्ली प्रकल्पासाठी प्रचंड आग्रही आहेत.

गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंच्यात मात्र या प्रकल्पाविरोधात स्थानिकांनी उठाव केला होता. अशा स्थितीत राज्य शासनाने विदभार्तील सिंचनाच्या दुरावस्थेवर लक्ष देणे अत्यंत गरजेचे झाले आहे.

गोदावरी खोऱ्याचे भौगोलिक क्षेत्र सुमारे १५२ लाख हेक्टरचे आहे. त्यापैकी लागवड योग्य क्षेत्र ११२ लाख हेक्टर असून या खोऱ्यातील १५४ अब्ज घनफूट पाणी वापराविना आहे. १९७८ मध्ये नेमलेल्या लवादाने विदर्भाच्या वाट्याला दिलेल्या पाण्याचे नियोजन न झाल्याने आता तेलंगणा विदर्भाच्या पाण्यावर नजर ठेवून आहे.

मुळात गोदावरीचे पाणी विदर्भात रोखल्या गेले असते तर निश्चितच आज विदर्भातील सिंचन स्थिती खूप वेगळी असती यात काही शंका नाही.

----------------

शब्दस्पर्शी सुनील शिरपुरे
कमळवेल्ली, यवतमाळ
७०५७९१८५४७९

■ ■ ■

## आसमंती झुले

आसमंती कोणी
बांधलेत झुले
आकाशात फुले
इंद्रधनू

आकाशात कुणी
विखूरले रंग
सुंदरता संग
निळाईची

इंद्रधनू कमान
आकाशात झुले
चांदण्यांची मुले
साक्षीदार

इंद्रधनु शोभे
निळ्या अंबरात
लावलीय वात
प्रकाशाची

सुंदर रंगाची
सजली कमान
ताऱ्याच्या समान
चमकती

विस्तीर्ण धरणी
मोकळे आकाश
रवीचा प्रकाश
निसर्गात

प्रा. सौ. वर्षा विलास कावरे
मूर्तिजापूर, जि. अकोला.



## पंढरीचा मेळा

अमोल तपासे
सीताबर्डी, नागपूर.
९९६०६७३७८९

मेळा आषाढी-कार्तिकीचा,
रंगला विठ्ठल नामाचा.
गजर हरी विठुरायाचा,
मुखी नाम वारकऱ्यांचा.

तुळशीची माळ गळा,
पांडुरंगा तुझ्या चरणी.
वाजे मृदंग अन् टाळ,
रंगली अभंगाची वाणी.

विठ्ठल भक्ती रसाची वृष्टी,
आनंदाने भरले अंबर.
दर्शनाने तृप्त झाली दृष्टी,
विठ्ठल नामाचा गजर.

वैष्णवांचे माहेर पंढरपूर,
चंद्रभागेत अंग अंग न्हाऊ.
विठ्ठल नामाचा महासागर,
सार्थक जन्माचे निरंतर.



## पावसाळ्यात संसर्गाच्या आजारांपासून दूर राहाण्यासाठी
# स्वयंपाकघरातील मसाले ठरतील फायदेशीर

भारताला मसाल्यांची खाण म्हटले जाते. येथे अनेक प्रकारचे मसाले पिकवले जातात. ते केवळ अन्नाची चव वाढवतातच, पण शरीरालाही फायदा करतात. त्यांच्यात अनेक आरोग्यदायी गुणधर्म आहेत, जे रोगांना मुळापासून नष्ट करण्याचे काम करतात.

तुमच्या स्वयंपाकघरात औषधाच्या पेटीपेक्षा जास्त शक्तिशाली औषधे आहेत. आजारांशी लढण्याचा हा पहिला मार्ग आहे, जो आजींच्या काळापासून चालू आहे. पीसीओएसपासून ते बॅक्टेरिया नष्ट करण्यापर्यंत त्यांचे अनेक फायदे आहेत.

**मेथी दाणे :** मधुमेह आणि कोलेस्टेरॉल दोन्ही एकत्रितपणे त्रास निर्माण करतात. कोलेस्टेरॉलमुळे मधुमेहाच्या रुग्णांची प्रकृती बिघडू शकते. यासाठी तज्ञांनी मेथीचे दाणे खाण्याचा सल्ला दिला आहे. त्यामुळे टाइप २ मधुमेहाच्या रुग्णांमध्ये कोलेस्टेरॉल प्रोफाइल सुधारते. जगभरातील लाखो लोक या दोन्ही आजारांनी त्रस्त आहेत.

**दालचिनी :** महिलांमध्ये PCOS आणि PCOD वाढत आहेत. हे त्यांच्या हार्मोन्समधील असंतुलनामुळे आहे. पण तुम्हाला काळजी करण्याची गरज नाही कारण दालचिनी यामध्ये फायदेशीर आहे. ती हार्मोन्स संतुलित करण्यास मदत करते.

**लवंग :** लवंग तुमच्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरते. पावसाळ्यात संसगार्चा धोका वाढतो . बॅक्टेरिया, बुरशी आणि विषाणूंमुळे अनेक आजार होऊ शकतात. पण तज्ञांच्या मते, लवंग तेलात हे सर्व सूक्ष्मजंतू मारण्याची शक्ती आहे.

**पचन सुधारते :** मसाल्यांमध्ये पचन सुधारण्याची क्षमता असते. म्हणून, ते अन्नासोबत घेतले जातात जेणेकरून अन्न सहज पचते. जर तुम्हाला पचनाची समस्या असेल तर योग्य मसाल्यांचा वापर करा.

**या गोष्टी लक्षात ठेवा**

मसाले खाल्ल्यामुळे तुम्हाला संसर्गाचे आजार होत नाहीत.

मसाल्यांचे सेवन केल्यामुळे तुमची रोगप्रतीकारकशक्ती वाढण्यास मदत होते.

तुम्हाला सर्दी, खोकला किंवा ताप यांच्या सारख्या समस्या होत असतील तर स्वयंपाकघरातील काही मसाल्यांचा वापर केल्यास होतील फायदे. बदलत्या जीवनशैलीमुळे महिलांमध्ये अनियमित पाळीच्या समस्या उद्भवतात त्यांनी मसाल्यांच्या काढ्याचे सेवन करावे.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## विनोदाचे महत्व

धावपळीच्या जीवनात
व्यक्ति होतो संत्रस्त
संवादासाठी विनोदी
शैलीचा कराल वापर
चैतन्य संचारेल सर्वत्र ..

हास्याचे उडता कारंजे
मन होई ताजे ताजे
तनावाला मिळते मुक्ति
जिवनाला मिळते शक्ति

# पाच वर्षानंतर कैलास मानसरोवर यात्रेला सुरुवात

## चीनच्या हद्दीत पोहचला ठाणे जिल्ह्यातील महिलांचा पहिला गट

**भिवंडी, दि. १ : प्रतिनिधी**



पाच वर्षांपासून बंद असलेल्या पवित्र कैलास मानसरोवर यात्रेला पाच वर्षानंतर १५ जुलै २०२५ पासून पुन्हा एकदा सुरुवात झाली आहे. या यात्रेसाठी निघालेल्या ठाण्यातील महिलांचा पहिला गट चीनच्या हद्दीत दाखल झाला आहे. कोरोना महामारीमुळे २०२० पासून यात्रेवर लागलेली बंदी आता उठवण्यात आल्याने भाविकांना कैलास मान सरोवर यात्रा करण्याचे भाग्य लाभणार आहे. ठाण्यातील महिलांचा पहिला गट यात्रेसाठी चीनच्या हद्दीत दाखल झाला असून या गटात डी. वाय. फाउंडेशनच्या महिला अध्यक्षा सौ प्रियांकाताई दयानंद चोरघे यांचा समावेश आहे. अध्यात्मिक वारसा लाभलेल्या व धार्मिक वृत्तीच्या सौ.प्रियांकाताई दयानंद चोरघे या नियमित विविध तीर्थस्थळांना भेटी देत असून भगवान शिवाच्या कृपेने प्रथम यात्रेकरू होण्याचे भाग्य लाभल्याने भगवान शिवाने आपला कृपेचा हात आपल्यावर ठेवल्याची भावना प्रियांकाताई चोरघे यांनी व्यक्त केली आहे.कैलास मान सरोवर यात्रा ही अध्यात्माची उच्च अनुभूती असल्याचे प्रियांकाताई चोरघे यांनी सांगितले.विशेष म्हणजे या मानसरोवर यात्रेचे आयोजन भिवंडी तालुक्यातील कोनगांवच्या विद्यमान सरपंच रेखा सदाशिव पाटील यांनी केले होते.कैलास मानसरोवर पहिल्या तुकडीमध्ये डी. वाय. फाउंडेशनच्या महिला अध्यक्ष सौ. प्रियांकाताई दयानंद चोरघे यांच्यासह कोनगांव सरपंद रेखा सदाशिव पाटील, बेबी बाळाराम चौधरी,वर्षा चौधरी, मोना म्हात्रे, हर्षला चौधरी, भानुमती पाटील, आरती भोईर, रचना पाटील, मोनिका भोईर, मनीषा कीणे, करुणा पाटील, गिरीजा पाटील, प्रीतीशा पाटील, चम्पा भोईर, भारती म्हात्रे, तनिष्का चौधरी, ओम चौधारी, जोत्स्ना पाटील, उज्वला विनोद ठाकरे, आर्या चौधरी, मीनाक्षी पाटील, यांचा समावेश आहे. दरम्यान ३० जुन रोजी श्रध्दालुंनी यमद्वार पासुन कैलास मानसरोवर यात्रा संपुर्ण परिक्रमा करण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

# SBI फाउंडेशनने ऑडिट रिपोर्ट देण्यास नकार दिला, RTI लागू होत नाही असा दावा

## RTI कार्यकर्ता अनिल गलगली यांनी पारदर्शकतेवर उपस्थित केला प्रश्न

**मुंबई, दि. १ : प्रतिनिधी**




भारतातील सर्वात मोठ्या सार्वजनिक क्षेत्रातील बँक स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) च्या CSR शाखा अर्थात SBI फाउंडेशन ने सूचना अधिकार कायदा 2005 (RTI) अंतर्गत माहिती देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. फाउंडेशनच्या म्हणण्यानुसार, ती संस्था RTI कायद्यातील कलम २(ह) अंतर्गत "सार्वजनिक प्राधिकरण" (Public Authority) म्हणून पात्र नाही.

RTI कार्यकर्ता अनिल गलगली यांनी SBI फाउंडेशनकडे खालील माहितीची मागणी केली होती की ACE Sports Development Programme अंतर्गत निधी मिळवणाऱ्या एनजीओंची यादी, यातील कोणतीही संस्था ऑलिंपियनद्वारे स्थापन किंवा चालवली जाते का? महालेखा परीक्षक (CAG) कडून ऑडिट झालेले एनजीओ कोणते? आणि त्याचे अहवाल आणि कुठली संस्था ब्लॅकलिस्ट करण्यात आली आहे का? त्याचे कारण आणि प्रमुख व्यक्तीची यादी मागितली होती. प्रकल्प नूतनीकरणासाठीची प्रक्रिया, समिती आणि नियमावलीची माहिती देण्यात यावी. सेलिब्रिटी संस्थांना सवलत दिली असल्यास त्याबाबत माहिती देताना निधी देण्यापूर्वी अनिवार्य ऑडिट करण्याची धोरणे व त्याची प्रत देण्यात यावी.

SBI फाउंडेशनचे संचालक यांनी उत्तरात स्पष्ट केले की, “SBI फाउंडेशन RTI कायद्यानुसार सार्वजनिक प्राधिकरण नाही, त्यामुळे माहिती देण्याची जबाबदारी आमच्यावर नाही.” या उत्तरावर प्रतिक्रिया देताना अनिल गलगली म्हणाले की “SBI ही केंद्र सरकारच्या मालकीची सार्वजनिक बँक आहे आणि SBI फाउंडेशन ही तिची CSR शाखा आहे. अशा संस्थांना सार्वजनिक निधीचा वापर होत असतो, त्यामुळे त्या सार्वजनिक जबाबदारीच्या कक्षेत येतात. RTI पासून दूर राहण्याचा प्रयत्न म्हणजे पारदर्शकतेपासून पळवाट शोधणे होय.”

गलगली यांनी सांगितले की ते हे प्रकरण SBI च्या RTI नोडल अधिकारी, केंद्रीय माहिती आयोग (CIC) आणि CSR विषयक देखरेख करणाऱ्या संस्थांपुढे मांडणार आहेत. ते पुढे म्हणाले की “CSR निधी म्हणजे खासगी नव्हे तर कायद्याने बंधनकारक केलेला सार्वजनिक खर्च आहे. त्यामुळे जनतेला तो निधी कुणाला व का दिला जातो, हे जाणून घेण्याचा पूर्ण अधिकार आहे.”

हे प्रकरण अशा सर्व संस्थांसाठी एक नजीर ठरेल ज्या सार्वजनिक निधी घेऊनही RTI कक्षेबाहेर असल्याचा दावा करतात.

# पुगरदेव यांचे 26 वे वंशज पूज्य सूर्यवंशी ठाकूर साई मनीषलाल साहिब यांचे उल्हासनगरमध्ये आगमन

**उल्हासनगर, दि. १ : प्रतिनिधी**

७८ वर्षांपासून अखंड प्रज्वलित असलेल्या ज्योतीला वर्ल्डवाइड बुक ऑफ रेकॉर्ड आणि आयडियल इंडियन बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंदवण्याचा संकल्प साधकांनी केला आहे .

या बाबत माहीती अशी आहे की झुलेलाल श्री अमर उडेरोलाल यांचा जन्म विक्रम संवत १००७ मध्ये चैत्र महिन्याच्या चंद्रदर्शन शुक्रवारी सिंध प्रांतातील नसरपूरच्या ठट शहरात सूर्यवंशी रतनराय यांच्या घरी माता देवकीच्या गर्भात झाला, पिता रतनराय यांना कोडन आणि हरचंदराय नावाचे दोन पुत्र होते तिसरे पुत्र म्हणून झुलेलाल भगवान अवतरले त्यांच्या जन्माचे नाव उदयचंद होते, त्यांना नंतर उडेरोलाल, वरुण देव, जिंदाहपीर, झुलेलाल या नावाने ओळखले जाऊ लागले. उडेरोलाल यांनी आपले चुलत भाऊ ठाकूर संत पुगरदेव जी यांना जल आणि ज्योतीचे महत्त्व समजावून सांगून आपली गादी सोपवली आणि म्हटले की जिथे जल आणि ज्योत आहे तिथे माझा वास आहे. १९४७ मध्ये ठाकूर पुगरदेव जी यांचे गादीनशीन २४ वे वंशज परम पूज्य ठाकूर साई आसनलाल साहिब जी यांनी १०६२ वर्षांपासून उडेरोलाल मंदिर सिंधमध्ये ठाकूर पुगर देव यांनी प्रज्वलित अखंड ज्योतीतून ज्योत प्रज्वलित करून गुजरात राज्याच्या भरूच शहरात माँ नर्मदा नदीच्या काठावर श्री झुलेलाल वरुणदेव मंदिराचे निर्माण केले आणि त्यात अखंड ज्योतीची स्थापना केली. जी गेल्या ७८ वर्षांपासून आजही अखंड प्रज्वलित आहे, संपूर्ण भारतवर्षामध्ये हे एकमेव श्री वरुणदेव जी यांचे मंदिर आहे. जे नर्मदा नदीच्या काठावर स्थित आहे आणि जिथे अखंड ज्योतीची स्थापना केली आहे , येथे जल आणि ज्योतीचा अनोखा संगम बघायला मिळतो, आणि दिव्य आनंदाची अनुभूती होते.

२५ वे वंशज परम पूज्य ठाकूर साई ओमलाल साहिब जी यांचे सुपुत्र वर्तमान गादेश्वर २६ वे वंशज सिंधी समाजाचे आध्यात्मिक गुरु, अमरकथा ग्रंथाचे प्रचारक, सूर्यवंशी १००८ परम पूज्य ठाकूर साई मनीष लाल साहिब जी यांचे उल्हासनगरमध्ये आगमन झाले.

याप्रसंगी उल्हासनगरमध्ये त्यांचे साधक जयप्रकाश शहदादपुरी व सेवकांनी भरुच शहर (गुजरात) मध्ये नर्मदा नदीच्या काठावर देशात एकमेव श्री झूलेलाल वरुण देव मंदिरामध्ये गेल्या ७८ वर्षांपासून अखंड स्थापित अखंड ज्योतीला वर्ल्डवाइड बुक ऑफ रेकॉर्ड आणि आयडियल इंडियन बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंदवण्याचा संकल्प केला.

# उल्हासनगर पोलिस उपायुक्त कार्यालियासमोर ख्रिश्चन समुदायाचे आंदोलन

## गोपीचंद पडळकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**उल्हासनगर, दि. १ : प्रतिनिधी**

भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी ख्रिश्चन धार्मिक नेत्यांविरुद्ध केलेल्या कथित प्रक्षोभक विधानांविरोधात उल्हासनगरमधील ख्रिश्चन समुदायाने मोठा निषेध केला आहे . त्यामुळे ख्रिश्चन समुदायातील मोठ्या संख्येने लोक पोलिस उपायुक्त कार्यालयाबाहेर जमुन त्यांनी आमदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी करत घोषणाबाजी केली. आमदार गोपीचंद पडळकर यांनी ख्रिश्चन धर्मगुरूंना मारण्यासाठी बक्षीस जाहीर केल्याचे चिथावणी खोर वक्तव्य केले होते, या विरोधात पोलिस उपायुक्त कार्यालया बाहेर जमुन आंदोलन करत जाहीर निषेध करण्यात आला असुन त्यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

या आंदोलना दरम्यान ख्रिश्चन समाजाच्या प्रतिनिधींनी पोलिस उपायुक्त सचिन गोरे यांना निवेदन दिले आणि धार्मिक सलोखा बिघडवणाऱ्या अशा नेत्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. अशा विधानांमुळे धार्मिक भावना दुखावतात आणि समाजात तणावाचे वातावरण निर्माण होते, असे या समाजाचे म्हणणे आहे.



हरित क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कुळगांव बदलापूर नगरपरिषदेकडून अभिवादन करण्यात आले. काल कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या प्रशासकीय भवनात मुख्याधिकारी तथा प्रशासक मारुती गायकवाड यांच्या वतीने उपमुख्याधिकारी केतन गुजर यांनी हरित क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी लेखापाल विकास चव्हाण, सामान्य प्रशासन विभागाचे सिद्धार्थ पवार, कर अधिकारी जितेंद्र गोमासे, आस्थापनाचे संदीप कांबळे, मिळकत विभागाचे महेश देशपांडे, प्रभाग अभियंता निलेश देशमुख इत्यादी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगात तीन नवीन सदस्यांची नियुक्ती

**मुंबई, दि. १ : प्रतिनिधी**



राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगावर (MPSC) राजीव निवतरकर, दिलीप भुजबळ-पाटील व महेंद्र वारभुवन तीन नवीन सदस्यांची नियुक्ती करण्यात आली असून, राजीव निवतकर आणि महेंद्र वारभुवन यांनी आज सदस्य पदाची आणि गोपनीयतेची शपथ घेतली. आयोगाचे अध्यक्ष रजनीश सेठ यांनी नवीन सदस्यांना शपथ दिली .

आयोगाच्या बेलापूर, नवी मुंबई येथील मुख्यालयात हा शपथविधी सोहळा पार पडला. या प्रसंगी आयोगाचे सदस्य अभय वाघ आणि सतिश देशपांडे यांच्यासह आयोगाच्या सचिव सुवर्णा खरात, सहसचिव तथा परीक्षा नियंत्रक सरीता बांधेकर-देशमुख, उपसचिव मा. पां. जाधव हे उपस्थित होते.

**नव नियुक्त सदस्यांची माहिती**

**राजीव निवतकर IAS 2010**

हे भारतीय प्रशासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी असून यांनी विविध महत्वाच्या पदांवर कामगिरी केली आहे. खाली त्यांच्या प्रमुख पदांची माहिती दिली आहे:

संचालक :आपत्ती व्यवस्थापन.

सहसचिव: मुख्य सचिव कार्यालय.

मुंबई जिल्हाधिकारी (कलेक्टर, मुंबई सिटी):

आयुक्त: वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन

संचालक: विमान चालन

**महेंद्र ब. वारभुवन (M. B. Warbhuvan) IAS 2010**

हे भारतीय प्रशासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी यांनी प्रशासनात पार पाडलेल्या जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे

सचिव: महाराष्ट्र राज्य कृषी परिषद पुणे,

मुख्य कार्यकारी अधिकारी: जिल्हा परिषद पालघर

सहसचिव: सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,

अतिरिक्त आदिवासी आयुक्त :ठाणे विभाग,

आयुक्त: राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष (CET Cell) तथा सचिव प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई

# अधिक व्याजाचे आमिष देणाऱ्या योजनांविरोधात पोलिसांची विशेष मोहीम

**मुंबई, दि. १ : प्रतिनिधी**

राज्यात अधिक व्याजदराचे आमिष दाखवून नागरिकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या योजनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिस विभागामार्फत विशेष मोहीम राबविण्यात येत असून, नागरिकांनी अशा प्रकारच्या योजनांना बळी न पडता योग्य ती दक्षता घ्यावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केले. याबाबत सदस्य भिमराव तापकीर यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य नाना पटोले, जितेंद्र आव्हाड यांनी उपप्रश्न विचारले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, नागरिकांनी गुंतवणूक करताना संबंधित संस्थेकडे आवश्यक परवाने, नोंदणी व अधिकृत मंजुरी आहेत की नाही, याची खातरजमा करावी. कोणतेही अतिरिक्त लाभाचे किंवा अधिक व्याजाचे आमिष दाखवणाऱ्या योजनांपासून दूर राहावे. अशा योजनांमार्फत फसवणुकीचे प्रकार घडू नयेत याकरिता फायनान्शियल इंटेलिजन्स युनिट कार्यरत करण्यात आले असून, संबंधितांवर आवश्यक ती कारवाई करण्यात येत आहे.

टोरस कंपनीविरोधात आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणी शासनाने कारवाई सुरू केली असून, मागील तीन महिन्यांपासून एमपीआयडी कायद्यान्वये कंपनीची मालमत्ता जप्त करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी यावेळी दिली.

## आज का अंदाज

**बुधवार २ जुलै २०२५**

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ७ | ० | ४ | ५ | ८ | ९ |
| १२० | १७८ | १२४ | १४५ | २४८ | २३० | १७० | १९९ |
| ३०० | ३५८ | २७८ | ३८९ | ७८९ | ३५७ | ३५० | २८९ |
| २२१ | २७७ | ४६७ | २८० | ६८० | १२२ | २६० | ३७९ |
| ३२ | ६२ | ७१ | ०१ | ४६ | ५६ | ८१ | ९१ |
| ३४ | ६४ | ७८ | ०८ | ४३ | ५३ | ८२ | ९२ |
| ३५ | ६५ | ७९ | ०९ | ४० | ५० | ८७ | ९७ |

**२ जुलै : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १० | २० | ५७ | ८७ |
| १९ | २९ | ५४ | ८४ |
| १६ | २६ | ५३ | ८३ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

**प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४**

# ‘जमाई नं. १’ मध्ये अभिषेक मलिकचा अल्लू अर्जुन प्रेरित लूक ठरणार धडाकेबाज!

**मुंबई, १ जुलै :** झी टीव्हीवरील जमाई नं. १ या लोकप्रिय मालिकेने प्रेक्षकांसाठी एक उत्कंठावर्धक आणि भावनांनी भरलेला ट्विस्ट आणण्याची तयारी केली आहे, कारण नील (अभिषेक मलिक) देवी कालीचे रूप धारण करणार आहे जो पुष्पा २ मधील अल्लू अर्जुनच्या लूकने प्रेरित आहे. हिंदी टेलिव्हिजनवर प्रथमच एक प्रमुख पुरुष पात्र एका दैवी आणि शक्तिशाली अवतारात प्रकट होणार आहे, जो सिनेमॅटिक फ्लेअर आणि भावनिक गहरेपणाचा संगम आहे. रिद्धी (सिमरन कौर) चे अपहरण आणि तिला वाचवण्यासाठी नीलने सुरू केलेले धाडसी मिशन यामुळे कथा अधिक गहन होत जाते, आणि त्यामुळे प्रेक्षकांसमोर एक जबरदस्त नाट्य सादर होणार आहे.

अभिषेक म्हणाला, प्रामाणिकपणे सांगायचं तर जेव्हा मी या ट्रॅकबद्दल ऐकलं तेव्हा मी खूप उत्साहित झालो. मला काली मातेच्या रूपात सादर व्हायचं होतं. माझ्या अंगावर काटा आला. हा लूक पुष्पा २ मधील अल्लू अर्जुनच्या धडकी भरवणाऱ्या, रांगड्या आणि शक्तिशाली रूपासारखा होता. आम्ही लूक टेस्ट केला आणि प्रतिसाद जबरदस्त होता. सेटवर सगळ्यांना तो खूप आवडला. आमच्या निर्मात्यानेही मला फोन करून सांगितलं, हा लूक फक्त तुझ्यासाठीच बनलाय. माझ्यासाठी हे खूप मोठं होतं. हे पूर्णपणे काहीतरी वेगळं आहे असं काहीतरी जे भारतीय टेलिव्हिजनवर कधीच पाहायला मिळालं नाही. हा ट्रॅक खूप जबरदस्त आहे आणि यातला ॲक्शन सीक्वेन्स तर त्याला अजूनच थरारक बनवतो. ते दृश्य भारतीय सिनेमातील भव्य, स्टायलिश ॲक्शन सीनसारखा आहे. हे रूपांतर मुळातच इतकं जोरदार होतं की मला या अवतारात सजायला दररोज जवळपास दोन तास लागायचे बॉडी पेंटपासून ते जड साडी आणि मंदिरातले दागिने घालण्यापर्यंत. सगळं अगदी बारकाईने आणि मेहनतीने केलं गेलं. त्या लूकमध्ये ॲक्शन सीक्वेन्स करताना थकायला नक्कीच झालं, पण अनुभव खूप सशक्त होता.

## राशीभविष्य

**मेष :** एखाद्या कौटुंबिक कामासाठी मित्रांची मदत घेऊ शकता. तुमचे अडकलेले धन देखील मिळू शकते. कुटुंबात आपल्या लोकांचे सहकार्य मिळेल. पत्नीसोबतचे संबंध चांगले राहतील.

**वृषभ :** आज जीवनात काही बदलांचा विचार करतील. कला क्षेत्रातील लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहील. तुम्हाला कामात मदत मिळेल. धनप्राप्तीचा योग संभवतो. एखाद्या खाद्यपदार्थाची आवड वाढू शकते.

**मिथुन :** मोठ्यांच्या सल्ल्याने काम करावे. तुम्ही ऑनलाईन काम सुरु करण्याचा विचार कराल. यात कुटुंबातील सदस्यांचे सहकार्य मिळेल. पैशांच्या बाबतीत तुम्हाला तुमच्या जोडीदार मदत करेल.

**कर्क :** ऑफिस मीटिंगमध्ये आपले म्हणणे प्रभावीपणे मांडू शकाल. तुमचे प्रेझेंटेशन सर्वांना आवडेल. तुम्हाला आज अचानक धनलाभ होण्याची शक्यता आहे. मुलांकडून पूर्ण मदत मिळेल.

**सिंह :** अडकलेली कामे आज पूर्ण होतील. यामुळे आर्थिक स्थिती सुधारेल. वकिलांना एखाद्या महत्त्वाच्या खटल्यात यश मिळेल. जमिनीच्या जुन्या व्यवहारातून आज फायदा होईल.

**कन्या :** व्यावसायिक कामांमध्ये निश्चित प्रगती होईल. तुम्ही घरात काही सुधारणा करू शकता. आवश्यक वस्तू खरेदी करु शकता, परंतु आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊनच निर्णय घ्या.

**तुळ :** आज मोठी प्रसिद्धी मिळेल. उत्तम आरोग्यासाठी व्यायाम करा. लवकरच फायदा मिळेल. विद्यार्थी आज एखादे काम पूर्ण करण्यासाठी वडिलांची मदत घेतील, ज्यामुळे त्यांचे काम चांगले होईल.

**वृश्चिक :** आज कामाच्या निमित्ताने दुसजया शहरात प्रवास करावा लागू शकतो. तुमचे विचार दाबण्याचा प्रयत्न होईल, पण मेहनतीचे फळ नक्की मिळेल. महिलांनी आरोग्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.


**धनु :** विद्यार्थ्यांना करिअरशी संबंधित काही अडचण येत असेल तर त्यांना मोठ्या भावंडांकडून मदत मिळेल. कुटुंबात एखादे महत्त्वाचे काम पूर्ण झाल्याने मन प्रसन्न राहील. आज घरी स्थळ येऊ शकते.

**मकर :** लांबचे नातेवाईक घरी येऊ शकतात. कुटुंबातील सदस्यांकडून तुमच्या कामाचे कौतुक होईल. मॉडेलिंग क्षेत्रातील लोकांना चांगल्या ब्रँडसाठी काम करण्याची संधी मिळू शकते.

**कुंभ :** एखाद्या नातेवाईकाशी असलेले मतभेद आज मिटतील. सोशल मीडियावर नवीन लोकांशी मैत्री होईल. पालक तुमच्या कामात मदत करण्याचा प्रयत्न करतील. मुलांसोबतचे तुमचे संबंध चांगले राहतील.

**मीन :** वैवाहिक जीवन चांगले ठेवण्यासाठी तुम्हाला एक पाऊल पुढे येणे गरजेचे आहे. लहान मुलीच्या पायांना स्पर्श करून आशीर्वाद घ्या, ज्यामुळे सर्व काही चांगले होईल.आर्थिक स्थितीकडे लक्ष द्या.

## शब्दकोडे क्रमांक २१५२



**आडवे शब्द :-**


१) आश्चर्यचकित
३) घराचा मागचा दरवाजा
६) पुष्कळ
९) भरभराट
१२) एक तारवाद्य
१४) प्रहर
१५) धनुष्य बाण
१७) परिचय
१९) बारावी रास
२०) छोटी वस्ती
२१) ललाट
२३) अचानक आलेले संकट
२६) मनाचा ओढा
२८) ताकद
२९) तंबूची कापडी भिंत
३०) परीक्षा, ज्ञान
३१) शरम
३३) अंगरखा
३४) विद्येची देवता
३५) अंदमानला काळ्यापाण्याची शिक्षा भोगणारे स्वातंत्र्यवीर
३७) कमळ
३८) जेव्हा
४०) पद्धत
४२) कौशल्य
४३) खाऱ्या पाण्याचा समुद्र
४६) हेतू अर्थ (हिं)
४८) इतर, बाकीचे
४९) पाणी
५०) खोडण्याचे साधन
५१) आशीर्वाद देणारी
५२) विनाकारण
५४) श्रेष्ठ पुरुष
५७) मुलांच्या बाबतीत अबोला
५८) भेग, चीर
५९) पाऊल गीत
६१) कलाबूत
६३) अतिशय
६४) काठ, बाजू
६५) उत्तराधिकारी
६६) जन्मदात्री
६७) पार्वती, कजाग स्त्री
६९) मालाचे येणे जाणे
७१) अंगावर कपडे नसलेला
७२) दरवाजा
७३) पराग
७५) देव
७६) दुर्गंधी येऊ लागलेले
७७) चार वेदापैकी एक

**उभे शब्द :-**

१) विसर, विस्मरण
२) ग्रामोफोनची रेकॉर्ड
३) प्रतिष्ठा, अब्रू
४) प्रभात
५) द्रवपदार्थ
६) वजन, बोजा
७) भयंकर
८) दारुचा एक प्रकार
१०) लक्ष्मीचे एक नाव
११) गर्भश्रीमंत मनुष्य
१३) कुस्ती शिकण्याची जागा
१६) कणीदार
१७) रांग
१८) दक्षता
२२) गवताचे पान
२४) लक्ष–एक आंकडा
२५) सरोवर
२७) उत्कर्षाचा काळ
२८) मेंढा
२९) सोवळ्याचे रेशमी धोतर
३०) ओटा, कट्टा
३२) चकचकीत
३३) सूट
३६) सत्वांश
३९) दासांचा दास
४१) काळोख
४४) वरपांगी
४५) चंद्र
४७) त्वरित
४८) पार्थ, एक कुंतीपुत्र
५३) अपशकून
५५) दुलई
५६) नवरदेव
५९) घागरा
६०) हिंदीत दहा
६२) प्रचंड मोठा
६३) अत्तराचा बोळा
६४) छिद्रातून जमिनीवर पडणारे प्रकाशकिरण
६५) संधी, मोकळीक
६६) अफवा
६७) रत, रममाण
६८) मनुष्य
६९) कुंभाराची भट्टी
७०) यज्ञोपवीत
७१) पुरुष
७२) इंग्रजीत कापणे
७४) वजनदार

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# यंदा 1.5 लाख गोविंदांना मिळणार विमा संरक्षण – प्रताप सरनाईक

**मुंबई, दि. १ प्रतिनिधी**

गोकुळाष्टमीच्या पार्श्वभूमीवर गोविंदा उत्सव अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध आणि जबाबदारीने पार पडावा यासाठी राज्य सरकारकडून महत्त्वाचा निर्णय घेण्याची तयारी सुरू झाली आहे. यंदा महाराष्ट्रातील तब्बल १.५ लाख गोविंदांना विमा संरक्षण दिलं जाणार आहे, अशी माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

ही मागणी युवासेनेचे कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांनी केली होती, त्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे प्रत्यक्ष लेखी निवेदन सादर करण्यात आलं. या निवेदनाला सकारात्मक प्रतिसाद देत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी लवकरच निर्णय जाहीर होईल अशी ग्वाही दिली आहे.

प्रताप सरनाईक म्हणाले की, "गोविंदा उत्सव हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. पण खेळातल्या अपघातांमुळे अनेक तरुण गंभीर जखमी होतात. त्यामुळे वैद्यकीय उपचार आणि आर्थिक मदतीचा प्रश्न निर्माण होतो."

राज्य शासनाने मागील वर्षीही अशाच स्वरूपात विमा योजना लागू केली होती. यंदा अधिक व्यापक पातळीवर, १.५ लाख गोविंदांना विमा संरक्षण देण्याच्या दिशेने पावले उचलली जात आहेत.

"दरवर्षी हजारो गोविंदा पथक रस्त्यावर उतरतात. अपघात झाल्यास तातडीची वैद्यकीय मदत व आर्थिक सहाय्य मिळावे यासाठी सरकार कटिबद्ध आहे," असे शिंदे यांनी स्पष्ट केले.

युवासेनेचे कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक म्हणाले, "हा निर्णय केवळ आर्थिक मदत नाही, तर गोविंदांचा आत्मविश्वास वाढवणारा सकारात्मक पाऊल आहे. यामुळे गोविंदा उत्सव अधिक निर्धास्तपणे आणि उत्साहात पार पडेल."

यामुळे राज्यातील गोविंदा पथकांमध्ये मोठा उत्साह असून, शासनाच्या या निर्णयाची अधिकृत घोषणा येत्या काही दिवसांत होण्याची शक्यता आहे.

# आषाढी एकादशीला प्रवासी सेवेसाठी येणाऱ्या सर्व एसटी कर्मचाऱ्यांना मोफत भोजन व्यवस्था

**मुंबई, दि. १ प्रतिनिधी**



आषाढी एकादशी निमित्त श्री. क्षेत्र पंढरपूर येथे विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सेवेसाठी एसटीच्या ५२०० बसेसची व्यवस्था केली आहे. ह्या बसेस घेऊन येणारे चालक, वाहक त्यांची देखभाल करणारे यांत्रिक कर्मचारी व या सर्वांना मार्गदर्शन करणारे पर्यवेक्षक व अधिकारी यांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था मोफत करण्यात आली आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले, गेली कित्येक वर्ष विठुरायाच्या भक्तांची सेवा एसटी व एसटीचे कर्मचारी सातत्याने करत आहेत. ऊन, वारा पाऊस याची तमा न बाळगता अतिशय निष्ठेने त्यांचे कर्तव्य ते बजावत असतात. आषाढी वारीच्या काळात त्यांच्या जेवणाची आभाळ होऊ नये, म्हणून यंदा स्वखर्चाने मी सलग तीन दिवस या सर्वांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था (एकादशीला उपवासाचे पदार्थ) करीत आहे. या निमित्ताने माणसातील " विठुराया" ची सेवा करण्याची संधी मला मिळत आहे. अर्थात, हे पुण्य पैशात मोजण्यासारखे नाही. त्यामुळे दरवर्षी अशा प्रकारचा उपक्रम मी राबवणार आहे. असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले.

आषाढी वारीच्या काळात ५,६ व ७ जुलै रोजी चंद्रभागा बसस्थानक, भिमा बसस्थानक, विठ्ठल बसस्थानक व पांडुरंग बसस्थानक येथे सुमारे १३ हजार एसटी कर्मचारी या मोफत भोजन व्यवस्थेचा लाभ घेतील.

## महत्त्वाच्या बातम्या

### स्पंदन लेखसंग्रहाचा प्रकाशन सोहळा

**मुंबई, दि. १ प्रतिनिधी**

संजीवन कला विकास प्रतिष्ठानतर्फे ज्येष्ठ साहित्यिका पूर्णिमा शिंदे लिखित स्पंदन लेखसंग्रह प्रकाशन सोहळा व पुरस्कार सोहळा झाला. सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, विधानपरिषद सदस्य पंकजभाऊ भुजबळ, विधानसभा सदस्य सनाताई मलिक उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुकृत खांडेकर, कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे, मुंबई मराठी पत्रकार संघाचे नरेंद्र वाबळे उपस्थित होते. याप्रसंगी आदिती तटकरे यांनी स्पंदनमधील संवेदनशील स्त्रीमन वैचारिक मूल्य व सामाजिक घडामोडी उलगडून सांगितल्या आणि सर्वांना वाचन संस्कृती टिकविण्याचा संदेश दिला. उपरोक्त कार्यक्रमामध्ये सामाजिक, वैद्यकीय, कला व सांस्कृतिक, पोलिस, शैक्षणिक, उद्योजक या क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान सोहळा मान्यवरांच्या हस्ते झाला. प्रतिष्ठानच्या अध्यक्षा माजी नगरसेविका सुनिता शिंदे यांनी प्रस्तावनेमध्ये संस्थेचा कार्यअहवाल उपस्थितांसमोर सादर केला. स्पंदन या आपल्या आठव्या पुस्तकाबद्दल पौर्णिमा शिंदे यांनी आपल्या साहित्य सेवा शैक्षणिक क्रांती आणि सामाजिक कार्याचा आलेख भाषणातून स्पष्ट केला तर संस्थेचे खजिनदार एन.डी. खान सर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. निवेदिका सुवर्णा गोपाळे व सुशांत शिंदे, यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले आणि कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी स्वाती निलख, आदित्य गायकर अनुपिता खांडगे आणि अस्मिता चव्हाण यांनी सहकार्य केले केले.

### नायजेरियन महिलेला वर्सोवा येथे अटक

**मुंबई, दि. १ प्रतिनिधी**

वर्सोवा पोलिसांच्या अँटी टेररिस्ट सेल (एटीसी) पथकाने एका मोठ्या कारवाई अंतर्गत एका नायजेरियन महिलेला कोकेनसह अटक केली आहे. पोलीस उपनिरीक्षक सचिन उगले यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. अंधेरी पश्चिम येथील जुना म्हाडा येथे एक महिला संशयास्पदरित्या फिरताना दिसली. उगले यांनी तात्काळ रात्रीच्या शिफ्टचे पर्यवेक्षक पोलीस निरीक्षक अमोल ढोले यांना याची माहिती दिली. संशयावरून ढोले यांनी महिला पोलिस अधिकाऱ्याच्या उपस्थितीत संशयास्पद महिलेच्या बॅगेची झडती घेतली. ज्यामध्ये ४१८ ग्रॅम कोकेनच्या ३० कॅप्सूल जप्त करण्यात आले आहेत.

### वर्सोवा-दहिसर कोस्टल रोडमध्ये नवी समस्या

**मुंबई, दि. १ प्रतिनिधी**

मुसळधार पावसात पश्चिम उपनगरांमध्ये होणाऱ्या पुराच्या समस्येला तोंड देण्यासाठी, बीएमसीने मोगरा ड्रेनेज सेंटर बांधण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु आता या प्रकल्पात एक नवीन समस्या उद्भवली आहे. या प्रकल्पासाठी प्रस्तावित केलेली जमीन वर्सोवा-दहिसर कोस्टल रोडच्या मार्गात येत आहे. यासाठी, बीएमसीने जागा थोडी हलवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे, केंद्राची रचना आणि योजना पुन्हा तयार करावी लागेल. पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी आठ ठिकाणी पावसाळी पाण्याचा निचरा केंद्रे उभारण्याचा प्रकल्प सुरू केला होता. त्यापैकी हाजी अली, इर्ला, लव्हग्रोव्ह, क्लीव्हलँड, ब्रिटानिया आणि गझदर बंधारा सुरू करण्यात आला.

### १८ डब्यांच्या लोकल ट्रेनची मागणी वाढतेय

**मुंबई, दि. १ प्रतिनिधी**

उपनगरीय रेल्वे नेटवर्कवरील अपघात रोखण्यासाठी, रेल्वे अपघातातून वाचलेले आणि प्रवासी कार्यकर्ते समीर जावेरी यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून तात्काळ सुधारणांची मागणी केली आहे, १८ डब्यांच्या लोकल ट्रेन सुरू करावी, कारण दररोज ७० लाखांहून अधिक प्रवासी मुंबई लोकलमध्ये प्रवास करतात. सध्या बहुतेक गाड्या १२ डब्यांनी धावतात. तथापि, काही गाड्या १५ डब्यांनी धावतात. म्हणून, जावेरी यांनी भर दिला आहे की १८ डब्यांची लोकल गर्दीचे व्यवस्थापन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. २७जून रोजीच्या त्यांच्या पत्रात, जवेरी यांनी २०२४ च्या धक्कादायक आकडेवारीचा उल्लेख केला आहे, ज्यामध्ये त्यांनी मुंबई महानगर प्रदेशातील लोकलमध्ये २,४७७लोकांचा मृत्यू झाला.

### महापालिकेच्या सफाई विभागातील कामगार संख्या अखेर वाढणार

**मुंबई, दि. १ प्रतिनिधी**

पालिकेकडून वाढत्या कचऱ्याचे संकलन व आवश्यक विल्हेवाट याचा आढावा घेऊन कामगार संख्या वाढविण्यासाठी लवकरच प्रस्ताव तयार केला जाणार आहे. या प्रश्नावरून सफाई कामगार संघटनेने आंदोलनाचा इशारा दिला होता. मात्र प्रशासनाच्या आश्वासनामुळे संघटनेने आंदोलन न करण्याचा निर्णय घेतला आहे.



महापालिकेच्या सफाई खात्यातील कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत घन कचरा व्यवस्थापन खात्याचे प्रमुख अभियंता प्रशांत पवार यांच्या दालनात बैठक पार पडली. १९८१ साली ५२ लाखांच्या घरात असलेली मुंबईची लोकसंख्या आता सव्वा दोन कोटींच्या घरात पोहोचली आहे. मात्र त्यावेळेपासून आतापर्यंत सफाई खात्यातील कर्मचारी संख्या ३१,६१७ एवढीच आहे. त्यातही सध्या २८,०३६ कर्मचारीच कार्यरत असून, ३५८१ पदे रिक्त आहेत. ही रिक्त पदे तात्काळ भरावीत व लोकसंख्येच्या प्रमाणात किमान ३० हजार सफाई कामगारांची पदे वाढवावी, अशी मागणी म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेने केली होती. त्यावर सकारात्मक प्रतिसाद देत प्रशासनाने १०५ कनिष्ठ अवेक्षक, २० सहायक मुख्य पर्यवेक्षक व ४ उपमुख्य पर्यवेक्षक पदे तात्काळ भरण्याची कार्यवाही केली जाणार आहे.

प्रशासनाकडून सफाई खात्यातील ४०० चौक्यांचे नूतनीकरण करण्यात येणार असून, प्रत्येक चौकीवर सफाई कर्मचाऱ्यांसाठी पिण्याचे पाणी (अॅक्वचागार्ड), शौचालय, स्वतंत्र चेंजिंग रूम आदींची सोय केली जाणार आहे. दादर चैत्यभूमी येथे मॉडेल चौकी बांधली जाणार आहे.

कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रकरणांचा जलद गतीने निपटारा करण्यासाठी लिपिक संवर्गाची १४५ रिक्त पदे तातडीने भरण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे, अशी माहिती संघटनेचे उपाध्यक्ष संजय बापेरकर यांनी दिली. या बैठकीस चिटणीस संजय वाघ, रामचंद्र लिंबारे व महेश गुरव तसेच प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

# जलसंपदा विभागाची कामे जलद गतीने करा

## राधाकृष्ण विखे-पाटलांच्या अधिकाऱ्यांना सूचना

**मुंबई, दि. १ प्रतिनिधी**




जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील उजनी प्रकल्पाच्या वितरण प्रणालीची स्वच्छता मोहीम, सांगली जिल्ह्यातील वारणा प्रकल्पाच्या डाव्या कालव्याचे बांधकाम, कोल्हापूर जिल्ह्यातील दुधगंगा डावा कालवा अंतर्गत विविध विषय आणि सातारा जिल्ह्यातील मौजे माथणेवाडी पुनर्वसन, तारळी धरण प्रकल्पांतर्गत बाधित मौजे सावरघर पुनर्वसन प्रकल्पग्रस्त खातेदारांच्या रोख रक्कम बाबत आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

जलसंपदा मंत्री श्री. विखे-पाटील यांनी मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात घेतलेल्या विविध बैठकांवेळी पर्यटन, खनिकर्म व माजी सैनिक कल्याण मंत्री शंभुराज देसाई, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील, आमदार सुभाष देशमुख, आमदार अमल महाडिक, माजी आमदार शिवाजीराव नाईक, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव संजय बेलसरे यांच्यासह जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील उजनी प्रकल्पाच्या वितरण प्रणालीचा आढावा प्रसंगी मंत्री श्री. विखे पाटील म्हणाले, कालव्यांची वहन क्षमता वाढीसाठी कालवे स्वच्छ व दुरुस्त करावेत. जी कामे तातडीने करणे आवश्यक आहेत. त्या संदर्भात वेळीच कार्यवाही करावी.

सांगली जिल्ह्यातील वारणा प्रकल्पाच्या डाव्या कालव्याचे बांधकाम संदर्भात या भागातील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी सांगली यांच्याकडे निवेदन सादर केले आहे. या निवेदनावर सांगली जिल्हाधिकारी यांनी तातडीने निर्णय द्यावा. तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील दुधगंगा डावा कालवा अंतर्गत विविध कामासंदर्भात विभागाने योग्य ती कार्यवाही करावी, अशा सूचना जलसंपदा मंत्री श्री. विखे-पाटील यांनी दिल्या.

पाटण विधानसभा मतदारसंघातील मौजे माथणेवाडी गावातील ४६ खातेदार यांची खास बाब म्हणून पुनर्वसन आणि तारळी धरणप्रकल्पांतर्गत बाधित मौजे सावरघर पुनर्वसन काटेवाडी (ता.पाटण, जि. सातारा) येथील प्रकल्पग्रस्त खातेदारांच्या रोख रक्कमेच्या संदर्भात पुनर्वसन विभागाकडून अहवाल प्राप्त होताच त्यावर कार्यवाही करावी अशा सूचना मंत्री विखे पाटील यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिल्या. तर या संदर्भातील अहवाल पुनर्वसन विभागाने तातडीने जलसंपदा विभागास पाठवावा, असे मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले.



**महाराष्ट्रातील हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात आज पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. तसेच स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या कृषी दिनानिमित्त राज्यातील नागरिकांना शुभेच्छा दिल्या.**

# पीओपी मूर्तीबाबत याचिका निकाली काढण्याची गणेशोत्सव समितीची मागणी

**मुंबई, दि. १ प्रतिनिधी**

आगामी गणेशोत्सवात पीओपी मूर्ती संदर्भातील याचिका मुंबई उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. या याचिकेवर काल सोमवार ३० जून २०२५ रोजी सुनावणी झाली. यावेळी उंच व मोठ्या पीओपी गणेश मूर्तींच्या विसर्जनाच्या प्रश्नावर धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मुदत वाढ देण्याची विनंती राज्य सरकारने उच्च न्यायालयापुढे केली. त्याप्रमाणे न्यायालयाने राज्य सरकारला २१ जुलै २०२५ रोजी धोरणात्मक निर्णय सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच या प्रकरणी २३ जुलै २०२५ रोजी पुढील सुनावणी घेण्याचे ठरवले आहे. मात्र पीओपी गणेश मूर्ती संदर्भात तातडीने सुनावणी घेणेबाबत उच्च न्यायालयाला विनंती करण्यासाठी बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीचे राज्य सरकारला निवेदन दिले असल्याची माहिती समितीने दिली आहे. उंच गणेशमूर्तींच्या विसर्जनाबाबत मार्गदर्शक प्रणालीसाठी बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीने यापूर्वीच राज्य शासनाला लेखी स्वरुपात शिफारशी केल्या आहेत.

मुंबई परिसरात सुमारे १२ हजार सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आहेत. दरवर्षी सर्वसाधारणपणे मुंबईतील सुमारे २० टक्के सार्वजनिक मंडळे गणेश चतुर्थीच्या महिनाभर आधी श्रींची मूर्ती मंडपात आणतात. त्यानंतर मंडळांकडून अंतर्गत सजावटीच्या कामाला सुरुवात होते. यंदा २७ ऑगस्ट २०२७ रोजी गणेश चतुर्थी आहे. त्यामुळे यंदा जुलै महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यापासून सार्वजनिक मंडळांचे श्रींचे आगमन सोहळे सुरु होतील. त्यापूर्वीच पीओपी मूर्तींच्या विसर्जनाबाबत सुस्पष्ट मार्गदर्शक प्रणाली जाहीर झाली नाही तर मंडळांची चिंता वाढेल.

विसर्जनासंदर्भातील धोरणाअभावी माघी गणेशोत्सव २०२५ मधील मुंबई उपनगरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या काही गणेश मूर्तींचे अद्याप विसर्जन झालेले नाही. अशा परिस्थितीत मुख्य उत्सवापूर्वी विसर्जनाची मार्गदर्शक प्रणाली जाहीर होणे आवश्यक आहे. गणेशोत्सवासाठी राहिलेला अल्प कालावधी आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचा विचार करता राज्य सरकारने उच्च न्यायालयाला तातडीने सुनावणी घेण्याची विनंती करावी, असे निवेदन बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीने मुख्यमंत्री महोदयांना दिले आहे.

# जीटीबी नगर शिव कोळीवाडा येथील सिंधी निर्वासितांच्या 25 इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा

**मुंबई, दि. १ प्रतिनिधी**

स्वातंत्र्योत्तर भारतातील स्थलांतरितांसाठी सन १९५८ मध्ये उभारण्यात आलेल्या गुरु तेग बहादुर नगर, शीव कोळीवाडा येथील सिंधी निर्वासितांच्या २५ इमारतींच्या पुनर्विकासासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) तर्फे निविदा प्रक्रिया राबवून मे. किस्टोन रिअलटर्स यांची कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांच्या हस्ते विकासकाला स्वीकृती पत्र प्रदान करण्यात आले. यामुळे इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. वांद्रे पूर्व येथील महाडा मुख्यालयात कार्यक्रम पार पहला.

सुमारे ११. २० एकर जागेवर पसरलेल्या या ऐतिहासिक जी.टी.बी. नगर वसाहतीतील सिंधी निर्वासितांच्या २५ इमारतींमध्ये सुमारे १२०० सदनिका होत्या. सन २०२० मध्ये या इमारती बृहन्मुंबई महापालिकेने धोकादायक जाहीर केल्याने पाहण्यात आल्या आणि त्यानंतर रहिवाश्यांना अन्यत्र स्थलांतरीत व्हावे लागले. रहिवाशांच्या मागणीनुसार खाजगी जमिनीवरील हा पुनर्विकास प्रकल्प म्हाडामार्फत राबवण्याचा निर्णय शासनाने घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली, म्हाडा मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळामार्फत प्रकल्प राबविण्याचे धोरण ठरवण्यात आले. याप्रसंगी म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल म्हणाले की, जी.टी.बी. नगर शीव कोळीवाडा सिंधी निर्वासितांच्या इमारतींचा पुनर्विकास प्रकल्प कन्स्ट्रक्शनकृत अॅडवल डेव्हलपमेंट पहिला पुनर्विकास प्रकल्प आहे. खाजगी जमिनीवर असलेल्या इमारतींचा म्हाडामार्फत पुनर्विकास केला जाणार असून हा एक ऐतिहासिक, पथदर्शी प्रकल्प ठरणार आहे. या प्रकल्पाकरिता संबंधित एजन्सीला मास्टर प्लॅन बनवण्याच्या सूचना दिल्या असून या प्रकल्पाच्या प्रगतीवर बारकाईने लक्ष ठेवणार असल्याचे जयस्वाल यांनी सांगितले. तसेच या गृहनिर्माण संस्थांमधील ५ ते ७ सदस्यांची एक समिती स्थापन करण्यात यावी जेणेकरून या प्रकल्पाव्या प्रगतीचा आलेखा वेळोवेळी घेता येईल, असे जयस्वाल यांनी सांगितले. प्रकल्पातील १२०० रहिवाशांचे पुनर्वसन प्राधान्याने करण्याचे निर्देश जयस्वाल यांनी दिले.

याप्रसंगी आमदार सेल्वन म्हणाले की, सदर रहिवाशांचे पुनर्वसन बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाव्या धर्तीवर व्हावे अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. कार्यक्रमास आमदार कॅप्टन तमिल सेल्वन, म्हाडा मुंबई मंडलाचे मुख्य अधिकारी मिलिंद बोरीकर, किस्टोन संचालक बोमन इराणी, उपमुख्य अभियंता भूषण देसाई, तसेच राहुल व्हटकर हे मान्यवर उपस्थित होते. स्थानिक नागरिक उस्थित होते.

# औरंगजेबाच्या अनुयायांना शालीनतेवर बोलण्याचा अधिकार नाही – रवींद्र चव्हाण

**मुंबई, दि. १ प्रतिनिधी**



काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी भाजपवर केलेल्या टीकेला भाजपचे कार्याध्यक्ष आणि भावी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सडेतोड प्रत्युत्तर दिले आहे. "औरंगजेबाच्या अनुयायांना शालीनतेवर बोलण्याचा अधिकार नाही," अशा शब्दांत त्यांनी काँग्रेसवर घणाघात केला.

रवींद्र चव्हाण यांनी आपल्या एक्स पोस्टमध्ये काँग्रेसवर टीका करताना म्हटलं, "आणि हे कोण सांगतेय... सातत्याने अनुनयासाठी औरंगजेबाची भलावण करणारी, कौरव आणि रावणांची फौज असलेली काँग्रेस. हर्षवर्धनजी, तुम्ही पृथ्वीराज चव्हाण, नाना पटोले, विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात यांना तरी विचारले की महाराष्ट्रातील सर्वांत शालीन नेता कोण, तर ते झोपेतही एकच नाव घेतील – आमचे नेते देवेंद्र फडणवीस यांचेच."

चव्हाण पुढे म्हणाले, "या चौघांशी बोलण्यात तुम्हाला अडचणी असतील तर सांगा, आम्ही मध्यस्थी करू. बाकी रोज खोटं बोलणाऱ्या राहुल गांधींच्या 'सत्यमेव जयते' चं वास्तव सर्वांनाच माहिती आहेच."

त्यांच्या या परखड वक्तव्यानंतर राज्यातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. दरम्यान, देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्रातील सर्वांत शालीन नेते असल्याचा पुनरुच्चार करत चव्हाण यांनी काँग्रेसवर टीकेची झोड उठवली आहे.

# कांदिवलीत जगन्नाथ यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुंबई, दि. १ प्रतिनिधी**

मुंबईतील कांदिवलीमध्ये भगवान श्री जगन्नाथाची रथयात्रा मोठ्या थाटामाटात काढण्यात आली. ही रथयात्रा लोखंडवालाच्या अलिका हॉलपासून सुरू झाली. या यात्रेपूर्वी विद्वान संतांनी भगवान जगन्नाथाच्या महिमाचे स्तवन केले. या यात्रेत हजारो पुरुष, महिला, वृद्ध आणि मुले सहभागी झाली. सर्व भाविकांनी भजनांवर नृत्य केले. आणि भगवान जगन्नाथाच्या भक्तीत मग्न झाले. अलिका हॉलपासून सुरू झालेली रथयात्रा लोखंडवालाच्या अनेक मुख्य रस्त्यांवरून गेली. अनेक ठिकाणी रथयात्रेचे उत्साहाने स्वागत करण्यात आले.

रथयात्रा यशस्वी करणाऱ्यांपैकी एक असलेले राजेश शर्मा म्हणाले की, ही यात्रा गेल्या अनेक वर्षांपासून अविरतपणे सुरू आहे, कपिलच्या मार्गदर्शनाखाली ती तशीच सुरू राहील, ही यात्रा केवळ एक उत्सव नाही तर आता ती एका उत्सवात रूपांतरित झाली आहे. भाविकांसाठी विविध ठिकाणी पाणी आणि महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आलीआहे. भाविकांसाठी उत्कृष्ट सुरक्षा व्यवस्था देखील करण्यात आली आहे, केवळ संपूर्ण लोखंडवालाच नाही तर आज आपला संपूर्ण देश देवाच्या भक्तीत तल्लीन झाला आहे. आम्ही या यात्रेशी राष्ट्राची भक्ती जोडत आहोत.

# पालिकेकडून बोरिवलीतील झोपडीधारकांना नोटिसा

**मुंबई, दि. १ प्रतिनिधी**



प्रतिनिधी बोरीवली पूर्वकडील सुकुरवाडी हेमराज शाळा ते पश्चिम द्रुतगती महामार्ग यांना जोडणाऱ्या २७.४५ मीटर मंजूर नियोजित रस्ता रेषेत बाधित होणाऱ्या झोपडीधारकांना पालिकेने नोटीसा दिल्या आहेत. यामुळे रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण परसले आहे. ऐन पावसाळ्यात नोटीसा, पुनर्वसन कुठे होणार याविषयी महापालिकेचे कुठलाही अजेंडा ठरलेला नसतांना नोटीसा जारी केल्याने रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. याविरोधात रहिवाशांनी पालिका आर. मध्य विभागातील प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला आहे. रस्ते रुंदीकरणाच्या बाधित जागेवर अगोदर झोपडपट्टी पुनर्वसन योजना लागू आहे. या योजनातर्गत सुमारे ५० ते ६० घरे विकासकांकडून निष्कासित करण्यात आली आहेत. मात्र अद्यापही याठिकाणी विकासकाने इमारत उभारणीचे काम सुरु केलेले नाही. निष्कानित झोपडीधारक इतरत्र वास्तव्याला असून त्यांना गेली ५ वर्षांपासून विकासकाकडून भाडेही दिले जात नाही. तर मग या बाधितांची कोण जबाबदारी घेणार, पालिका त्यांनाही रस्ता रुंदीकरणातील घरे देणार का ? असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे.

**सात दिवसांत माहिती सादर करण्याचे आदेश**

मुंबई महापालिका अधिनियम, १८८८ चे कलम ४८५ - अ अन्वये प्राधिकृत केल्याप्रमाणे, बोरीवली (पूर्व), सुकुरवाडी, हेमराज शाळा ते पश्चिम द्रुतगती महामार्ग यांना जोडणा-या २७.४५ मीटर मंजूर नियमित रस्ता रेषेत बाधीत होणा-या बांधकामाबाबतची माहिती उदा. जागेची मालकी, भोगवटादार, जागेच्याबाबत न्यायालयात असलेले वादविवाद, भारमुक्त, गहाण, कब्जेदार, इत्यादी माहिती आपण सहाय्यक आयुक्त, आर/ मध्य विभाग, मुंबई महापालिका यांना सात दिवसांत सादर करावी व महापालिकेस रस्तारुंदीकरणा कामी सहकार्य करावे. महापालिकेच्या प्रचलित धोरणानुसार आपण पर्यायी जागेत पुनर्वसनास पात्र झाल्यास, त्यानुसार आपले पुनर्वसन करण्यात येईल, असे पालिकेने जारी केलेल्या नोटीसीमध्ये नमूद केले आहे.

# देशात एकच टाहो : रोजी, मजुरी, नोकरी, काम द्या हो!

भारतात सन १९८० ते सन १९९५ या काळात मोठ्या प्रमाणात बेकारी होती. परंतु मुक्त अर्थव्यवस्थेमुळे देशातला रोजगार निर्मितीचा प्रश्न बऱ्याच अंशी कमी झाला होता. मात्र सांप्रतकाळी तर त्याहून चिंताजनक स्थिती निर्माण झाली आहे. सन २०२४च्या निवडणूकीनंतर रोजगार उपलब्ध करून दिले जातील अशी युवकांना व जनतेला अपेक्षा होती, मात्र सारे स्वप्न धुळीस मिळाले. बेकारीची समस्या दिवसेंदिवस वाढतच आहे. जुन्या नोकरदारांना दोन-दोन, तीन-तीन अतिरिक्त प्रभार सांभाळताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तरीही नोकर भरतीला ब्रेक लावलेले आहेत.

सुशिक्षित बेरोजगार मिळेल ते काम करत आहेत. फक्त पोलिस भरती सुरू आहे. त्यात वकीली, डॉक्टरेट, अभियंता, अशा पदव्या मिळविलेले तरुण उतरत आहेत, थोडा थोडका जमिन तुकडा विकून उच्च शिक्षण घेतलेले तरुण हॉटेलमध्ये कपबश्या विसळण्याचे कामसुद्धा शोधत आहेत.



कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे
गडचिरोली.
९४२३७१४८८३

गावातील गुरे, शेळ्या जंगालात नेऊन चारण्याचे काम करू लागले आहेत. सरकारी नोकरीच्या चार-पाच जागेसाठी लाखो तरुणांचे अर्ज जमत आहेत. त्यामुळे छुपी वशिलेबाजी फोफावत आहे. त्यातल्या त्यात अजार्ची शुल्कही गरीबांना आणखी खोल डोहात ढकलणारी असते. रु.९०० ते १००० एवढी मोठी रक्कम जमा करण्यात त्यांचे बरेच दिवस खर्ची पडलेले असतात. कारण कोठेही त्यांना दररोज १०० रुपयांची मोलमजुरी करावी लागत आहे. गडचिरोली सारख्या अतिदुर्गम जिल्ह्यात जल सिंचनाच्या सोयी नाहीत, त्यामुळे शेतकरी केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने शेती पिकली तर पिकली नाहीतर फेकली, अशी बिकट परिस्थिती. उद्योगधंदे, कारखाने, प्रकल्प आदी काहीच नाहीत. त्यामुळे रोजी, मजुरीचीही वाणवाच आहे. सामान्य जनता अन्नान दशेत आहे, जेथील युवकवर्ग सुशिक्षित बेकार- बेरोजगार आहे, तो देश विकसनशील देश आहे, असे कसे काय म्हणता येईल?

बेकार म्हणजे ज्याला काम मिळालेले नाही असा व्यक्ती होय, बेकारीचा अभ्यास करताना दोन बाबी आधी स्पष्ट झाल्या पाहिजेत, पहिली म्हणजे बेकारीची व्याख्या कार्यकारी लोकसंख्येपर्यंतच मयार्दीत ठेवावी लागते, लोकसंख्येतील ० ते १४ वयोगट व ज्येष्ठ नागरिक इ. घटक वजा केल्यावर जी उरते ती कार्यकारी लोकसंख्या होय.

बेकारी म्हणजे अशी स्थिती होय, की जेथे व्यक्ती प्रचलित मजुरीच्या दरावर काम करायला तयार असतो, परंतु त्याला काम मिळत नसते. बेरोजगारीमुळे देशातील मानवी साधनसंपत्तीचा अपव्यय होतो. बेरोजगारीमुळे देशासमोरील अनेक समस्यांमध्ये वाढ होते. बेकारीमुळे देशातील सकल राष्ट्रीय उत्पन्न कमी राहते आणि समाज हा गरीब व मागासलेला राहतो. बेकारीमुळे देशाच्या अर्थव्यस्थेच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होतो.

**बेकारीची संकल्पना :**

(१) अनैच्छिक बेकारी - या बेकारीला दृश्य किंवा उघड बेकारी असेही म्हणतात. ही बेकारी म्हणजे अशी एक अवस्था की लोकांची काम करण्याची पात्रता असते आणि काम करायला तयार असतात, परंतु त्यांना काम प्राप्त होत नाही. ही स्थिती श्रमांचा अतिरिक्त पुरवठा व त्या तुलनेत श्रमिकांची कमी मागणी यातून निर्माण होते. यामध्ये माणसांची मनस्थिती नसतानाही असेल ते कामे करावी लागतात तेही विनामोबदला किंवा कमी मोबदला; त्यामुळे त्यांचे हक्कांचे उच्छाटन होत असलेले दिसून येते. तसेच कमी मिळालेल्या मोबदल्याने त्यांच्या परिवारातील आर्थिक अडचणी पूर्ण होत नसल्याने बेकारींचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते.

(२) ऐच्छिक बेकारी - हा बेकारीचा असा प्रकार आहे की जेथे व्यक्ती काम करण्यासाठी पात्र असते पण तिची काम करण्याची इच्छा नसते. खऱ्या अर्थाने ही बेकारीची स्थिती नसून निष्क्रियतेची स्थिती आहे.

(३) न्यून किंवा अर्धबेकारी- ही एक अशी स्थिती होय, की जेथे व्यक्तीची काम करण्याची क्षमता पूर्णपणे वापरली जात नाही, किंवा तिला कनिष्ठ पातळीवर काम करावे लागते. उदा. १. पदव्युत्तर शिक्षित व्यक्तीने पहारेकऱ्याची नोकरी करणे. २.इंजिनिअर व्यक्तीने शिपायाची नोकरी करणे.

(४) पूर्ण बेरोजगारी - व्यक्तीकडे पात्रता, कौशल्य, इच्छाशक्ती, असूनही कोणत्याच ठिकाणी काम प्राप्त होत नाही. याला पूर्ण बेरोजगारी म्हणतात

**बेकारीचे प्रकार :**

१. ग्रामीण बेकारी- ही बेकारी प्रामुख्याने ग्रामीण भागात दिसून येते. ही एक गंभीर स्वरूपाची समस्या आहे. यामध्ये खालील प्रकार येतात.

अ) हंगामी बेकारी- भारतात बहुतेक शेतकरी लागवडी साठी पावसावर अवलंबून असतात. त्यामुळे वषार्तून एकदाच पीक घेता येते. यामुळे ग्रामीण शेतमजुरांना केवळ ४ ते ५ महिनेच काम प्राप्त होते व उर्वरित काळ ते बेकार राहतात. म्हणून या प्रकाराला हंगामी बेकारी म्हणतात. ही बेकारी शहरी भागात सुद्धा आढळते. उदा. पर्यटन क्षेत्रातील मार्गदर्शक, लग्नसमारंभातील वादक इत्यादी.

ब) प्रच्छन्न बेकारी (छुपी)ः अति लोकसंख्येच्या अविकसित आणि विकसनशील देशांमध्ये प्रच्छन्न बेकारी ही एक मूलभूत स्वरूपाची समस्या आहे. या प्रकारच्या बेकारीत ज्या ठिकाणी काम करण्यासाठी कमी लोकांची गरज आहे, तिथे गरजेपेक्षा जास्त लोक काम करतात, तेव्हा अतिरिक्त श्रमिकांची सीमान्त उत्पादकता शून्य राहते. म्हणजेच अतिरिक्त लोक उत्पादनात कोणतीही भर टाकत नाही व छुपी बेकारी निर्माण होते.

उदा. एका कारखान्यात उत्पादन प्रकियेसाठी केवळ २० कामगारांची गरज असताना तेथे २५ कामगारांनी काम करणे. येथे अतिरिक्त ५ कामगार हे छुपे बेकार ठरतील व ते उत्पादनात कोणतीही भर टाकत नाही. अशा अतिरिक्त कामगारांनी उत्पन्नाचे मूल्य विनाकारण वाढते.

क) शहरी बेकारीः जी बेकारी शहरी भागांमध्ये आढळून येते तिला शहरी बेकारी म्हणतात. याचे खालील प्रकार आहेत. सुशिक्षित बेकारी- ज्या व्यक्तीने शिक्षण घेतले आहे आणि त्याची काम करण्याची इच्छा व पात्रता असूनही काम मिळत नसेल, अशा स्थितीला सुशिक्षित बेकारी असे म्हणतात. ही बेकारी दहावी, बारावी पास झालेले, पदवीपूर्व, पदवीधर, पदव्युत्तर शिक्षण घेतलेले या लोकांमध्ये आढळून येते.

नोकरीयोग्य शिक्षणासाठी जास्त पैसे मोजावे लागतात. अनेकांच्या आर्थिक परिस्थितीमुळे व उच्च शिक्षणासाठी आकारण्यात येणाऱ्या भरमसाठ शुल्कामुळे योग्य शिक्षण घेणे शक्य होत नाही. म्हणूनही बेकारी वाढते.

शिक्षण घेणारे दिवसेंदिवस वाढत असले तरी त्यांच्या शिक्षणासारखे त्यांना काम मिळत नाही. उच्च पदवी घेऊन देखील आज लाखो सुशिक्षित बेकारांचे प्रमाण वाढले आहे.

सरकार कोणतेही असो पण त्या सुशिक्षितांना त्यांच्या पदवी अनुसार काम मिळाले पाहिजे, नाहीतर ही बेकारी भविष्यात खूप वाढेल व त्यांना पाहून येणारी पुढची पिढी ही शिक्षणापासून वंचित राहील, असा विचारही दिसून येतो.

तांत्रिक बेकारी - उत्पादनाच्या तंत्रात बदल झाल्याने जी बेकारी निर्माण होते, त्या बेकारीला तांत्रिक बेकारी असे म्हणतात. शहरी भागात कारखानदार श्रमिकांऐवजी यंत्रांना जास्त प्राधान्य देतात. त्यामुळे उत्पादन खर्च कमी होतो आणि नफा वाढतो. उच्च दजार्चे तंत्रज्ञान वापरून उत्पादन करणे, यामुळे श्रमिकांना कामावरून कमी केले जाते. त्यामुळे तांत्रिक बेकारी निर्माण होते.

घर्षणात्मक बेकारी (संघर्षात्मक बेकारी) -

या प्रकारच्या बेकारीमध्ये आर्थिक संघषार्मुळे श्रमिकांना तात्पुरत्या स्वरूपात बेकार व्हावे लागते. यंत्रातील बिघाड, कच्च्या मालाची टंचाई, वीज कपात इ. मुळे श्रमिकांना कामावरून कमी केले जाते. अशा स्थितीत श्रमिकांना एक काम सोडल्यापासून दुसरे काम स्वीकारेपर्यंत बेकार राहावे लागते, म्हणून त्याला घर्षणात्मक बेकारी म्हणतात. कारण या बेकारीच्या मधल्या काळात त्यांनी परिस्थितीशी संघर्ष केलेला असतो.

ड) चक्रीय बेकारी - तेजीच्या अवस्थेनंतर येणाऱ्या मंदीच्या अवस्थेत प्रभावी मागणीच्या कमतरतेमुळे निर्माण होणाऱ्या बेकारीला चक्रीय बेकारी म्हणतात. हा बेकारीचा प्रकार व्यापार चक्रामुळे निर्माण होतो. मंदीच्या काळात प्रभावी मागणीच्या कमतरतेमुळे आर्थिक क्रिया मंदावतात त्यामुळे उद्योगांचे मालक उत्पादन कमी करतात. परिणामी कामगारांना कामावरून कमी केले जाते. उदा. २००८ च्या मंदीमुळे माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात अशाच प्रकारची चक्रीय बेकारी निर्माण झाली होती.

ई) संरचनात्मक बेकारी- जेव्हा अर्थव्यवस्थेत संरचनात्मक व तंत्रज्ञानात्मक बदल होतात तेव्हा ही बेकारी निर्माण होते. जेव्हा मागासलेल्या व परंपरागत अर्थव्यवस्थेत संरचनात्मक बदल होऊन ती आधुनिक व विकसित होत जाते तेव्हा मागणीमध्ये मूलभूत स्वरूपाचे बदल होतात. त्यातून संरचनात्मक बेकारी निर्माण होते. ही बेकारी एक दीर्घकालीन घटना होय.

उदा. ऑटो रिक्षांमुळे शहरातील घोडागाडी कालबाह्य झाली म्हणजेच त्यांना संरचनात्मक बेकारी सहन करावी लागली.

**भारतातील बेकारीची परिस्थिती :** भारतात ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणावर कामगारांना इच्छेविरुद्ध बेकार राहावे लागते, हे निर्विवाद सत्य आहे. नेमके किती लोक बेकार आहेत, त्याचा अंदाज घेणे कठीण आहे. नियोजन मंडळ, जनगणनेचा अहवाल, तसेच मध्यवर्ती सांख्यिकी संस्था यांना या बाबतीत अचूक माहिती नाही. या बाबतीत काही अंदाज पुढीलप्रमाणे देता येतील- शहरी व ग्रामीण भागातील बेरोजगारी-

**बेकारीची कारणे :**

१. लोकसंख्या वाढीची जास्त गती- स्वातंत्र्यानंतर भारताची लोकसंख्या वेगाने वाढू लागली. त्यामुळे श्रमशक्ती वाढत गेली. अपुऱ्या आर्थिक विकासामुळे या अतिरिक्त श्रमशक्तीला द्वितीय व तृतीय क्षेत्रात सामावून घेता आले नाही. त्यामुळेच बेकारी वेगाने वाढत गेली.

शेती मशागतीचे मागास स्वरूप- अज्ञान व निरक्षरतेमुळे भारतातील शेतकरी शेतीमध्ये परंपरागत पद्धतीचा वापर करतात. त्यामुळे भूमीची उत्पादकता कमी राहते आणि रोजगार वाढत नाही. सरकारी नोकर भरती बंद- यामुळे सुशिक्षित बेरोजगारी शिगेला गेली. सरकारच्या नोकर कपात मोहिमेद्वारे सुद्धा बेकारीत अवाढव्य वृद्धी होते, परिणामतः बेकारी वाढते.

भारतात सन १९८० ते सन १९९५ या काळात मोठ्या प्रमाणात बेकारी होती. परंतु मुक्त अर्थव्यवस्थेमुळे देशातला रोजगार निर्मितीचा प्रश्न बऱ्याच अंशी कमी झाला होता. मात्र सांप्रतकाळी तर त्याहून चिंताजनक स्थिती निर्माण झाली आहे. बेकारीची समस्या दिवसेंदिवस वाढतच आहे. जुन्या नोकरदारांना दोन-दोन, तीन-तीन अतिरिक्त प्रभार सांभाळताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तरीही नोकर भरतीला ब्रेक लावलेले आहेत.

सुशिक्षित बेरोजगार मिळेल ते काम करत आहेत. फक्त पोलिस भरती सुरू आहे. त्यात वकीली, डॉक्टरेट, अभियंता, अशा पदव्या मिळविलेले तरुण उतरत आहेत, थोडा थोडका जमिन तुकडा विकून उच्च शिक्षण घेतलेले तरुण हॉटेलमध्ये कपबश्या विसळण्याचे कामसुद्धा शोधत आहेत. गावातील गुरे, शेळ्या जंगालात नेऊन चारण्याचे काम करू लागले आहेत.

सरकारी नोकरीच्या चार-पाच जागेसाठी लाखो तरुणांचे अर्ज जमत आहेत. त्यामुळे छुपी वशिलेबाजी फोफावत आहे. त्यातल्या त्यात अजार्ची शुल्कही गरीबांना आणखी खोल डोहात ढकलणारी असते. रु.९०० ते १००० एवढी मोठी रक्कम जमा करण्यात त्यांचे बरेच दिवस खर्ची पडलेले असतात. कारण कोठेही त्यांना दररोज १०० रुपयांची मोलमजुरी करावी लागत आहे.

आज सन २०२४ नंतरही विज्ञानयुगात गडचिरोली सारख्या अतिदुर्गम जिल्ह्यात जल सिंचनाच्या सोयी नाहीत, त्यामुळे शेतकरी केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने शेती पिकली तर पिकली नाहीतर नासली, अशी बिकट परिस्थिती आवासून आहे.

उद्योगधंदे, कारखाने, प्रकल्प आदी काहीच नाहीत. त्यामुळे रोजी, मजुरीचीही वाणवाच आहे. सामान्य जनता अन्नान दशेत आहे, जेथील युवकवर्ग सुशिक्षित बेकार- बेरोजगार आहे, तो देश विकसनशील देश आहे, असे कसे काय म्हणता येईल?

# मायबापाने आपल्याला कुठवर पोसायचे?

बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी, ता.अहमदपूर जि. लातूर.
7498715661

प्रत्येक आईवडील बालवयात मुलांचे सर्व हट्ट पूर्ण करतात. त्यांचे योग्य पालन पोषण करून लहानाचे मोठे करतात. वयात आल्यावर शाळेत नाव घालतात. त्यांना भरपूर पैसा ओतून चांगल्या कोचिंग क्लासेसला शिकायला पाठवतात. दहावी व बारावी पर्यंत त्यांना कोणतीच आर्थिक बाब कमी पडू देत नाहीत.

मुलांच्या सांगण्याप्रमाणे आईवडील त्यांना प्रत्येक वस्तू नेटाने पुरवतात. शाळेत जाण्यासाठी त्यांना भारी किंमतीचे हायफाय कपडे घेऊन देतात. चांगल्या किंमतीचा गणवेश घेऊन देतात. नियमित घालण्यासाठी महागड्या किंमतीचे कपडे विकत घेतात. शाळा लांब असेल तर मुलाला शाळेत जायला सायकल किंवा बाईक घेऊन देतात.

पैसा किती जाईल व किती राहील? याचा अंदाज देखील पालक लावत नाहीत. फक्त आपल्या मुलांनी भरपूर शिकावे आणि शासनाच्या मोठ्या पदावर विराजमान व्हावे असे प्रत्येक आई-वडिलांचे स्वप्न असते आणि ते स्वप्न सत्यात उतरवणे प्रत्येक मुलाचे कर्तव्य असते. ते कर्तव्य पार पाडण्यासाठी मुलांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे.

मुलांच्या सगळ्या शैक्षणिक व शारीरिक गरजा पूर्ण करण्यासाठी प्रत्येक पालक सक्षम असतात. पालक गरीब असोत किंवा श्रीमंत, ते मुलांच्या शैक्षणिक व शारीरिक गरजा पूर्ण करायला कधीच कमी पडत नाहीत.

त्यांना वाटते की, दहावी व बारावी झाल्यावर आपली मुले स्वतःच्या हिंमतीने कष्ट करून शिक्षणाला पैसा लावतील. शिक्षण घेत घेत काम देखील करतील. म्हणून प्रत्येक आईवडील आपल्या मुलांना दहावी व बारावीपर्यंत त्यांच्या शिक्षणाला मोकळ्या मनाने व सढळ हाताने पैसा लावतात. सावकाराचे कर्ज काढून म्हणा किंवा दागदागिने गहाण ठेवून म्हणा ते आपल्या मुलांच्या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी लागेल तेवढा पैसा लावतात.

काही मुले आपल्या परिस्थितीची जाण ठेवून अहोरात्र जोमाने अभ्यास करतात. नियमित वाचन व लेखन करू लागतात आणि चांगल्या गुणांनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होतात. आता मुले मोठी झाल्यामुळे आई-वडिलांना वाटते की, पुढील उच्च शिक्षण मुलांनी स्वतःच्या हिंमतीवर शिकावे आणि स्वतःच्या पायावर उभे राहावे. कमी भरतीला पैसा पुरवायला तर आम्ही आहोतच. असा मानस गरीब कुटुंबातील प्रत्येक आई-वडिलांचा असतो.

गरीब घरातील होतकरू मुले आपल्या परिस्थितीची जाणीव ठेवतात आणि स्वबळावर कष्ट करून शिक्षणाला पैसा लावतात. कारण त्यांना माहीत असते की आपल्याकडे आर्थिक उत्पन्नाचे कोणतेच साधन नाही.

मायबापाने लहानाचे मोठे होईपर्यंत म्हणजेच शालेय जीवन पूर्ण होईपर्यंत आपल्याला सांभाळले, मोलमजुरी करून शिक्षणाला पैसा लावला, आता मायबापाला आपण कुठवर कष्ट करू द्यायचे? त्यांना कुठवर पैसा मागायचा? त्यांच्या जीवावर आपण किती दिवस जगायचे? असे प्रश्न माय बापाच्या कष्टांची जाणीव असणाऱ्या होतकरू मुलाला नक्कीच पडतात.

पण खेदाची बाब अशी की, काही घरातील मुलांना आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव नसते, आई-वडिलांचा जीवन संघर्ष कळत नसतो, घरातील आर्थिक परिस्थितीची जाणीव नसते, फक्त आई-वडिलांकडून पैसा घ्यायचा आणि त्या पैशावर मौजमजा करायची. शिक्षणाच्या नावाखाली माय बापाकडून पैसा उकळणे आणि तो पैसा व्यसनावर उधळणे हे आजकालच्या मुलांचे वैशिष्ट्य बनले आहे.

एक अतिशय गरीब कुटुंबात एका बापाला एक मुलगा व एक मुलगी असते. मुलगी समजदार व जाणकार असते. तिला आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव असते. म्हणून ती पैशाचा उडवा कधीच करत नसते, तिचे राहणीमान एकदम साधे असते. पैसा जपून वापरणे आणि मायबापाला घर कामात व शेती कामात मदत करणे हे त्या मुलीचे दैनंदिन काम असते. मुलगा मात्र चंगळवादी जीवनाचा शौकीन असतो. त्याला आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव नसते. त्याला मायबापाचा जीवन संघर्ष माहित नसतो. त्याचे राहणीमान एकदम आलिशान असते.

मित्रांमध्ये राहणे, पाट्र्या खाणे, दारू ढोसणे, मटका लावणे आणि शिक्षणाच्या नावाखाली माय बापाकडून निघेल तेवढा पैसा उकळणे, हे त्याचे रोजचे काम असते. त्या मुलाचा बाप मात्र हमाली किंवा रोजगार करून त्या कुटुंबाचा घर प्रपंच सांभाळायचा, केवळ कष्टाच्या बळावर मुलांना शिक्षण शिकवायचा, त्यांना मागेल तेव्हा पैसा द्यायचा म्हणजे मुलांचे हट्ट पुरवण्यात तो कधीच कमी पडायचा नाही.

एके दिवशी तो बाप एका कंपनीत हमालीचे काम करत होता. तो एका ट्रॅक्टरमधील ज्वारीचे पोते खाली उतरवायचे काम करत असताना त्या बापाचा मुलगा त्याच्याकडे आला आणि त्याने बापाकडे पैसे मागण्याचा तगादा लावला.

आज माझा वाढदिवस आहे, आणि मला माझ्या मित्रांना पार्टी द्यायची आहे, त्यासाठी मला काही पैसे हवे आहेत, तुम्ही मला द्या, तो मुलगा अशी मागणी आपल्या बापाकडे घालतो. तेव्हा बाप म्हणतो की, पोरा माझ्याकडे काही जास्त पैसे नाहीत, फक्त हजार रुपयेच माझ्याकडे आहेत, आणि ते पैसे मी घराचा किराया देण्यासाठी ठेवले आहेत.

किरायादार रोज घरी येऊन पैसे मागत आहे. पैसे नसल्यामुळे मी त्याला देण्याचे टाळत आहे. माझ्याकडे असलेल्या हजार रुपयातील चारशे रुपये तुला देतो. बाकीचे तू कोणाकडून तरी मागून घे, असे वडील म्हणतात पण तो मुलगा चारशे रुपये घ्यायला तयार नसतो.

तो बापाला शिव्या घालतो, तुम्ही माझ्यासाठी काय केले, असे म्हणतो. तुम्हाला पैसे देता येत नसतील तर तुम्ही मला पैदा का केले? दहा लोकांमध्ये बापाच्या कॉलरला धरून बापाला धक्के देत बोलतो आणि बापाच्या खिशात असलेले हजार रुपये काढून घेतो... काही वेळातच तो किरायादार बापाकडे किराया मागायला येतो आणि त्याला पैसे मागतो, तेव्हा बापाला काय बोलावे हेच कळत नाही, किरायासाठी ठेवलेले पैसे मुलगा हिसकावून घेऊन गेला हो मालक!

म्हणून बाप त्या किरायादाराला सांगतो. किरायादार मात्र काहीच ऐकून घ्यायला तयार नसतो. माझे पैसे आत्ताच्या आत्ताच मला द्या नाहीतर रूम खाली करा असे बजावून सांगतो...बापाला खूप टेन्शन येते मुलाने केलेला अपमान आणि किरायादाराने बोललेले शब्द त्याच्या मनावर आघात करतात. तो एका झाडाखाली बसून ढसाढसा रडतो. आणि त्याला आपण मुलाला जन्म दिल्याचा पश्चाताप वाटतो. आपण मुलाला जन्म देऊन काय गुन्हा केला? मुलाला जन्म देण्याचा मोबदला मुलाने असा द्यायचा का?

त्या किरायादाराची यात तेवढी चुकी नसते, तो किरायादार खूप दिवसांपासून आपला थकीत किराया मागत होता पण वडील पैसे नसल्यामुळे किराया देण्यास टाळाटाळ करत होते. पण मुलाची मात्र यात खूप मोठी चूक असते. मुलाने जन्मदात्या बापाला असे अपमानास्पद बोलून व कॉलरला धरून धक्के देणे हे खरंच माणुसकीला अशोभनीय कृत्य आहे. बापाने जन्म दिला म्हणून मरेपर्यंत बापानेच मुलाला पोसायचे का? हे कोणत्या पुस्तकात लिहिले आहे? कोणत्या संताने, महापुरुषाने व तत्त्ववेत्याने सांगितले आहे का?

मुलगा कर्ताधर्ता होईपर्यंत मुलाचा सांभाळ करणे, त्याला दहावीपर्यंत शिक्षणाला पैसा लावणे हे बापाचे कर्तव्य असते. कारण दहावीपर्यंत मुले तेवढे सक्षम झालेले नसतात. पण पुढील उच्च शिक्षण स्वतःच्या जीवावर शिकणे हे मुलाचे कर्तव्य असते. कारण तेव्हा मुले सक्षम होतात आणि कोणतेही मेहनतीचे काम करू शकतात. हे सगळ्या मुलांनी लक्षात घ्यायला हवे.

पण मुलगा लग्नाच्या वयाचा झाला, कोणतेही काम करण्यास सक्षम झाला, त्याला दुनियादारी कळू लागली, त्याला चांगल्या वाईटांची जाणीव होऊ लागली, तरीही मुलाला बापानेच सांभाळायचे असते का?

सांगायचा मुद्दा म्हणजे मुले जसजसे लहानाचे मोठे होत जातात, तसतसे आईवडील शरीराने थकत जातात. तेव्हा मुलांनी आई-वडिलांचा सांभाळ करणे, हे प्रत्येक मुलाचे परम कर्तव्य असते पण हल्ली सगळे उलटेच होऊन बसले आहे. मुलांचे लग्न झाले तरीही आईवडील त्यांना जगवताना दिसत आहेत. आता तुम्हीच सांगा मित्रांनो मायबापाने तुम्हाला कुठवर पोसायचे?

पृथ्वीवर असे कितीतरी मोठी माणसे होऊन गेली त्यांनी स्वतः कष्ट करून शिक्षण घेतले आणि जगाच्या इतिहासात आपले नाव सुवर्ण अक्षरांनी लिहिण्यास भाग पाडले. स्वतः कष्ट करून शिक्षण घेणारे व आपल्या आई वडिलांना सांभाळणारे कितीतरी लोक या जगात यशस्वी झाल्याचे दिसून येते.

आपल्याला बिरदेव डोने या मेंढपाळ मुलाचे उदाहरण देता येईल. हा बिरदेव डोने अतिशय गरीब कुटुंबातील मुलगा होता. तो दिवसभर मेंढ्या राखत अभ्यास करायचा.. आज तो बिरदेव डोने आयपीएस अधिकारी झाला आहे...त्याची प्रेरणा घेऊन आपण देखील तशी वाटचाल करावी.

■ ■ ■

## वाचक लिहितात

### गुरुपौर्णिमेचे महत्त्व

गुरुपौर्णिमा हा उत्सव आषाढ पौर्णिमा या दिवशी साजरा केला जातो. यावर्षी गुरुपौर्णिमा १० जुलैला आहे. ईश्वराचे सगुण रूप म्हणजे गुरु .आणि गुरूंचे निर्गुण रूप म्हणजे ईश्वर. गुरु याचा अर्थ, गु म्हणजे अंधकार आणि रु म्हणजे अंतःकाराला दूर करणारा, प्रकाशाकडे घेऊन जाणारा. गुरु नेहमी देवतुल्य मानले जातात. गुरु म्हणजे शिष्याला किंवा भक्ताला मायेच्या मोहजालातून अलगदपणे बाहेर काढून त्याच्याकडून, त्याच्या प्रकृतीनुसार साधना करून घेणारे. गुरु म्हणजे निरपेक्ष प्रेम, भरभरून दोन्ही हाताने शिष्यांना विद्या देणारे. आषाढ पौर्णिमेला व्यासपौर्णिमा असेही म्हणतात. महर्षी व्यास यांना सर्वश्रेष्ठ गुरु मानले जाते. आषाढ पौर्णिमेला व्यासांच्या शिष्यांनी पहिल्यांदा गुरु पूजन केले म्हणून त्याला व्यासपौर्णिमा म्हणतात. अध्यात्मात असो किंवा कुठल्याही शैक्षणिक क्षेत्रात असो गुरूंशिवाय तरुणोपाय नाही. आपल्या आयुष्यात योग्य वेळी, योग्य गुरु आले तरच आपले जीवन योग्य मार्गाने जाऊन ध्येय प्राप्ती निश्चित होते. मात्र त्यासाठी आपली पात्रता ही तेवढीच असावी लागते. जन्मदाते आई वडील पंख देतात. पण त्या पंखांना भरारी मारण्याच बळ मात्र गुरूच देतात. शिष्याची गुरूंवरील श्रद्धा, निष्ठा, भक्ती, शरणागत भाव, आज्ञापालन हे जेवढे जास्त असेल तेवढी त्याची प्रगती जलद होते. आपल्याला असणारी संसारिक आसक्ती ही केवळ साधनेनेच कमी होते. आपले षडरिपु हे फक्त गुरूंच्या मार्गदर्शनातच आपण कमी करू शकतो. अशा गुरूंविषयी कृतज्ञता म्हणून या दिवशी शिष्य, गुरूंची 'पाद्य पूजा' करतात आणि त्यांना मनोभावे गुरुदक्षिणा अर्पण करतात.

■ सौ. माधवी पत्की
नागपूर.

### सत्यस्थितीचे पोटशूळ का?

२९ जून ला दैनिक महासागर मधे 'संविधान समजावून सांगणे म्हणजे देशद्रोह का?' हे लेखन वाचले. तसेच त्यांनी त्यात उल्लेख केलेले लेखनही वाचले होते. त्यांनी उल्लेख केलेल्या लेखनात कुठेही संविधान सांगण्याला विरोध केलेला नाही. केवळ संविधानाच्या आडून श्रद्धेला तडा जाऊ नये यासाठी सावधगिरी बाळगायला सांगितली आहे. संविधानाला लेखिकेचा विरोध दिसून येतो असा आरोप २९ जूनच्या सदर लेखात केला आहे. शिवाय लेखकाने वापरलेली भाषाही असभ्य आहे. ज्या पत्राचा उल्लेख लेखकाने केला त्यात वावगे असे काहीच नाही. त्या पत्रात लेखिकेने सध्याची सत्यस्थिती मांडली आहे. त्याचे पोटशूळ का?

■ केतकी हरदास, नागपूर.

# शिक्षण म्हणजे काय रे भाऊ?

देशातील लोकांना अजूनही शिक्षणाचा अर्थ, गांभीर्य आणि उद्देश कळालाच नाही. आजही कोणाला विचारले शिक्षण म्हणजे काय तर तो व्यक्ती बिए, .बिएससी, एम ए,एम एस सी असेच सांगेल आणि सुशिक्षित म्हणजे कोण तर वरील सांगितल्या प्रमाणे शिक्षण घेणारा व्यक्ती म्हणजे सुशिक्षित असेच उत्तर येणार.

हा लेख लिहण्या मागचा उद्देश हा आहे कि एका शिक्षकाने स्वतःच्या मुलीला कमी गुण मिळाले म्हणून मारले आणि त्यात तिचा मृत्यू झाला. सदर घटना ही मनाला चटका देणारी आहेच. घटना घडल्यावर अनेक लोक स्वतः चे मत मांडून घडलेल्या घटनेचा निषेध करून पालकांनी कसे रहावे याचे सल्ले देत आहेत.

शिक्षक पित्याने मुलीची हत्या केल्याने जास्तच प्रकरण तापले गेले. शिक्षकाने जे केले ते चुकिचे आहेच परंतु बाकीचे स्वतःला सुशिक्षित समजणारे लोक बरोबर आहेत का हा प्रश्न ऐरणीवर आहे. शिक्षण म्हणजे काय, शिक्षणाचा उद्देश काय हे अजूनही आपल्याला समजले नाही. आपण थोडक्यात बघितले तर देशात पहिली मुलींची शाळा महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीमाई फुले यांनी सुरू करून महिलांच्या जिवनात क्रांती केली मानसिक, बौद्धिक व शारीरिक गुलामगिरी, अंधविश्वास व विषमतेच्या बेड्या तोडून विज्ञानवादाच्या मार्गाने जाऊन स्वतः मध्ये वैचारिक परिवर्तन होण्याच्या उद्देशाने सुरू केलेल्या शिक्षणाला कुटील व बुद्धीहीन लोकांनी विरोध केला. तरीही अंगावर शेणमाती घेऊन शिक्षणाची कास सोडली नाही. म्हणून चौथ्या वर्गातील मुक्ता प्रश्न विचारते आमचा धर्म कोणता?

आज महिलांच्या कपाटात साड्या आणि साड्यावर परफ्यूम चा वास येण्यासाठी सावित्रीमाई यांनी शेण, माती आणि खरकटे पाणी अंगवर सहन केले म्हणजे काय असेल शिक्षण? छत्रपती शाहु महाराजांनी स्वतःच्या राज्यात बोर्डींग सुरू करून एक एक आण्यासाठी संघर्ष करावा लागणा?या काळात मुलांना शाळेत पाठवले नाही तर पालकांना एक रूपया दंड आकारणारे शाहु महाराज शिक्षणाला एवढे महत्त्व का देत होते?

शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे आणि जो प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी का म्हटले असेल? गाडगेबाबा म्हणतात भाकरी हातावर घेऊन खा पण मुलांना शाळेत पाठवा असे समाजाला वारंवार का सांगत असतील? त्यांना शिक्षणाच्या माध्यमातून काय साध्य करायचे असेल?

सर्वात महत्त्वाचे म्हणजे शिक्षणाची द्वार खुले करून आपल्याला शिक्षीत करण्यासाठी फुले शाहु आंबेडकर यांनी आपले आयुष्य खर्ची घातले त्या महामानवाचे फोटो शिक्षीत लोकांच्या घरात आहेत का? जर हे महापुरुषांचे फोटो घरात लाऊ शकत नाहीत तर यांना शिक्षीत कसे म्हणावे? जो अन्याया विरोधात गुरगुरत नाही ते शिक्षण आहे का?

आज डोक्यात मेंदू नसलेल्या लोकांनी शिक्षण म्हणजे फक्त नोकरी मिळवून पैसे कमवण्याचे माध्यम समजले आहे. परंतु शिक्षण म्हणजे केवळ आर्थिक विकास मुळीच नाही. शिक्षण म्हणजे बौद्धीक व वैचारिक परिवर्तन म्हणजे शिक्षण. शिक्षण म्हणजे जास्त मार्क्स घेऊन परिक्षा पास होणे मुळीच नाही. शिक्षण म्हणजे फक्त पैसा मिळण्यासाठी नोकरीच्या मागे धावने मुळीच नाही.



विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव, ता. मेहकर
९१३०९७९३००

शिक्षण माणसाला वैचारिक परिपक्व आणि मानसिक समृद्ध करून मानसामध्ये नैतिकता व प्रामाणिकपणा भरते. शिक्षण माणसाला मानसिक गुलामीतुन मुक्त करते, शिक्षण माणसाला समता व सामाजिक न्याय शिकवते,

शिक्षण माणसाला सर्वासोबत माणसा सारखी वागणूक द्यायला शिकवते, शिक्षण माणसाला स्वतःचा सामाजिक विकास व आपल्या सोबत समाजाचा सामाजिक विकास करायला शिकवते. वरिल बाबी ज्यांच्या अंगी आहेत तो सुशिक्षित आणि त्याने जे आत्मसात केले ते शिक्षण होय.

आज आपण शाळा महाविद्यालयात जाऊन वाचलेल्या पुस्तकाला शिक्षण समजतो. आणि शाळा महाविद्यालयात जे पुस्तके वाचली जातात ती बहुतांशी फक्त मार्क्स मिळावे यासाठीच असतात. त्याचे गांभीर्य, आशय व कारण लोकांना कळतच नाही. एक दोन उदाहरणाद्वारे समजून घेतले तर लक्षात येईल.

पहिले उदाहरण विज्ञानाचे घेऊ कोणत्याही घडणाऱ्या घटनेला काही ना काही आधार नक्कीच असतो.

कोणतीही गोष्ट विना आधार घडत नाही. प्रत्येक घडणाऱ्या गोष्टीमागे कारण असते. आपण आग पेटवली तर ऑक्सिजन मिळतो म्हणून आग जळते, जळणासाठी ऑक्सिजन आवश्यक आहे. हे उदाहरण जगात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीला लागु होते, वेगवेगळे सरायने एकत्र आले तर तिसरीच काहीतरी तयार होते.

थोडक्यात प्रत्येक गोष्टीच्या निर्मिती मागे कोणाचा ना कोणाचा आधार आहे हे माहित असताना, विज्ञान शिकलेले असताना आजही लोक चमत्कार, पाखंड यावर जर विश्वास ठेवत असतील तर त्याला शिक्षण म्हणायचे का?

दुसरे एक उदाहरण घेऊया राज्य घटनेचे. राज्यशास्त्र किंवा स्पर्धा परिक्षेची तयारी करतांना राज्यघटना प्रत्येक जण वाचतो. मार्क्स मिळविण्यासाठी त्याचा वापर करतात. राज्य घटनेने मुलभूत अधिकार बहाल केले, राज्यघटनेने देश चालतो, राज्य घटने मुळे आपण अन्याय अत्याचारा विरोधात आवाज उठवतो, राज्य घटनेने प्रत्येकाला समान हक्क, स्थान व संधी उपलब्ध करून दिली वगैरे वगैरे सगळं काही वाचतो.

स्पर्धा परिक्षा पास होऊन समाजाची सेवा करायची अशी बोलणारे लोक घरात राज्य घटना आणि घटनाकारांचा फोटो लावत नसतील तर त्यांना शिक्षीत म्हणायचे का? शिक्षण हे स्वतः सह समाजाचा उद्धार करणारे माध्यम आहे. आपण आज जर बघितले तर शिक्षणातून तलाठी, पोलीस, ग्रामसेवक, तहसील कार्यालयातील कर्मचारी, व इतरही कार्यालयातील कर्मचारी यांचा विचार केला तर हे महाविद्यालयात पुस्तक वाचुन नोकरीवर लागलेली लोक आहेत. जे नोकरी वर लागली ते स्वतःला जरा जास्तच बुद्धिमान समजतात. अर्थात सगळेच असे असतात असे नाही पण बहुतांश लोक असेच असतात.

गरिबीत शिकुन मी नोकरी ला लागलो म्हणणारे लोक मग तो तलाठी असेल तर शेतकऱ्यांकडून कसे आणि कोणकोणत्या कामाचे किती पैसे घेतो हे शेतकऱ्यांना माहिती आहे. माहीतीच नाही तलाठ्या कडून काम करून घ्यायचे म्हणजे पैसे द्यावेच लागतात असा अलिखित पण सर्वमान्य नियमच आहे.

ग्रामसेवक असेल तर घरकुल मिळण्यासाठी बेघर गरिब लोकांकडून किती पैसे घेतात आणि ज्यांनी पैसे दिले नाही त्यांचे घरकुल कसे डावलले जाते आणि ज्यांनी पैसे दिले, जो ग्रामसेवक यांच्या जवळचा आहे त्या व्यक्तीला पक्के घर असताना पुन्हा घरकुल मिळते हे सर्वांना माहिती आहे.

पोलिस असतील तर दारू, मटका, प्रवासी वाहने, यांच्या कडून स्वतःच्या खिशात दररोज किती पैसे भरत असतील याची गणती आहे का?

एखादे भांडण झाले, चोरी झाली किंवा इतर गुन्हेगारी प्रवृतीची तडजोड करायला किती खर्च येतो लोकांना माहिती आहे. तहशिल मध्ये राशन कार्ड असेल, कोतवाल नक्कल असेल, एवढेच काय निराधार, विधवा, विकलांग लोकांच्या योजना असो या ठिकाणी सुद्धा निराधार, विधवा, विकलांग लोकांकडून ही पैशाची मागणी केली जाते.


थोडक्यात प्रत्येक कार्यालयात गोरगरिबांचे कामे विनापैसे होत नसतील आणि सरकारी पगार घेऊनही गोरगरीब लोकांकडून ज्यांची खायची सोय नाही, राहायची सोय नाही अशा लोकांकडून पैसे घेऊन स्वतः ची घरे भरणा?या बेईमान लोकांना सुशिक्षित म्हणायचे का? सर्वच सरकारी कर्मचारी भ्रष्ट आहेत असे मुळीच नाही पण आजपर्यंत अनेक उदाहरणे समोर आलेले आहेत तलाठी, पोलीस, ग्रामसेवक व इतरही कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडे करोडो रुपये सापडले. जे पकडले गेले ते फक्त उदाहरण आहेत. असे कितीतरी कर्मचारी दररोज बाहेर गोरगरिबांचे खिसे रिकामे करत आहेत त्यांना शिक्षीत म्हणायचे?

जर कर्मचारी लोकांकडे करोडो रुपये सापडू शकतात तर अधिकारी वर्गांकडे किती चे घबाड असेल? आणि संबंधित खात्याच्या मंत्र्याकडे किती पैसा प्रामाणिक कमाईमधील असेल याचा विचार न केलेलाच बरा. पण अशा लोकांना शिक्षीत म्हणायचे का? शाळेतील पुस्तके वाचणारे अनेक लोक अनेक चुकिच्या प्रकरणात गुन्हेगारी क्षेत्रात समोर आहेत त्यांना शिक्षीत म्हणायचे का?

बलात्कार, अपहरण हे शिकलेल्या लोकांमध्ये जास्त घडून येते त्यांना शिक्षीत म्हणायचे का? शिक्षक, डॉक्टर, पोलीस, शासकीय, खाजगी कार्यालयात महिला सुरक्षित नाही मग त्यांना सुशिक्षित म्हणायचे का? नाही रे भाऊ ते शिक्षण नाही.

स्वतःच्या ताटातील खास गरजुंना देणे, गोरगरिबांना मदत करणे, स्त्रियांचा सन्मान करणे, देश व देशाचे प्रतिकांचा सन्मान करणे, मेहनतीने पैसे कमावून गरजुंना मोठ्या मनाने मदत करणे, आणि सर्वात महत्वाचे नोकरी कोणतीही असो, पैसा कोणत्याही मार्गाने कमवावी पण ते करतात इमानदारी व नैतिकता हरवली जाणार नाही म्हणजे शिक्षण रे भाऊ...

■ ■ ■



# सेन्सेक्स 91 अंकांनी वधारला गुंतवणूकदारांना 10000 कोटींचा नफा

**मुंबई, दि. १ प्रतिनिधी**

भारतीय शेअर बाजारात १ जुलै रोजी अत्यंत अस्थिर व्यवहार झाले. व्यवहाराच्या शेवटी sensex आणि nifty दोन्ही किरकोळ वाढीसह बंद झाले. सेन्सेक्स ९०.८३ अंकांच्या किरकोळ वाढीसह ८३,६९७.२९ वर बंद झाला, तर निफ्टी २४.७५ अंकांनी वाढून २५,५४१.८० च्या पातळीवर पोहोचला. बाजारातील तज्ज्ञांनी सांगितले की, आजच्या शेअर बाजारातील हालचालींमुळे भारत-अमेरिका व्यापार कराराच्या चर्चेचा परिणाम दिसून आला. चर्चा महत्त्वाच्या टप्प्यावर आहे आणि जर करार झाला नाही तर भारताला २६% पर्यंतच्या आयात शुल्काला सामोरे जावे लागू शकते. या अनिश्चिततेचा गुंतवणूकदारांच्या भावनांवर परिणाम झाला.

क्षेत्रीय ट्रेंड देखील मिश्र राहिले. पीएसयू बँकिंग शेअर्स ०.७% वाढले. याशिवाय, पायाभूत सुविधा आणि धातू क्षेत्रांनीही चांगली ताकद दाखवली. त्याच वेळी मीडिया शेअर्समध्ये १.५% घट झाली. एफएमसीजी, आयटी आणि ऑटो क्षेत्रातही कमकुवतपणा दिसून आला. दुसरीकडे, सलग ७ दिवसांच्या वाढीनंतर आज बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांक किंचित घसरणीसह बंद झाले.

आज १ जुलै रोजी बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार



सेन्सेक्स 83,697

निफ्टी 25,541

भांडवल ४६१.२६ लाख कोटी रुपयांवर पोहोचले, जे मागील दिवशी म्हणजेच सोमवार, ३० जून रोजी ४६१.१६ लाख कोटी रुपये होते. सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल आज सुमारे १०,००० कोटी रुपयांनी वाढले आहे.

सेन्सेक्समधील ३० पैकी १३ शेअर्स वाढीसह बंद झाले. यामध्ये भारत इलेक्ट्रॉनिक्सच्या शेअर्समध्ये सर्वाधिक २.५१ टक्के वाढ झाली. यानंतर, रिलायन्स इंडस्ट्रीज (RIL), एशियन पेंट, अल्ट्राटेक सिमेंट आणि कोटक महिंद्रा बँकेचे शेअर्स ०.९३ टक्के १.८४ टक्क्यांनी वाढून बंद झाले.

सेन्सेक्समधील उर्वरित १७ शेअर्स घसरून बंद झाले. यामध्ये ॲक्सिस बँकेचे शेअर्स सर्वाधिक २.१३ टक्क्यांनी घसरले. दुसरीकडे, ट्रेंट, इटरनल, टेक महिंद्रा आणि आयसीआयसीआय बँकेच्या शेअर्समध्ये ०.९५ टक्के ते १.२५ टक्के घसरण झाली.

# हिमाचलमध्ये ढगफुटी सदृश्य पावसामुळे हाहाकार

**शिमला, दि.१ वृत्तसंस्था**



हिमाचल प्रदेशमध्ये ढगफुटी सदृश्य पडलेल्या पावसामुळे महाराष्ट्रातील पर्यटक अडकल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. यामधील काही पर्यटक सातारा जिल्ह्यातील असल्याची ही शक्यता वर्तवली जात आहे. हिमाचल प्रदेशमध्ये सध्या ढगफुटी सदृश्य पाऊस पडला असल्यामुळे पर्यटनासाठी फिरण्यास गेलेले महाराष्ट्रातील काही पर्यटक या पूर परिस्थितीमध्ये अडकले असल्याची माहिती समोर येत असून यामध्ये काही पर्यटक सातारा जिल्ह्यातील असल्याची माहिती मिळत आहे. मात्र, याबाबत अजूनही प्रशासनाकडून कोणताही या घटनेला दुजोरा दिला नसून यामधून कोणतीही पर्यटकांची अद्याप आकडेवारी जाहीर करण्यात आलेली नाही.

दरम्यान, सोमवारी हिमाचल प्रदेशात मुसळधार पावसामुळे काही इमारती कोसळल्या असून अनेक भागात भूस्खलन झाले आणि रस्ते बंद झालेत. अशातच, पावसाळ्यापासून आतापर्यंत राज्यात ३९ जणांचा मृत्यू झाला आहे. गेल्या २४ तासांत ३ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. सोमवारी सकाळी हिमाचलच्या मंडी-कुल्लू राष्ट्रीय महामार्गावरील थलौतच्या भुभू जोत बोगद्याजवळ भूस्खलन झाले. यामुळे रस्ते वाहतुकीवर परिणाम झाला आहे. अनेक वाहने बोगद्यातही अडकली आहेत. सतर्कतेमुळे आज हिमाचलच्या ४ जिल्ह्यांमध्ये शाळा बंद आहेत.

दुसरीकडे, बिहारमधील भोजपूर, बक्सर आणि नालंदा येथे वीज कोसळून ५ जणांचा मृत्यू झाला. त्याच वेळी रविवारी गया येथील इमामगंज येथील लागुरही धबधब्यात अचानक पाणी वाढले. जोरदार प्रवाहात ६ मुली वाहून गेल्या. स्थानिक लोकांनी सर्वांना सुरक्षित बाहेर काढले. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, आज ३१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये पाऊस पडेल. उत्तराखंड आणि झारखंडमध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. मध्य प्रदेश-राजस्थानसह १२ राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट आहे तर १७ राज्यांमध्ये ऑरेंज अलर्ट आहे.

# संजय पवारांना उद्धव ठाकरेंचा फोन, मातोश्रीवर भेटायला येण्याचा आदेश

**कोल्हापूर, दि. १ प्रतिनिधी**

शिवसेना ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना एकत्र येण्याच्या चर्चा महाराष्ट्रभर सुरू असताना कोल्हापुरात मात्र बंडाची चिन्हं दिसत होती. ठाकरेंच्या शिवसेनेचे संजय पवार यांनी वरिष्ठांच्या निर्णयावर नाराजी व्यक्त करत उपनेतेपदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर त्यांना शिंदे गटाकडून खुली ऑफरही देण्यात आली होती. मात्र उद्धव ठाकरे यांनी फोनवरुन चर्चा केल्यानंतर संजय पवार यांची नाराजी दूर झाली. बुधवारी संजय पवार हे मातोश्रीवर उद्धव ठाकरेंच्या भेटीला येणार आहेत.



कोल्हापूच्या जिल्हाध्यक्षपदी रविकिरण इंगवले यांची नियुक्ती झाल्यानंतर संजय पवार नाराज झाले होते. ही नियुक्ती करताना पक्षाच्या उपनेत्यालाही विचारलं जात नाही असं सांगत त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर एक शिवसैनिक म्हणून उद्धव ठाकरेंसोबत राहणार असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं होतं.

नाराज संजय पवार हे उद्धव ठाकरेंना सोडून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जाणार असल्याच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. शिंदेंचे मंत्री उदय सामंत यांनी त्यांना जाहीर ऑफरही दिली होती. मात्र ठाकरे गटाकडून गतीमान हालचाली झाल्या. सुनील प्रभू यांनी संजय पवार यांच्याशी चर्चा केली. नंतर उद्धव ठाकरे आणि संजय पवार यांच्यातही चर्चा झाली. त्यानंतर संजय पवार यांची नाराजी दूर झाली.

संजय पवार हे बुधवारी दुपारी १२.३० वाजता उद्धव ठाकरेंची मातोश्रीवर भेट घेणार आहेत. जिल्ह्याच्या राजकारणावर आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवरही यावेळी चर्चा होण्याची शक्यता आहे.

शिवसेनेने नुकतीच कोल्हापूर जिल्हाध्यक्षपदी रविकिरण इंगवले यांची नियुक्ती केली आणि शिवसेनेमध्ये असलेला अंतर्गत संघर्ष चव्हाट्यावर आला. यातूनच उपनेते संजय पवार यांनी पदाचा राजीनामा देऊन केवळ ठाकरेंचा शिवसैनिक राहणं पसंत केलं. संजय पवार आपली नाराजी व्यक्त करताना म्हणाले की, १९९० पासून मी शिवसैनिक मी काम केलं. गेली ३६ वर्षे मी एकनिष्ठपणे काम केलं. मातोश्रीवरून जे आदेश येतील त्याचे तंतोतंत पालन केलं. पण गेली १० वर्षे बघितलं तर काही वेगळं घडत गेलं. जिल्हाध्यक्षपदाची निवड करताना विश्वासार्हता आणि पारदर्शकता तपासायला हवी. विधानसभा निवडणुकीत षडयंत्र करण्यात आलं. मधुरीमाराजे यांनी अचानक का माघार घेतली?

जिल्हाध्यक्षपदासाठी इच्छुक अनेक होते, पण नियुक्ती करताना उपनेत्याला देखील माहिती नसेल तर काय करायचं? असा प्रश्न संजय पवार यांनी विचारला. त्यामुळे आपण शिवसेना उपनेतेपदाचा मी राजीनामा देत आहे, एक शिवसैनिक म्हणून मी उद्धव ठाकरे यांच्या बरोबर राहणार आहे असं त्यांनी स्पष्ट केलं.

# वाहनांवरील नवीन करप्रणाली लागू

**मुंबई, दि. १ प्रतिनिधी**

महाराष्ट्रात वाहनांवरील करावर आजपासून मोठा बदल करण्यात आला आहे. यानुसार १ जुलै २०२५ पासून नवीन वाहन कर प्रणाली लागू करण्यात आली आहे. यामुळे महागड्या वाहनांसोबतच सीएनजी, एलएनजीसह मालवाहू वाहनांच्या किंमती वाढणार आहेत. या नव्या कर सुधारणेमध्ये सर्व खासगी सीएनजी/एलपीजी वाहनांसाठी वन टाईम करात १% वाढ करण्यात येणार आहे. तसेच मोटार वाहन (एमव्ही) कराची कमाल मर्यादा २० लाख रुपयांवरून ३० लाख रुपये करण्यात आली आहे. म्हणजेच आता २० लाख रुपयांवरील वाहनांना जास्त कर द्यावा लागणार आहे. यामुळे वाहनांची ऑनरोड किंमत वाढली आहे. यामुळे महाराष्ट्र सरकारला २०२५-२६ साठी सुमारे १७० कोटी रुपये अतिरिक्त महसूल मिळणार आहे.

# ...तर एलॉन मस्क यांना दुकान बंद करून दक्षिण आफ्रिकेला परतावे लागेल - ट्रम्प

**वॉशिंग्टन, दि. १ वृत्तसंस्था**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प व जगातील सर्वात श्रीमंत उद्योगपती एलॉन मस्क यांच्यात पुन्हा एकदा शाब्दिक युद्ध रंगलं आहे. गेल्या काही दिवसांपासून ट्रम्प यांच्या धोरणांवरून टीका करणाऱ्या, नवा पक्ष काढण्याचा इशारा देणाऱ्या मस्क यांना यावेळी ट्रम्प यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. एका बाजूला ट्रम्प यांच्या महत्त्वकांक्षी 'वन बिग, ब्युटीफुल बिला'वर (नवं कर व खर्च विधेयक – Tax and Spending Bill) सीनेटमध्ये मतदान चालू असताना मस्क त्यावर टीका करत आहेत. मस्क यांच्या टीकेवर ट्रम्प यांनी आज (१ जुलै) पहिल्यांदाच त्यावर टिप्पणी केली आहे.

डोनाल्ड ट्रम्प म्हणाले, "मस्क यांना माहिती होतं की मी इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देणाऱ्या धोरणांच्या विरोधात आहे. प्रत्येक व्यक्तीवर इलेक्ट्रिक कार खरेदी करण्याची सक्ती करता येणार नाही. मस्क यांना कदाचित मानवी इतिहासातील कोणत्याही व्यक्तीपक्षा अधिक अनुदान मिळू शकतं. मात्र, अनुदानाशिवाय त्यांना त्यांचं दुकान बंद करून दक्षिण आफ्रिकेला परत जावं लागेल. अनुदानाशिवाय इतक्या मोठ्या प्रमाणावर रॉकेट लॉन्चर, उपग्रह व इलेक्ट्रिक कार्सचं उत्पादन होणार नाही. तसेच आपण खूप पैसे वाचवू शकतो."

मस्क यांनी डोनाल्ड ट्रम्प यांना इशारा दिला होता की One Big, Beautiful Bill सीनेटने पारित केल्यास त्याच्या दुसऱ्याच दिवशी मी स्वतःचा राजकीय पक्ष काढेन. त्यावर ट्रम्प यांनी आज प्रतिक्रिया दिली.

एलॉन मस्क यांनी दोन दिवसांपूर्वी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोल (मतदान) घेतला होता. याद्वारे त्यांनी अमेरिकन जनतेला नव्या राजकीय पक्षाबाबत त्यांचं मत विचारलं होतं. यावर हजारो नेटकऱ्यांनी मस्क यांच्या नव्या पक्षाच्या निर्णयाला पाठिंबा दर्शवला आहे. नव्या पक्षासाठी प्रोत्साहन दिलं आहे. त्यांनंतर मस्क यांनी पक्षासाठी 'अमेरिका पार्टी' या नावाची घोषणा देखील केली.

# सुन्दर हस्ताक्षर कलाकार पांडुरंग

**मुलखावेगळी माणसं**

"सुंदर हस्ताक्षर, चांगल्या व्यक्तिमत्त्वाचा दागिना आहे" असे म्हटले जाते, आणि हिंगोली जिल्ह्यातील गुगुळपिंपरी येथील पांडुरंग चोपडे यांचे जीवन हे याचं प्रमाणे आहे. पंधरा वर्षांपासून शालेय विद्यार्थ्यांना हस्ताक्षराची कला शिकवणारे पांडुरंग चोपडे यांचं कार्य नक्कीच प्रेरणादायक आहे. त्यांनी आतापर्यंत सहा लाख विद्यार्थ्यांना मोफत हस्ताक्षराचे धडे दिले आहेत.पांडुरंग चोपडे यांच्या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरातील वळणाचा आणि सुधारण्याचा आहे. त्यांना विश्वास आहे की, शालेय जीवनातच सुंदर हस्ताक्षर शिकल्यास विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक प्रगल्भ आणि सुंदर होऊ शकते. यासाठी त्यांनी वसमतच्या दोन इंग्रजी शाळांमध्ये सुंदर हस्ताक्षर कार्यशाळा घेतल्या. तहसीलदार शारदा दळवी यांच्या उपस्थितीत या कार्यशाळेचा समारोप करण्यात आला.



पांडुरंग चोपडे यांचे कार्य विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी खूप महत्त्वाचे आहे, कारण एक चांगलं हस्ताक्षर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला एक सकारात्मक ओळख देतं. कार्यशाळांमध्ये विद्यार्थ्यांना अक्षर सुंदर व वळणदार कसे करावे, याबद्दल मार्गदर्शन केलं जातं. यामुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व आणि कार्यक्षमता सुधरते. विद्यार्थ्यांचे सुधारणारे हस्ताक्षर पाहून त्यांच्या पालकांनाही आनंद झाला आहे, आणि त्यामुळे शाळेतील वातावरण सुधारण्यास मदत होते.

**लोकमानस**

लालबहादूर शास्त्री व लिटल किंग्ज शाळेमध्ये पांडुरंग चोपडे यांनी दहा दिवसांपासून स्वच्छ व सुंदर हस्ताक्षर कार्यशाळा घेतली आहे. यात विद्यार्थ्यांच्या आधीच्या हस्ताक्षरातील चांगला बदल झाला आहे. पालक देखील आपल्या मुलांचे सुधारलेले हस्ताक्षर पाहून खुश आहेत. तहसीलदार शारदा दळवी यांनी या कार्यशाळेचे महत्त्व ओळखून, ग्रामिण भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये देखील अशा कार्यशाळांचा आयोजन करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. "माझ्या तालुक्याच्या शाळांमध्ये हस्ताक्षर स्वच्छ आणि सुंदर व्हावे," असे त्या म्हणाल्या.

पांडुरंग चोपडे यांचा ध्येय एकच आहे, आणि ते म्हणजे हिंगोली जिल्ह्यातील प्रत्येक विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर सुंदर आणि मोत्यासारखे बनविणे. हस्ताक्षर चांगले असणे, व्यक्तिमत्त्वासाठी महत्त्वाचे आहे. ज्याचं हस्ताक्षर चांगले असते, त्याचे व्यक्तिमत्त्व देखील चांगले असते. यामुळे त्यांचा प्रयत्न केवळ विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व सुधारण्याचा नाही, तर त्यांची शालेय कामगिरी देखील सुधारण्याचा आहे. चोपडे यांना विश्वास आहे की, जिल्हाधिकारी यांची परवानगी मिळाल्यास जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये सुंदर हस्ताक्षर कार्यशाळा घेता येईल. त्यांचे शिक्षण आणि काम हा त्यांचा छंद आहे आणि ते त्याला पूर्णतः समर्पित आहेत.

# लिव्ह-इन पार्टनरने प्रेयसीची केली हत्या

**भोपाळ, दि. १ वृत्तसंस्था**

लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या जोडप्यांमध्ये भांडणानंतर टोकाचे पाऊल उचलण्यात आल्याची अनेक प्रकरणे घडलेली आहेत. नुकतेच भोपाळमध्ये घडलेल्या एका प्रकरणामुळे आता खळबळ उडाली आहे. भोपाळच्या गायत्री नगर येथे राहणाऱ्या ३२ वर्षीय सचिन राजपूतने त्याची प्रेयसी रितीका सेनचा (वय २९) खून केला. यानंतर तिचा मृतदेह ब्लँकेटमध्ये गुंडाळून ठेवत मृतदेहाशेजारीच दोन रात्री घालवल्या. जसे काहीच घडले नाही, असे दाखवत सचिन राजपूत त्याच घरात राहिला.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २७ जूनच्या रात्री सचिन आणि रितीका यांच्यात कडाक्याचं भांडण झालं. सचिन बेरोजगार आहे, तर रितीका एका खासगी कंपनीत काम करते. यावरून सचिनच्या मनात रितीकाबद्दल असूया निर्माण झाली होती. तसेच रितीकाचं तिच्या वरिष्ठासोबत प्रेमप्रकरण सुरू असल्याचा संशय सचिनला वाटत होता. याच कारणावरून दोघांचं भांडण झालं, ज्यात रितीकाचा खून झाला.

खून केल्यानंतर सचिननं रितीकाचा मृतदेह बेडवर ठेवून वरून ब्लँकेट टाकले. ती झोपली असल्याचा बहाणा करत सचिन बिनदिक्कत त्याच खोलीत दोन दिवस राहिला. तसेच रितीकाच्या बाजूला तो रात्री झोपलाही. रितीकाच्या हत्येचा धक्का बसल्यामुळे सचिन दोन दिवस प्रचंड मद्यपान करत होता, असेही पोलिसांनी सांगितलं.

# आई-वडिलांचा उपचारांना नकार

## १ वर्षाच्या चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू

**मलप्पुरम, दि. १ वृत्तसंस्था**

केरळच्या मलप्पुरम येथे एका वर्षाच्या चिमुकल्याचा काविळ आजारामुळे मृत्यू झाल्यानंतर पोलिसांनी अनैसर्गिक मृत्यूचा गुन्हा दाखल केला आहे. मृत बालकाच्या पालकांनी आधुनिक उपचार पद्धतींना नकार दिल्याच संशय व्यक्त केला जात आहे.

मृत मुलाचे नाव एसेन एरहान तर आईचे नाव हिरा हरीरा आणि वडिलांचे नाव नवाज असे आहे. हे कुटुंब मलप्पुरमच्या कोट्टक्कल येथे राहते. लहान बाळाचा २७ जून रोजी मृत्यू झाला. लहान बाळाला वेळेवर योग्य उपचार मिळाले नसल्याचा पोलिसांना संशय आहे. तसेच मुलाची आई ॲक्युपंक्चर प्रॅक्टिशनर आहे. तिने मागच्या काळात आधुनिक उपचारांना विरोध करणाऱ्या पोस्ट टाकल्या होत्या. या पोस्ट आता चर्चेत आहेत. दरम्यान मृत मुलाचा दफनविधी झाल्यानंतर पोलिसांनी आता शवविच्छेदन करण्यासाठी मृतदेह पुन्हा बाहेर काढला आहे. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर आता पुढील कारवाई निश्चित केली जाईल.

एप्रिलमध्ये मलप्पुरमध्येच एका दुसऱ्या घटनेत ३५ वर्षीय अस्मा हिचा घरीच बाळंतपणादरम्यान मृत्यू झाला होता. या प्रकरणात महिलेचा पती सिराजुद्दीन याला सदोष मनुष्यवध आणि पुरावे नष्ट केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती. सिराजुद्दीन मुदावर काफिला नावाचे युट्यूब चॅनेलही चालवतो. पोलिसांनी सांगितले की, आरोपी पतीने एर्नाकुलममधील पेरुम्बवूर येथे अस्माचा मृतदेह गुप्तपणे दफन करण्याचा प्रयत्न केला.

# XC60 ही आतापर्यंतची सर्वाधिक विक्री होणारी व्होल्वो कार

**चलती का नाम गाडी**

व्होल्वोच्या २७ लाखांहून अधिक कार विकल्या गेल्या आहेत, त्यामुळे व्होल्वो XC60 ने आयकॉनिक व्होल्वो २४० ला मागे टाकत आतापर्यंतची सर्वाधिक विक्री होणारी व्होल्वो मॉडेल बनली आहे. २००८ मध्ये पदार्पण झाल्यापासून,



व्होल्वो कार्सची मध्यम आकाराची एसयूव्ही ग्राहकांमध्ये आवडती राहिली आहे, जी सुरक्षितता, गुणवत्ता आणि प्रीमियम ड्रायव्हिंग अनुभवाला महत्त्व देणाऱ्या विविध ड्रायव्हर्सना आकर्षित करते. २०१८ मध्ये, तिला वर्ल्ड कार ऑफ द इयर म्हणून घोषित करण्यात आले."१९८० च्या दशकात स्वीडनमध्ये वाढताना, व्होल्वो २४० ही आयकॉनिक फॅमिली कार होती तुम्हाला जवळजवळ प्रत्येक ड्राईव्हवेमध्ये एक कार दिसू शकते,'' व्होल्वो कार्सच्या ग्लोबल ऑफरच्या प्रमुख सुसान हॅग्लंड म्हणतात. "आज XC60 ने दोन प्रकारे हे स्थान मिळवले आहे. केवळ कुटुंबाची आवडतीच नाही तर आमची सर्वकालीन टॉप-सेलर देखील बनली आहे, जी यशस्वी कारचा अंतिम पुरावा आहे."

XC60 इतके लोकप्रिय का आहे हे व्होल्वोची व्याख्या करणाऱ्या मुख्य मूल्यासह ते पॉवरला कसे अखंडपणे एकत्रित करते याच्याशी बरेच काही संबंधित आहे: सुरक्षितता. भारतातील कुटुंबांसाठी, XC60 स्कॅन्डिनेव्हियन डिझाइन, SUV व्यावहारिकता आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, व्होल्वो कार चालवताना मिळणारी अतुलनीय मनःशांती यांचे परिपूर्ण मिश्रण देते.

# राज आणि उद्धव ठाकरे बंधूंनी युती करावी का?

**माझं मत**

**1) मनीषा मिरजकर (मनसैनिक)**

होय. मनसे प्रमुख राज साहेब ठाकरे आणि शिवसेना पक्षाचे सर्वेसर्वा उध्दव साहेब ठाकरे यांनी परिस्थिती नुरुप एकत्र येणं ही तमाम मराठी जणांची इच्छा आणि मनीषा देखील आहे. या दोन्ही बंधूंच्या आपसातील वितुष्टमुळे मागील अनेक वर्ष भाजप सारख्या संधीसाधू पक्षाने आपला फायदा करून घेतलेला आहे.मात्र यामुळे महाराष्ट्रातील अस्सल मराठी माणूस मात्र हतबल झालेला आहे.तो विभागला गेल्यानेच मराठी मतांमध्ये फूट पडली आणि चुकीचे लोक आज सत्ताधारी म्हणून मिरवीत आहेत.म्हणूनच मराठी माणसाच्या भल्यासाठी या दोन्ही बंधूंची कायम युती व्हावी हीच मनीषा आहे.

**2) संतोष साठे (शिवसैनिक)**

दोघांचे भांडण तिसऱ्याच लाभ ही मराठीतील म्हण अगदी सुपरिचित आहे.ठाकरे बंधूंचे देखील मागील काही वर्षांपासून असेच झाले आहे.ज्याचा फायदा इतर विशेषत भाजप सारख्या उपर्या पक्षाने घेतला आहे.यामुळे. मराठी माणसाची मात्र गोची झालेली आहे.जर ठाकरे बंधू निवडणुकांच्या निमित्ताने का होईना एकत्र आले तर नक्कीच पुन्हा एका शिवसेनेची सत्ता प्रस्थापित होईल आणि मराठी माणसाचा आवाज अबाधित राहील यात शंकाच नाही.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय, कर्मचाऱ्यांसाठी लागू केले आरक्षण

**नवी दिल्ली, दि. १ वृत्तसंस्था**

सर्वोच्च न्यायालयाने एक मोठा निर्णय घेतला आहे. पहिल्यांदाच, कोर्टाने आपल्या अनुसूचित जाती आणि जमाती प्रवर्गातील कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती आणि पदोन्नतीसाठी औपचारिक आरक्षण धोरण लागू केले आहे. २४ जून रोजी या संदर्भात एक परिपत्रक जारी करण्यात आले. या परिपत्रकाद्वारे, सर्वोच्च न्यायालयातील सर्व कर्मचाऱ्यांना या निर्णयाची माहिती देण्यात आली.

परिपत्रकानुसार आणि सध्या लागू असलेल्या मॉडेल रोस्टरनुसार, सर्वोच्च न्यायालयाच्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमध्ये १५ टक्के कोटा आणि एसटी कर्मचाऱ्यांना ७.५ टक्के कोटा मिळेल. या कोट्याचा फायदा रजिस्ट्रार, वरिष्ठ वैयक्तिक सहाय्यक, सहाय्यक ग्रंथपाल, कनिष्ठ न्यायालय सहाय्यक आणि चेंबर अटेंडंट यांना होईल. भारताचे सरन्यायाधीश (सीजेआय) भूषण रामकृष्ण गवई यांच्या कार्यकाळात हा महत्त्वाचा धोरणात्मक बदल झाला आहे, जे देशातील सर्वोच्च न्यायिक पदावर पोहोचणारे अनुसूचित जातीच्या पार्श्वभूमीतील दुसरे व्यक्ती आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली ही मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयाचे महत्त्व देखील वाढते कारण न्यायव्यवस्थेवर उपेक्षित गटांचे कमी प्रतिनिधित्व असल्याची टीका नेहमी केली जाते.

या निर्णयाबद्दल सरन्यायादीश गवई म्हणतात की, सर्व सरकारी संस्था आणि अनेक उच्च न्यायालयांमध्ये अनुसूचित जाती आणि जमातींसाठी आरक्षणाची तरतूद आधीच आहे. तर, सर्वोच्च न्यायालय अपवाद का असावे? सर्वोच्च न्यायालयाने सकारात्मक कृतीबाबत अनेक महत्त्वाचे निर्णय दिले आहेत आणि एक संस्था म्हणून त्यांना ते अंमलात आणावे लागले. आपली तत्त्वे आपल्या कृतींमध्ये प्रतिबिंबित झाली पाहिजेत.

# नारायण मूर्ती यांचे ७० तास काम करण्याचे आवाहन

## इन्फोसिसने कर्मचाऱ्यांना ओव्हर टाइमबाबत दिल्या महत्त्वाच्या सूचना

**बंगळुरू, दि. १ वृत्तसंस्था**

सॉफ्टवेअर क्षेत्रातील नामांकित कंपनी इन्फोसिसनं आपल्या कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. कर्मचाऱ्यांनी काम आणि खासगी आयुष्याचा ताळमेळ राखण्यासंदर्भात या सूचना जाहीर करण्यात आल्या आहेत. कंपनीच्या एचआरकडून कर्मचाऱ्यांच्या कामाच्या तासांची माहिती घेतली जात आहे. कर्मचाऱ्यांनी ठरवून दिलेल्या वेळेतच काम आटपून घ्यावे, ओव्हर टाइम करू नये, अशा मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत. ज्या कर्मचाऱ्यांनी ठरलेल्या वेळेपेक्षा अधिक तास काम केले, त्यांना ईमेलही पाठविण्यात येत आहे. कर्मचाऱ्यांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन यानिमित्ताने करण्यात येत आहे.

इन्फोसिसचे सह संस्थापक नारायण मूर्ती यांनी मागच्या वर्षी एका कार्यक्रमात बोलत असताना आठवड्याला ७० तास काम करायला हवे, असे म्हटले होते. कंपनीचा नवा उपक्रम हा मूर्ती यांच्या दृष्टीकोनाच्या अगदी उलट आहे. कोलकाता येथे इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या शताब्दी सोहळ्यात बोलत असताना मूर्ती म्हणाले की, जर देशाला जागतिक महासत्ता बनवायचे असेल तरूणांनी अधिक मेहनत करावी लागेल. जर तरूणच कठोर परिश्रम करणार नसतील तर मग कोण करणार?

महासागर MUMBAI
RNI No.: MAHAMAR/2016/79101
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From Bora Bazar Street,Fort, Mumbai -400001. Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK

महासागर मुंबई
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा जवळ, वैशाली नगर लास्ट बस स्टॉप, दहिसर ईस्ट, मुंबई- ४०००६८ येथे छापून बोरा बाजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३) Email : mumbaimahasagar@gmail.com
RNI No.: MAHAMAR/2016/79101